शासकीय परवानग्या देणे आवश्यक होते. त्या देण्यात आलेल्या आहे. मी नाही म्हणतच नाही की, रॅम्पच काम आवश्यक नव्हत. ते अत्यावश्यक होते. जसे घनकचरा प्रकल्प जळगांव शहरासाठी होणे अत्यावश्यक आहे. या बद्दल कोणाचाच दुमत नाही. मात्र कोणतही काम करतांना त्यामध्ये कुठलीही अनियमितता होणार नाही. हे खुप आवश्यक आहे आणि अनियमितता पुर्वीही झालेली आहे. आता सुध्दा होत आहे. आपण आता पुन्हा मुळ मुद्दयाकडे येवु-यात. मागच्या सभेमध्ये आमचे सगळे सदस्यांनी विरोध केलेला असतांना ही ठरावामध्ये तो विरोध नोंदविण्यात आलेला नाही. माझा एकटीचा वैयक्तीक विरोध नोंदविण्यात आलेला आहे. तो आज नोंदवुन घ्यावा. तर हे इतिवृत्त कायम होईल आणि पुढच्या विषयाकडे आपण जावु शकतो. त्या विषयाबद्दल महापौरताई आपण काय बोलत आहात पिठासीन अधिकारी म्हणुन बोला.

**श्री.सुरेश सोनवणे :-** आमच्या पक्षातुन निवडुन आलेले होते. माझे सन्मा.सदस्य नगरसेवक भारतीय जनता पार्टीच्या तिकीटावर निवडुन आले होते. त्यांना बंडखोर म्हटल्यावर ते केस करणार होते की, आम्ही केस करतो तुमच्यावर. तर आयुक्त साहेबांना घनकचरा प्रकल्पाच्या एक महिन्या अगोदर पत्र दिलेल होत. निवेदन दिल होत. १३-१४ नगरसेवकांनी जे भारतीय जनता पार्टीच्या तिकीटावर निवडुन आले नंतर ते शिवसेनेत गेले. तर त्यांची भुमिका त्यांनी स्पष्ट करावी.

**श्री.सुनिल महाजन :-** भाऊ, तुम्ही पण निवडून आले होते.

(एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असतांना चर्चा व आवाज स्पष्ट ऐकु आले नाही. )

**श्री.सुरेश सोनवणे :-** विषयाचे विषयांतर करु नका. त्यांनी आयुक्त साहेबांना एक निवेदन दिले. ते निवेदन देण्याचे कारण काय ? ज्यांना ते संस्थेला आपण घाबरवायचे नंतर मग त्यांच्या बद्दल पॉझिटीव्ह विचार करायचे. काही किरीमिरी करायची की, काही हे करायचे. पोकळे साहेबांनी याची सविस्तर माहिती द्यावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** पोकळे,

**श्री.सुनिल महाजन :-** पोकळे साहेब, कशाला देतील.

**सौ.भारती सोनवणे :-** महापौरताई.

**श्री.**कैलास सोनवणे :- महापौरताई,

(एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असतांना चर्चा व आवाज स्पष्ट ऐकु आले नाही. )

**श्री.सुरेश सोनवणे :-** १३ नगरसेवकांनी दिलेले आहे आणि पोकळे साहेबांचे याच्यात दिलेले आहे नेतृत्वाखाली. त्यांनी त्या विषयाला विरोध नोंदविलेला आहे का ? त्यांनी त्यांची भुमिका स्पष्ट करावी व त्यांचे मत मांडावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हे टेन्डर भरत असतांना आपण ठेकेदाराचा फोटो घेतो का साहेब ? घेत असेल तर आम्हाला दाखवा ना कोण आहे तो म्हणजे त्याच्यासाठी इकडुन पण त्याच्या बाजुने प्रयत्न, इकडुन जोरदार त्यांच्या विरोधात, नंतर सुरेश भाऊंचे म्हणणे आहे की, १२-१५ लोकांचे गट जावुन निवेदन दिले. परत ते मागे घेतले असे काही त्यांचे म्हणणे आहे आपले सुरेश भाऊंच आहे तरी कोण नेमके हे आम्हाला फोटो तरी दाखवा प्लीज कमीत कमी फोटो तरी दाखवा त्याचा.

**श्री.सुनिल महाजन :-** स्क्रिनवर लावा स्क्रिनवर.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा याच पाचारण करुन घ्यायला लावा.

**मा.आयुक्त :-** अप्पा आपण गेल्या प्रक्रियेतच नुकतीच दुरुस्ती केलेली आहे. त्या वेळेस तुमची सुचना आली असती तर विचार करता आला असता.

**श्री.कैलास सोनवणे :-** तो गोरा आहे, काळा आहे, स्मार्ट आहे कसा आहे पाहु तर द्या त्याला. तो भेटतो तर नेमके मोजके लोकांना भेटतो. सगळयांना भेटायला पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्याच सभागृहात पाचारण करु नका. येथे बोलवुन नार्को टेस्ट करुन घ्या.

**सौ.भारती सोनवणे :-** महापौर ताई.

**मा.महापौर :-** बोला.

**सौ.भारती सोनवणे :-** महापौर ताई, पान नं.३९ वर मी पण ठरावाचा विरोध केलेला आहे. तो नोंद करुन घ्यावा. सर्वांचाच विरोध आहे तो नोंद करुन घ्यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** आणि ताई समजा, शुचितताई बोलतात ना. समजा आमचे एखाद्या विषयावर खुप वाद पण असतात. हा विषय असा व्हायला पाहिजे तो विषय तसा व्हायला पाहिजे. परंतु पार्टी मिटींग मध्ये त्याच्यावर एकमत होवुन जाते. आणि मग त्यावर ते पक्षाची भुमिका ठेवतात आणि त्यांनी मांडलेले आहे ना तर ती पक्षाची

भुमिका असते. इकडुन पण समजा नितीन भाऊ बोलतात. त्यांच्यामध्ये का वाद नाही का या विषयावरुन आहे. ७-८ जणांचे वाद आहे त्या विषयावरुन परंतु त्यांची ही भुमिका ठरली ना सपोर्ट द्यायची म्हणुन त्यांनी मांडले तर त्यांच्या मताप्रमाणे आपण ठराव मांडतो की नाही तसेच आहे आणि तशी आपली महापालिकेची पध्दत पण नाही. आपली प्रथा पण नाही. सांगावे गोराणे साहेबांनी किती वर्षापासुन ते नगरसचिव आहे. त्यांनी कश्या प्रकारे मतदानांची नोंदणी केलेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय झाले आहे अप्पा ? आता ही झालेली तांत्रिक चुक आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही असे नाही. तेव्हा पासुन ते घटनेपासुन तर सुधरवणार का ती चुक. त्या घटनेपासुन नाही सुधरवु शकत तुम्ही. असे नाही चालणार.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ही चुक तुम्हाला वेळेत दुरुस्त करता येईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** हे पहा नितीन भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु एक इतिवृत्त लिहलं गेल. जो ठराव पारित झाला.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही नाही पारित नाही झाला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्याच्या मध्ये दुरुस्ती करण्याची आता प्रोव्हीजन नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** असे नाही. तुम्ही ऐका.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी काय म्हणतो तुमची भुमिका चुकीची आहे असे नाही.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** नितीन भाऊ, बेकायदेशीर पध्दतीने ठराव पारित करणे यालाच म्हणतात ना. इतिवृत्तात दिसत आहे. सी.डी.त दिसत आहे. वारंवार आमचे नगरसेवक मागणी करत आहे. आणि पिठासीन अधिकाऱ्यांना कायद्याने काही अधिकार दिलेले आहे. तर त्याच अंमलात वापर करावा असे काही म्हटले आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** नितीन भाऊ, पिठासीन अधिकारी या महापौर आहे. पण त्या एखाद्या राष्ट्रीय पक्षाला रिप्रीझेन्ट करतात. ते त्यांच्या १७ व्या मजल्यावर. येथे त्या पिठासीन अधिकारी आहेत. येथे त्यांनी सभेचे कामकाज नियमित केले पाहिजे. जर सगळे सदस्य मागणी करत आहे आणि तरी ही विरोध डावलुन द्यायचा आणि आम्ही बहुमताने मंजुर केले असे डिक्लीयर करायच नविन विषय सुरु करुन टाकायचा. नविन विषय सुरु झाल्यानंतर सुनिलभाऊ बोलतात त्यांची तटस्थ भुमिका तुम्ही नोंदवतात. आमच्या सदस्यांची भुमिका नोंदविलेली नाही. तुम्ही म्हणतात नियम आहे. विषय पारित झाला नविन विषय सुरु झाला. या विषयावरच संपल. तुमचा अधिकार संपला. मग नितीन भाऊ, सुनिलभाऊंना अधिकार कुठुन मिळाला. त्यांच तटस्थ मत नोंदविण्याचा. हे जर तुम्ही नोंदवु शकतात तर त्याच सभेत आम्ही बोललो आहेत. ते नोंदवुन घ्यावच लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तस होवु शकत नाही ताई.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** करावच लागेल नितीन भाऊ, आम्ही दुसऱ्या सभेमध्ये मागणी करत नाही. आम्ही याच सभेमध्ये मागणी केलेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** होणार नाही ना ताई. तशी प्रोव्हीजन राहिली असती तर आपण नोंदुन घेतला असता.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** मग सुनिलभाऊच कोणत्या तरतुदीने मत नोंदविले, त्याचा खुलासा करावा आम्हाला विषय मंजुरी झाल्यानंतर सुनिलभाऊंच मत तटस्थ हे कोणत्या तरतुदीनुसार नोंदविल. जर ते नोंदविलेले आहे तर आमच त्याच सभेमध्ये सगळया सदस्यांनी मागणी केलेली आहे. मतदानाची चार जणांनी मागणी किती वेळात बोललेत. तुम्हाला वाचुन दाखवु का किती सदस्यांनी मागणी केलेली आहे. अश्विनभाऊंनी केलेली आहे, धिरजभाऊंनी केलेली आहे, राजुदादांनी केलेली आहे. विशाल भाऊंनी केलेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय संपुष्टात आल्यानंतरचा विषय आहे हा.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** विषय संपुष्टात आल्यानंतरच सुनिलभाऊ बोललेले आहे. ते तटस्थ आहे ते कस काय नोंदविले. ती तरतुद दाखवा आम्हाला कायद्यामध्ये. ती तरतुद दाखवा. उज्वलाताई बोलल्या आहेत. मंगलाताई बोल्या आहेत. रंजनाताई बोलल्या आहेत. सगळया बोलल्या आहेत.

**सौ.दिपमाला काळे :-** सुनिल भाऊ ही विषय मंजुर झाल्यानंतर बोललेले आहे. त्यांचे मत घेतले गेलेले आहे. तर आमच का नाही नोंदवु शकतात.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** सुनिल भाऊंच तटस्थ मत जर तुम्ही नोंदवु शकतात. त्यासाठीची जर तरतुद आहे तर तीच आम्हाला ॲप्लीकेबल आहे. आमचा विरोध नोंदवा, आमचा विरोध नोंदवा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** इतिवृत्तामध्ये बदल करण्यासंदर्भातली आता तरतुद असती. तर निश्चितपणे मी म्हणतो की, आपला विरोध नोंदविला गेला असता.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** भाऊ इतिवृत्त कशासाठी असत. आपण इतिवृत्ताला मंजुरी का देतो. मागच्या सभेत जे घडले ते जसेच्या तसे,

**श्री.नितीन लढ्ढा :-** जे घडले ते आपल्या कार्यवृत्तात आले आहे . आपला ठराव झाला आहे तसा

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** ते दिसत आहे भाऊ ते सुधरवा जे सत्य आहे. तुम्ही स्वत: आम्हाला आश्वस्त केलेल होत.तुम्ही स्वत: आम्हाला आश्वस्त केलेले होते की, तुमचा विरोध नोंदविलेला आहे. आणि तुमच्या जेष्ठतेचा आम्ही मान राखतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई तर तुमचा विरोध नोंदविला ना.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** आमचा तुम्ही कोणाच्या वाक्यानंतर बोललेले आहात नितीन भाऊ, तो तुम्हाला परत मी पान नंबर वाचुन दाखवु.

**सौ.दिपमाला काळे :-** रंजनाताई, भारतीताई आणि अश्विनभाऊच्या वाक्यानंतर तुम्ही बोललेले आहे.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** भारतीताई, रंजना सपकाळे आणि अश्विनभाऊ यांचेनंतर तुम्ही बोललेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जर मताची मागणी झाली असती तर नक्की मतांच विभाजन झाले असते आणि प्रत्येकाच मत नोंदविले गेले असते.

**सौ.दिपमाला काळे :-** आम्ही करतच होतो.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** नाही, अजुन वेगळी काय मागणी करावी लागणार. वेगळी काय मागणी करायची. आमचा विरोध आहे. तुम्ही बोलत आहात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई आपण मागणी केली परंतु चुकीच्या वेळेला केली.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** अजिबात नाही, नितीन भाऊं, सभा सुरु असतांनाच मागणी केलेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मत विभाजनाची मागणी नाही केलेली आहे.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** सुनिलभाऊच मत आपण कोणत्या तरतुदीने नोंदविले. आमचा विरोध आहे वारंवार आमचे सदस्य म्हणत आहे ते का नोंदविले नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नोंदविल जावु शकत नाही. आपण एक काम करा. इतिवृत्त पारित करावे आणि पुढच्या विषयाला सुरुवात करावी.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** हे इतिवृत्त पारित होणार नाही. आमचा विरोध आहे मतदान घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** इतिवृत्ताबद्दल कोणाचे काय मत आहे मतदान घ्या. आमचा इतिवृत्ताला विरोध आहे. या इतिवृत्तामध्ये बेकायदेशीर ठरावाची नोंद आहे त्यामुळे या इतिवृत्ताला आमचा विरोध आहे. जो पर्यंत आमचा या ठरावामध्ये विरोधाचा उल्लेख होणार नाही. हे इतिवृत्त पारित होणार नाही. पुढची सभा सुध्दा सुरु होणार नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** इतिवृत्त हा प्रस्ताव नसतो. इतिवृत्तावर मतदान होत नाही कायद्याने.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** इतिवृत्तावर मतदान होत नाही तर इतिवृत्त कशासाठी असते नितीन भाऊ. मागच्या सभेत जे झालं आहे ते जसेच्या तसे नोंदविण्यात यावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ग्रामेटीकल मिस्टेक झालेली असेल.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** मिस्टेकच झालेली आहे. मिस्टेकच झालेली आहे. आम्ही विरोध केला. तो ठरावात घेतला नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभा कामकाज चालवितांना काही मिस्टेक आपल्याकडून झाली. आपण योग्य वेळी मागणीच नाही केली. निश्चितपणे आपल्या मागणीचा आदर केला गेला असता.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** कोणतीच चुक झाली नाही

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण जवळपास त्यावेळेला एक तास दिले गेले, संपुर्ण सभागृहाने एक तास आपली चर्चा ऐकली.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आमचा विरोध आहे, आमचा विरोध आहे.

**सौ.भारती सोनवणे :-** आमचा विरोध आहे, सगळयांचा विरोध आहे. संपुर्ण भारतीय जनता पार्टीचा.

(या वेळेस सभागृहात गोंधळ सुरु होता व बऱ्याच महिला सन्मा.सदस्या “आमचा विरोध आहे” अशी घोषणा करत होते.)

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** संपुर्ण सभागृहात आमचा विरोध आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण हा विनाकारण हट्ट धरत आहात मला वाटत, ते काही संयुक्तीक नाहीये.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** बेकायदेशीर पध्दतीने येथे कामकाज चाललेले आहे. लोकशाहीची येथे निघृण हत्या येथे होत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, आपणास विनंती आहे की, आपण सभेचे कामकाज पुढे चालवावे.

**ॲड.सौ. शुचिता हाडा :-** महापौरताई, आमचा विरोध नोंदवुन घ्या.

**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्यांनी खाली बसुन घ्या. माझी आपल्याला सर्वांना विनंती आहे, सगळयांना विनंती आहे.

(सभागृहात गोंधळ सुरु असुन सर्व भाजपा महिला सन्मा.सदस्या "आमचा विरोध नोंदवुन घ्या" अशी घोषणा करत होते.)

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई, मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** आपले सगळयांचे बोलने मी ऐकुन घेतले. आपण दोन मिनीट खाली बसुन घ्या.

**सौ.दिपमाला काळे :-** आमचा विरोध नोंदवुन घ्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौरताई मला बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** मी बोलायचेच नाही का ? मी बोलु नको का ?

**सौ.दिपमाला काळे :-** सुनिलदादांच घेता येते तर आमचा का घेता येत नाही. सुनिलदादांच विषय नंतर घेतलेल आहे, त्यांच मत त्यांनी नंतर सांगितलेल आहे. त्यांच मत तुम्ही नोंदवु शकतात तर आमच का नाही.

**मा.महापौर :-** कैलास आप्पा, बोला तुम्ही, बाकीच्यांनी खाली बसा,

**श्री.कैलास सोनवणे :-** जो काही विषय होईल तो समजा, परंतु माझी तुम्हाला, तुम्हाला पर्सनली विनंती आहे तुम्हाला,

**मा.महापौर :-** अप्पा साहेब, या सभागृहामध्ये आपण पर्सनली एखाद्या पिठासीन अधिकाऱ्याला म्हणजे मला पर्सनली विनंती करु शकत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** चला ठिक आहे, मी माझी महापौर म्हणुन तुम्हाला विनंती करतो ताई, एक लक्षात ठेवा ताई मी मागेही बोललो होतो आता ही बोलतो, आपण महापौर आहे त्याच बरोबर आपण मुख्याध्यापिका पण आहे लक्षात घ्या आणि पहिल्या मिटींगला मतदानाच्या वेळेस पण असेच झाले. ते खरोखर चुकीचे होते हे सर्व सभागृहाला माहित आहे. आता परत हा दुसरा विषय, फक्त माझी तुम्हाला नम्र विनंती राहिल की, किमान आता या विषयाच जे होईल ते होईल, कोर्टात जे होईल ते होईल. परंतु याच्यापुढे आपण सभागृहाच कामकाज हे नियमानुसारच चालवावे. माझी नम्र विनंती राहणार आहे. कारण काय आहे याचे काही डाग आपल्या याच्यावर सुध्दा राहुन जातात. राहुन जातात आपल्या याच्यावर.

**श्री.सुनिल महाजन :-** अप्पा एक मिनीट, मी मागणी करतो येथे, त्या ठेकेदाराला बोलवा त्याची नार्को टेस्ट घ्या आणि ज्या दिवसापासुन हा ठेका सुरु झाला आहे, त्या दिवसापासुन त्याला कोण कोण सभापती भेटले, कोण महापौर भेटले, नार्को टेस्टमध्ये समजेल सगळ.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ना, हो ना. मी फोटो कशासाठी मागीतला, कशासाठी मागीतला मी, फोटो त्याचसाठी मागीतला की, हा काळा आहे का गोरा आहे. त्याला एकदा पाहु द्या भेटु द्या. तो कोणाकोणाला भेटला आहे. हे तर आपल्याला समजायला पाहिजे की नाही. हा भेटला कोणाला हे कश्या वरुन समजेल फोटो वरुन समजेल. मी तुम्हाला जे काही सांगितले आहे, मी तूमच्यापेक्षा मोठा आहे वयाने, लहान बहिण म्हणुन मोठा भाऊ म्हणुन मी तुम्हाला सांगत आहे. हे पुढे लक्षात राहु द्या. आचरणात आणा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ऐवढे काही तांत्रिक चुका घडत असतील. आपण मागच्या सभेचे काम कुठेही बेकायदेशीर झालेले नाही. मी पुन्हा सभागृहात सांगत आहे. सभागृहातील सदस्यांनी कोणत्यावेळी कोणती मागणी केली. निश्चितपणे त्यांच्या मागणीचा आदर होईल. सभागृहाच कामकाज हे नियमाप्रमाणेच चालेल. याची मी आपल्याला आता ग्वाही देतो की, सभागृहाच कामकाज हे नियमाप्रमाणेच चालेल. आणि मागच्या सभेचे जे कामकाज आहे ते पण नियमाप्रमाणेच झालेले आहे. मला वाटते महापौरताई आता आपण दुसऱ्या विषयाला सुरुवात करावी.

(बऱ्याच सन्मा.सदस्यांनी एकाच वेळी बोलायला सुरुवात केली व सभागृहात गोंधळ सुरु झाला त्यामुळे चर्चा व आवाज गोंधळामुळे ऐकु येत नाही. त्यामुळे नेमक कोण काय बोलले हे समजत नाही.)

**श्री.ललित कोल्हे :-** महापौरताई, महापौरताई.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई.

**श्री.ललित कोल्हे :-** महापौरताई, आता आपण सांगितले की, १८ कोटी वाल्याला समोर बोलवा. सर्व सन्मा.सभागृहाला विनंती आहे की, आपला १६२ कोटीचा जो ठेका झाला होता भुयारी गटार योजनेचा त्यांचा ही पण फोटो मागवुन घेण्यात यावा सभागृहात.

**श्री.कैलास सोनवणे :-** भुयारी गटारचा आणा, अमृत योजनेचा आणा.

**श्री.ललित कोल्हे :-** एल-१ वाल्याला काम भेटलं होतं अप्पा, एल-१ वाल्याला काम भेटल होतं. सगळया सभागृहाला सांगु इच्छितो, एल-१ वाल्याला काम भेटलं होतं आणि येथे सभागृहामध्ये एल-२ वाल्याला काम देण्यात आल.

**श्री.सुनिल महाजन :-** नार्को टेस्ट करुन घ्या सगळयांची.

**श्री.ललित कोल्हे :-** घ्या. नार्को टेस्ट.

**श्री.कैलास सोनवणे :-** बिलकुल घ्या. दुध का दुध और पानी का पानी होऊ द्या. अमृत वाल्याला बोलवा, भुयारी गटार वाल्याला बोलवा.एल.ई.डी. वाल्याला बोलवा सगळयांना बोलवा. सगळ क्लियर होईल. सगळ क्लियर होवुन जाईल.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई विषयाचे विषयांतर होत आहे. हा विषय बाजुला धडपटण्याचा प्रयत्न होत आहे. आमचा या विषयाला विरोध आहे आणि याच्यापुढे प्रत्येकाचे वैयक्तीक मत घेणे एक एकाचे जसे नितीन भाऊ म्हणत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आमचे इतिवृत्तातील ६ नंबर विषयाला विरोध नोंदवुन पुढचा विषय घेण्यात यावा. आमचा विरोध नोंदवुन घ्यावा.

(बऱ्याच सन्मा.सदस्यांनी एकाच वेळी बोलायला सुरुवात केली व सभागृहात गोंधळ सुरु झाला त्यामुळे चर्चा व आवाज गोंधळामुळे ऐकु येत नाही. त्यामुळे नेमक कोण काय बोलले हे समजत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** बघा कसे आहे याच्यावरती मतदान होत नाही ही कायदेशीर बाब आहे. उगाचच कशाला चर्चा अनावश्यक लांबवली जात आहे. मला काही कळत नाही. त्यांची जी भुमिका होती. ती त्यांनी सभागृहात व्यक्त केलेली आहे. पुढच्या इतिवृत्तात ती चर्चा कायम होईल. आपण पुढचा विषय घ्या ना अजेंडयावरचा

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई, सांगा ना, विरोध नोंदवा ना.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौर ताई, इतिवृत्तात विषय क्र.६ ला आमचा विरोध नोंदवा. महापौरताई इतिवृत्तात नोंद घ्या तुम्ही आता. कार्यवृत्त कायम करतांना विषय क्र.६ ला फक्त शुचिता हाडाचा नाही भारतीय जनता पार्टीचा. महापौरताई इतिवृत्तामध्ये नोंद घ्या तुम्ही आता. इतिवृत्त कायम करतांना विषय क्र.६ ला...

**मा.महापौर :-** मागच्या महासभेला ज्यावेळेला या विषयाचा ओहापोहा झाला होता त्यावेळेला जेवढे ठासुन तुम्ही आज बोलत आहात तसे त्यावेळेला कोणीही असे ठासुन बोलेले नाही.

(बऱ्याच सन्मा.सदस्यांनी एकाच वेळी बोलायला सुरुवात केली व सभागृहात गोंधळ सुरु झाला त्यामुळे चर्चा व आवाज गोंधळामुळे ऐकु येत नाही. त्यामुळे नेमक कोण काय बोलले हे समजत नाही.)

**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्यांनी खालील बसुन घ्यावे. बसुन घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई माझी विनंती आहे आपल्याला की, इतिवृत्ताचा विषय हा मान्य झालेला आहे, आपण पुढचा विषय घ्यावा.

**सौ.भारती सोनवणे :-** आमचा विरोध आहे. आमचा विरोध नोंदवुन घ्या. भारतीय जनता पार्टीचा विरोध नोंदवा. विरोध नोंदवुन घ्या आणि ठासुन पण बोलु नका.

(बऱ्याच सन्मा.सदस्यांनी एकाच वेळी बोलायला सुरुवात केली व सभागृहात गोंधळ सुरु झाला त्यामुळे चर्चा व आवाज गोंधळामुळे ऐकु येत नाही. त्यामुळे नेमक कोण काय बोलले हे समजत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा तो काही चर्चेचा भाग आहे का ?

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आपला विरोध विषय क्र.६ ला नोंदवुन घ्या. नाही आता विरोध नोंदवायचा विषय आहे ना. ते हो म्हणत आहे ना, मागच्या वेळेसारखे थोडी करणार आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही नाही, आता करणार नाही ना. आता करणार नाही ना.

**श्री.सुनिल महाजन :-** अप्पा, तुम्ही ठेकेदाराची खरी माहिती घ्या.

(बऱ्याच सन्मा.सदस्यांनी एकाच वेळी बोलायला सुरुवात केली व सभागृहात गोंधळ सुरु झाला त्यामुळे चर्चा व आवाज गोंधळामुळे ऐकु येत नाही. त्यामुळे नेमक कोण काय बोलले हे समजत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा या विषयाची कायदेशीर परिस्थिती समजुन घ्या. इतिवृत्ताच्या विषयावरती मतदान होत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** मग मागची जी गडबड झाली त्याचे काय ? मागच्या गडबडीवरुनच पाहुन असते हे इतिवृत्त.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** मागच्या गडबडीवरुनच पाहुन असते हे इतिवृत्त.

**श्री.अश्विन सोनवणे :-** इतिवृत्तात सुधारणा करता येत नाही का ? आपण कितीदा केलेल्या आहे सुधारणा, दोन तीन वेळा केलेल्या आहे मागे इतिवृत्तात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्या सुधारणा कोणत्या होत्या. ज्या ग्रॅमिटीकल मिस्टेक झालेल्या आहे. एखादा आकडा चुकलेला आहे. मागचा प्रस्ताव २ कोटी ९५ लाखाचा होता आणि लिहतांना ते २ कोटी ९० लाख लिहीला गेला, या प्रमाणे मिस्टेक जी आहे त्या दुरुस्त होतात.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मतदानाचा आकडा चुकला आहे, येथे पण आकडा चुकला आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मतदानाचा आकडा तो चुकीचा नाही का ?

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आकडा चुकला आहे, नितीन भाऊ आकडाच चुकला आहे. विरोधकांचा आकडा एकच लिहीला तुम्ही, नितीन भाऊ, आकडाच चुकला आहे तुमचा, तुम्हीच दुरुस्ती करायची आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई तुम्ही आता जी चर्चा केली ना ती संपुर्ण चर्चा ही पुढच्या कार्यान्वीत इतिवृत्तात येईल.

**श्री.सुनिल महाजन :-** तो पुरावा राहील तुमचा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आम्ही असे म्हणत नाही की, तुम्ही सभागृहनेता आहे. तुमचा विरोध, जितकी काही चर्चा आता झालेली आहे. ती जशीच्या तशी पुढच्या इतिवृत्तात येईल.

**श्री.सुनिल महाजन :-** हा, संपला ना विषय भाऊ. पुढचा विषय घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, आपणास विनंती आहे की, पुढचा विषय घ्या.

**सौ.भारती सोनवणे :-** विरोध नोंदवुन घ्या महापौरताई आमचा विरोध नोंदवुन घ्यावा.ठासुन बोलत आहे महापौरताई.

**सौ.मंगला चौधरी :-** आम्ही ठासुन बोलतो आहे ताई, मागच्या इतिवृत्तात आमचा विरोध आहे मग तुम्ही कशाला आमचा मतदानाचा आकडा वाढविलेला आहे. आमचा विरोध आहे या विषयाला.

**मा.महापौर :-** हे पुढच्या इतिवृत्तात येणार आहे. आता जे इतिवृत्त आहे ते कायम करण्यात येत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

(बऱ्याच सन्मा.सदस्यांनी एकाच वेळी बोलायला सुरुवात केली व सभागृहात गोंधळ सुरु झाला त्यामुळे चर्चा व आवाज गोंधळामुळे ऐकु येत नाही. त्यामुळे नेमक कोण काय बोलले हे समजत नाही.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो.

**श्री.सुनिल महाजन :-** हो घेण्यात येत आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** सुनिल भाऊ.

**सौ.दिपमाला काळे :-** तेव्हा तुम्ही नितीन लढ्ढा हो बोलले होते, आता तुम्ही हो बोलत आहे. फक्त चेंज करत आहे, आमचा विरोध हे महापौरताईंनी नोंदवावा. तेव्हा तुम्ही नितीन लढ्ढा हो बोलले होते, आता तुम्ही हो बोलत आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताईंना बोलु द्या.

**श्री.सुनिल महाजन :-** ताई, जरा सांभाळुन बोला, तुमच्यापेक्षा खुप मोठे आहे. जरा सांभाळुन बोला.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सुनिलभाऊ आम्हाला मतदान पाहिजे.

**सौ.दिपमाला काळे :-** सुनिलभाऊ, व्यवस्थीतच बोलत आहे. विचार करुनच बोलत आहे आम्ही.

**श्री.सुनिल महाजन :-** ताई व्यवस्थीत बोला, तुमच्या वडीलांसारखे आहे ते.

**सौ.दिपमाला काळे :-** हो मी म्हणत आहे ना की, वडीलांसारखे आहे. त्यांनी उलट आम्हाला समजुन घेतले पाहिजे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** सन्मानानेच बोलतो आम्ही, कधीच कोणाला अपमानाने बोललेलो नाही. आता ज्या पध्दतीने महापौरताई बोलल्या, तेव्हा ठासुन बोलायचे होते.

**सौ.दिपमाला काळे :-** मी काय चुकीच बोलली, मागे दादा बोलले होते आता तुम्ही बोलले मी काहीच चुकीच बोललेली नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरांनी डिक्लेअर करावे की, आमचा विषय क्र.६ ला इतिवृत्त कायम करतांना ठराव बेकायदेशीर झालेला आहे. हा विरोध नोंदवुन घ्यावा.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** अनुकुल मते किती आणि प्रतिकुल मते किती ते ही सांगावे.

**सौ.दिपमाला काळे :-** काय चुकीचे बोलली.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, तशी कायद्यामध्ये कुठलीही तरतुद नाही. हे इतिवृत्तात घ्याव आणि पुढील विषयास सुरुवात करण्यात यावी एवढी माझी आपणास विनंती आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१ हा मान्य करण्यात येत आहे विषय क्र.२ ला सुरुवात करण्यात यावी.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई आम्ही आज दिलेल्या पत्राची सुध्दा नोंद घेण्यात यावी आणि आम्ही हे इतिवृत्त कायम करतांना विषय क्र.६ मधील ठराव क्र.७४० तो बेकायदेशीर पध्दतीने झालेला आहे याला विरोध केलेला आहे भारतीय जनता पार्टीच्या उपस्थित सगळया सदस्यांनी पुन्हा सांगते, भारतीय जनता पार्टीच्या सगळे उपस्थित सदस्यांनी त्याची नोंद करावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** हा विषय झाल्यानंतर गॅप ठेवा कारण डायबिटीजचे पण पेशन्ट आहे. जेवणाची सुट्टी करुन टाकु. ५.०० वाजुन जातील परत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा, प्रशासनाने जेवण ठेवलेले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ना मग, वाया जाईन ना ते.

**मा.महापौर :-** पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-** पिठासीन अधिकारी यांनी घोषित केल्याप्रमाणे कार्यवृत्त कायम करण्यात आलेले आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आमची नोंद घेतली का ?

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.७५९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महासभा क्रमांक- ३५ दि.१४/०२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या ऑनलाईन (ॲपव्दारे) सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणेत येत आहे.

**मंजुर**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** २) महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्रमुख वैदयकीय अधिकारी, आरोग्य अधिकारी, वैदयकीय अधिकारी...

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नगरसचिव साहेब, आमच्या पत्राची नोंद घेतली आहे इतिवृत्तात.

**मा.महापौर :-** सुरु ठेवा तुम्ही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आमची विरोधाची नोंद घेतली आहे इतिवृत्तात ?

**मा.महापौर :-** इतिवृत्तातच येईल ना.

**श्री.सुनिल महाजन :-** ताई, इतिवृत्तात आपण जे पत्र दिलेले आहेत ते ही घेण्यात येतील. आणि तुमचे म्हणणे ही घेण्यात येतील.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरांना बोलु द्या ना सुनिल भाऊ. खुप शांतपणे सांगत आहे मी. महापौरांनी तसे डिक्लीयर करावे.

**मा.महापौर :-** कैलास अप्पा सांगितले, या मिटींग मध्ये जी चर्चा झाली, आपले पत्र असतील, आपले म्हणणे असतील.ते सगळे पुढच्या इतिवृत्तात येणार आहे. सगळयांची नोंद घेतली जाणार आहे .

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** इतिवृत्त कायम करतांना आमचा विषय क्र.६ चा विरोध कायम ठेवुन.

**मा.महापौर :-** ही पुर्ण चर्चा रेकॉर्डीगला येणार आहे. रेकॉर्डीग प्रमाणे पुर्ण इतिवृत्तात येणार आहे पुढच्यावेळेस.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नगरसचिव साहेब हे वाक्य इतिवृत्तात येऊ द्या. विषय क्र.६ ठराव क्र.७४० याला भारतीय जनता पार्टीचा विरोध आहे.

(बऱ्याच सन्मा.सदस्यांनी एकाच वेळी बोलायला सुरुवात केली व सभागृहात गोंधळ सुरु झाला त्यामुळे चर्चा व आवाज गोंधळामुळे ऐकु येत नाही. त्यामुळे नेमक कोण काय बोलले हे समजत नाही.)

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ताई नंतर आपल्याला

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपले पत्र जितके आहे ते सगळे येणार आहे.

**नगरसचिव :-** घ्यायचे आहेत का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो.

**श्री.सुनिल महाजन :-** हो.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो.

**नगरसचिव :-** डिक्लीयर करा मॅडम.

**मा.महापौर :-** किती वेळाला बोलायला लावत आहे. काय सांगितले मी, ताईंनी दिलेले पत्र आहे. आपली जी चर्चा आहे. ते सर्व पुढच्या इतिवृत्तामध्ये येणार आहे आणि चुकीचा पायंडा हा आहे की, पुढचा विषय झाल्यानंतर मागच्या विषयाची चर्चा आपण सगळे करतात आणि इतिवृत्तात चुकीच येतं आणि शेवटी आपला आक्षेप येतो की, चुकीच्या पध्दतीने महासभा चालविली जाते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** योग्य आहे.

**मा.महापौर :-** आता जो विषय चालु असेल त्याच विषयाच्या संदर्भात प्लीज मी सगळयांना विनंती करते. कळकळीची विनंती करते, आग्रहपुर्वक विनंती करते की, ज्या विषयाची चर्चा चालु असेल त्याच विषयावर आपण बोलाव.

**नगरसचिव :- विषय क्रं:-** २) महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्रमुख वैदयकीय अधिकारी, आरोग्य अधिकारी, वैदयकीय अधिकारी यांना अनुज्ञेय व्यवसायरोध भत्ता (N.P.A.) शासन निर्णयानुसार लागू करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे .

**श्री. नितीन बरडे :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.महेश चौधरी :-** महापौरताई मला बोलायचे आहे. सदरचा विषय मंजुर करत असतांना काही अपेक्षा मागच्या मिटींगमध्ये आयुक्त साहेबांकडुन घेतल्या होत्या दवाखाने संदर्भात जळगांव शहरातील नागरीकांकडे मला वाटत काही कोणी लक्ष देत नाही. असे माझे मत झाले आहे. कारण नगरसेवकांना असे कोणी काही सिरीअसपण्याच्या संदर्भात वाटत नाही. शहरातल्या दवाखाने आज कोणी लक्ष देत नाही परिस्थिती काय आहे याची सत्य परिस्थिती आहे.

(बऱ्याच सन्मा.सदस्यांनी एकाच वेळी बोलायला सुरुवात केली व सभागृहात गोंधळ सुरु झाला त्यामुळे चर्चा व आवाज गोंधळामुळे ऐकु येत नाही. त्यामुळे नेमक कोण काय बोलले हे समजत नाही.)

**श्री.महेश चौधरी :-** मला बोलु द्या मग तुम्ही बोला. माझे बोलणे संपु द्या, प्रशासन ज्या पध्दतीने काम करत आहे. रक्त लघवी तपासणी असेल, प्रसुतीगृहाचा विषय असेल. ज्या पध्दतीने प्रशासन कामकाज करत आहे. त्याच्या संदर्भात मी वारंवार आवाज उठवत असतांना सुध्दा कुठलाही नगरसेवक मला त्या गोष्टीच गांभिर्य करतांना दिसलं नाही म्हणुन मी या संदर्भात बोललो. काही चुकल असेल तर माफ करा.

**श्री.सुनिल महाजन :-** परत तेच सांगत आहे तुम्ही नगरसेवक लक्ष देत नाही.

**श्री.महेश चौधरी :-** नाही, गांभिर्याने घेत नाही आपण हा विषय, मी वारंवार त्याच्या विनंत्या केल्या. मागच्या मिटींगलाही बोललो होतो. पण त्याचा पाठपुरावा काही मला दिसत नाही. त्याच्यात काही सुधारणा झालेली दिसत नाही. पहिला विषय हा आहे. नंतर मागचा जो राष्ट्रीय प्रोग्राम होता. त्याच्यानंतर आता जो NUHM प्रोग्राम सद्या राबविला जातो. त्याच्या ज्या पध्दतीने प्रोग्रामच्या ज्या काही सिस्टम आहे. त्या पध्दतीने तो राबविला जातो. आपण कोविड काळामध्ये व्हॅक्सीनेशन असेल किंवा कोविड सेंटर चालवायचे विषय असेल. त्याच्यामध्ये बराच आपला वेळ गेला. अशी ती दुर्घटना होती. त्याच्यामुळे सगळे कोविडच्या लोकांसाठी ते लागत होते. व्हॅक्सीनेशन खुप चांगल झाल. व्हॅक्सीनेशन संदर्भात मी मागच्या वेळेस सुध्दा सांगितले होते की, डॉक्टर पासुन ते आशा सेविकेपर्यंत प्रशासनाने त्यांचा सन्मान केला पाहिजे. ही मागच्या वेळेस सुध्दा मी ही मागणी केली होती. आता विषय असा आहे की, जे ५० हजार जे कोविड मध्ये मृत्यु पावलेले जी लोक आहेत. त्यांना ५० हजाराची मदत शासनाकडुन केली जात आहे. त्याच्या संदर्भात माझा एक आक्षेप आहे. RTPCR, AntiGen, RTPCR or AntiGen or HRCT असे त्याच्यात म्हटले गेले आहे. असे त्याच्यात म्हटले गेलेले आहे. असे असतांना जर

एखाद्या पेशन्टची इयुमिनीटी स्ट्रॉंग असेल आणि ७ दिवसापर्यंत त्याच ते लक्षात नाही आले. तर कदाचित तो आदल्या दिवशी तो निगेटीव्ह ही येवु शकतो. पण त्याचा HRCT जो आहे त्याचा स्कोर जास्त असला, तर त्याच्या संदर्भात त्याला पॉझिटीव्ह घेतला पाहिजे. कारण HRCT मध्ये तशी एक नेमणुक असते की, याचा स्कोर जास्त आहे. जर १५-१६ च्यावर त्याचा स्कोर असेल. ते आपण ते पॉझिटीव्ह धरला जातो आणि अशीच शासनाची गाईडलाईन्स आहे. मग मी सिव्हील मध्ये गेलो, तेथे तसा बोर्ड होता. पण एक विसपुते नावाचा व्यक्ती आहे. त्याचा खुप बारका पोरगा आहे. तो पोरगा आठ दिवस बिचारा आपल्या दारात फिरला, तो शाहु मध्ये आणि त्याला HRCT चा स्कोर २२ असतांना सुध्दा त्याला अक्षरश: हाकलुन दिले. जेव्हा कोणी तरी त्याला सांगितले की, समोर नगरसेवक बसले आहे तर ते माझ्या कडे आले. मी डॉक्टर साहेबांना विनंती केली की, तुम्ही याकडे सहानभुतीने बघा. HRCT चा विषय जर त्याच्यात आहे. तर तशी नोंद झाली पाहिजे. तसा त्याला मंजुरी झाली पाहिजे होती प्रकरण. पण ते मंजुर झाल्याच्या ऐवजी नामंजुर झाल, मग ते वांरवार तेथे गेल्यानंतर सुध्दा ते होत नव्हते. मी ते एका डॉक्टर व एका वैद्यकीय याच्याकडे जावुन ते नेटवर चेक केले. त्या व्यक्तीचा रिपोर्ट पॉझिटीव्ह होता. पण तरी सुध्दा सिव्हील वाल्यांनी तो रिपोर्ट पॉझिटीव्ह दिला नाही. मी स्वत: गेलो तरी सुध्दा त्यांनी सांगितले की, रिपोर्ट निगेटीव्ह आहे. मी तसा देऊ शकत नाही. मी आभार मानतो लोकमतच्या त्या पत्रकाराचे, तो पोरगा माझ्यानंतर एका लोकमतच्या पत्रकाराकडे गेला, त्या पत्रकाराने सिव्हील मध्ये त्याच्या लेव्हलने तेथे चर्चा केली. आणि आज तो पॉझिटीव्ह चा रिपोर्ट आता त्या मुलाच्या हातात आहे आणि आज तेथे त्या प्रकरणाची दखल घेतली जाणार आहे. ते रिजेक्ट केल गेलेल प्रकरण आणि आज नविन फार्म भरत आहे म्हणजे जर अशी भुमिका घेतली गेली. तर ती चुकीची होईल. मला रावलाणी साहेबांनी सांगितले. त्यांचा दोष नाही. मला त्यांनी असे सांगितले की, वरतुन भुमिका चेंज झाल्या. फक्त RTPCR आणि AntiGen च पकडल जाईल. HRCT पकडल जाणार नाही. याची प्रेसनोट झाली पाहिजे. लोकांपर्यंत हा विषय गेला पाहिजे. जो पर्यंत हा विषय लोकांपर्यंत जात नाही. तो पर्यंत लोकांमध्ये ते संभ्रम निर्माण होईल. आणि लोकांचे हाल होतील. तिसरा शेवटचा विषय असा. शेवटचा विषय जसे आपण यांना काही भत्ते मंजुर करत आहात. तसा एक वर्षापुर्वी रु.१०००/- चा ANM, GNM आणि आशासेविका यांचा रु.१०००/- चा भत्ता मनपातर्फे दिवाळीमध्ये देण्याचा निर्णय झाला होता. आणि त्याच्यासंदर्भात मला वाटत, तुम्ही त्यांचा अकाऊंट नंबर घेतलेला आहे आणि IFSC Code घेतलेला आहे. एक वर्ष झाले आहे. आपण त्यांना सादा रु.१०००/- चा नगरपालिकेकडुन भत्ता दिला जात नाही. तर याची सुध्दा दखल घ्यावी आणि आपण त्यांना भत्ता द्यावा अशी मी आपणास विनंती करतो.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.७६० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत वैदयकीय अधिकारी डॉ.राम किशनचंद रावलानी व इतर ७ वैदयकीय अधिकारी यांनी शासन निर्णयानुसार व्यवसायरोध भत्ता मिळणेबाबत दि.२८/१०/२०२१ रोजीच्या अर्जान्वये विनंती केलेली आहे.

व्यवसायरोध भत्ता हा इंडियन मेडीकल कौन्सील ॲक्ट १९५६ किंवा डेन्टीस्ट ॲक्ट १९४८ खाली नोंदणी केलेल्या वैदयकीय पदवीधरांना शासन विहीत दराने अनुज्ञेय आहे. उक्त वैदयकीय अधिकारी हे वैदयकीय पदवीधर असून म.न.पा. आस्थापनेवर व अधिसंख्य पदावर कार्यरत सदरील वैदयकीय अधिकारी खाजगी वैदयकीय व्यवसाय करीत नसल्याने शासन नियमान्वये त्यांना वेळोवेळी शासनाव्दारे विहीत दराने व्यवसायरोध भत्ता अनुज्ञेय आहे.

शासनाने व्यवसायरोध भत्त्याचे दर पुढीलप्रमाणे जाहिर केलेले आहे.

| शासन निर्णय दिनांक | व्यवसायरोध भत्त्याचे दर/प्रमाणे |
|---|---|
| दि.०७/०८/२०१२ | राज्य शासनाच्या महाराष्ट्र वैदयकीय व आरोग्य सेवेतील रुग्ण सेवेशी संबंधीत जिल्हा शल्य चिकित्सक, वैदयकीय अधिक्षक, वैदयकीय अधिकारी, विशेषज्ञ आणि वैदयकीय अधिकारी गट-अ (राज्यस्तर) या संवर्गातील वैदयकीय अधिकाऱ्यांना सुधारीत व्यवसायरोध भत्ता मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. आता शासनाने राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य सेवेत कार्यरत असणाऱ्या सर्व वैदयकीय अधिकारी यांना (ज्यांना |

| | |
|---|---|
| | व्यवसायरोध भत्ता मिळतो तसेच ज्यांना व्यवसायरोध मिळत नाही असे दोन्ही प्रकारचे वैदयकीय अधिकारी मिळून) ६ व्या वेतन आयोगातील वेतन श्रेणीनुसार मुळ वेतनाच्या ३५% व्यवसायरोध भत्ता मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतू त्यांना मिळणारे एकूण वेतन अधिक व्यवसायरोध भत्ता यांची एकत्रित रक्कम दरमहा रु.८५०००/- पेक्षा जास्त नसावी. |
| दि.२०/१०/२०१२ | संदर्भ क्र.६ येथील सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक मवैअ-२०११/प्र.क्र.६२६/११/सेवा -३, दि.०७/०८/२०१२ मधील प्रथम परिच्छेदातील अंतिम वाक्य "परंतू त्यांना मिळणारे एकूण वेतन अधिक व्यवसायरोध भत्ता यांची एकत्रीत रक्कम दरमहा ८५०००/- पेक्षा जास्त नसावी" याऐवजी "परंतू त्यांना मिळणारे मुळ वेतन (मुळ वेतन म्हणजे संबंधीत पदाचे विहित वेतन बँड मध्ये आहरीत करीत असलेले वेतन + अनुज्ञेय ग्रेड पे असे एकूण वेतन) अधिक व्यवसायरोध भत्ता यांची एकत्रित रक्कम दरमहा रु.८५०००/- पेक्षा जास्त नसावी" असे वाचण्यात यावे. |

सदरील दोन्ही शासन निर्णय मनपाला लागु असल्याचे दिसून येत नाही परंतु सार्वजनिक आरोग्य विभागात व मनपात कार्यरत वैदयकिय अधिकारी आणि पर्यवेक्षकीय / कार्यकारी पदावर कार्यरीत MBBS / BAMS / DMS & RURAL पदवी असणारे सारखेच काम करीत असल्याने त्यांना मा.महासभा ठराव क्र.८३० दि.२०/१०/२०२० अन्वये डॉ.सौ.नेहा भारंबे यांना व्यवसायरोध भत्ता लागु करण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच मा.स्थायी समिती ठराव क्र.७२८ दि.३१/०५/२०११ अन्वये डॉ.श्री.राम रावलाणी व इतर चार वैदयकीय अधिकारी यांना दि.०१/१०/१९९८ पासुन व्यवसायरोध भत्ता लागु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. मात्र मा.स्थायी समिती ठराव क्र.७२८ दि.३१/०५/२०११ च्या ठरावातील डॉ.श्री.राम किशनचंद रावलाणी हे सदयस्थितीत कार्यरत आहे व उर्वरित वैदयकीय अधिकारी हे सेवानिवृत्त झालेले आहेत. सदर ठरावान्वये सदयस्थितीत डॉ.रावलाणी व डॉ.भारंबे यांच्या बाबतीत मा.महासभा / मा.स्थायी समिती ठराव प्राप्त झालेले आहेत व उर्वरित कार्यरत वैदयकिय अधिकारी यांचे बाबतीत कुठलाही ठराव प्राप्त नाही. मात्र उक्त ठरावानुसार व इतर कार्यरत वैदयकीय अधिकारी यांना सुध्दा व्यवसायरोध भत्ता लागु केलेला आहे. परंतु महाराष्ट्र महानगरपालिकाअधिनियम कलम ५१ अन्वये वेतन व भत्ते ठरविण्याचा अधिकार राज्य शासनाला असल्याने मा.महासभेचा ठराव घेवुन राज्य शासनाला पाठविणे उचित होईल.

महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत उपरोक्त वैदयकीय अधिकारी हे MBBS, BAMS, DMS, & RURAL ही वैदयकीय अर्हता धारण करित असल्याने व त्यांनी इंडियन मेडीकल कौन्सील ॲक्ट १९५६ खाली नोंदणी केलेली असल्याने १) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.६२६/११/सेवा-३ दि.०७/०८/२०१२, २)सार्वजनिक आरोग्य विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.मवैअ-२०११/प्र.क्र.६२६/११/सेवा-३ दि.२०/१०/२०१२ शासन निर्णयातील तरतुदीनुसार व्यवसायरोध भत्ता मिळण्यास ते पात्र ठरतात.

यापूर्वी मा.महासभा ठराव क्र.८३० दि.२०/१०/२०२० मा.स्थायी समिती ठराव क्र.७२८ दि.३१/०५/२०११ ठरावान्वये महापालिकेत कार्यरत वैदयकीय अधिकारी यांना व्यवसायरोध भत्ता लागू करणेस मान्यता प्रदान केलेली असल्याने तसेच उपरोक्त कार्यरत प्रमुख वैदयकीय अधिकारी, आरोग्य अधिकारी, वैदयकीय अधिकारी यांनी खाजगी वैदयकीय व्यवसाय करीत नसल्याची प्रतिज्ञापत्रे सादर केलेली असल्याने वरील शासन निर्णयातील तरतूदीनुसार त्यांना पुर्वलक्षी प्रभावाने व्यवसायरोध भत्ता लागू करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका

अधिनियम कलम ५१ नुसार राज्य शासनाच्या मंजूरीसाठी पाठविणेकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | | | |
|---|---|---|---|
| **अनुकूल मते** | **:- ६६** | **प्रतिकुल मते :- ००** | |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** | | |
| **अनुमोदक** | **:- बरडे नितीन मनोहर** | | |

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ३) शिवाजी नगर रेल्वे उड्डाण पुलावर तसेच पुलालगतच्या दोन्ही बाजुच्या रस्त्यावर ९ मिटर उंचीचे (octagonal) पोल उभारुन पथदिव्यांची व्यवस्था करणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे. पण याच्यामध्ये मा.आयुक्त महोदय यांनी प्रस्ताव पाठविला आणि आपण DPDC कडुन निधी मागण्याच्या संदर्भात प्रयत्न करत होतो. परंतु काही कारणास्तव DPDC कडुन निधी मिळण्यामध्ये विलंब झाला किंवा निधी उपलब्ध होवु शकला नाही. तर कमीत कमी मनपा फंडातुन त्याची तरतुद करुन ठेवावी. कारण काय होईल की, आता साधारणत: एक दोन महिन्याच्या कालावधीमध्ये पुल कार्यान्वीत होईल आणि पुल तयार असेल परंतु पथदिव्यांची व्यवस्था नसेल. तर नागरीकांना त्याचे हाल सोसावे लागतील. ज्या पध्दतीने आपण मागील बघितलेला अनुभव जो आहे की, पोल शिफ्टींग कोणी करावे. याच्यामध्ये पुलाच काम जवळपास वर्षभर लटकलेले आहे. तर त्याची पुनरावृत्ती होता कामा नये. म्हणुन DPDC कडुन निधी मिळविण्याचा प्रयत्न प्रथमत: करावा परंतु जर कधी ती शक्यता सोयीस्कर वाटली. तर निश्चितपणे महानगरपालिकेने आपल्या निधीतुन तसा प्रस्ताव तयार करुन तशी मान्यता सुध्दा DPDC च्या सोबत मनपा निधीतुन घेण्याच्या संदर्भातली सुचना आपण स्विकारावी.

**श्री. नितीन बरडे :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.आयुक्त :-** अधिसुचनेमध्ये / ठरावामध्ये अशी आवश्यकता भासु नये यासाठी आवश्यकता विचारात घेवुन मनपा निधीतुन परंतु हा जो प्रस्ताव आपण ठेवलेला होता. याच्यासाठी हायवे जो आपल्या शहरामधुन गेलेला आहे. त्याचा जो स्ट्रिट ड्रायव्ह व्यवस्थेचा आपण ३ कोटी रुपयाचे आपले टेंडर होत. त्याच्यात जी आलेली निविदा आहे. ती ९% बिलो आलेली आहे. त्यामुळे त्याच्या मध्ये आपला २७ ते ३० लाख रुपयांच सेव्हिंग होणार आहे. त्याच्या मधुन आपल्याला हे काम प्रस्तावीत करण्याच्या संदर्भामध्ये मी मा.जिल्हाधिकारी यांच्याशी यापुर्वी चर्चा केलेली आहे आणि आपल्याला याच वर्षी महासभेचा ठराव करुन घेवुन मा.जिल्हाधिकारी महोदय यांच्याकडे पाठवु या. हे जे आपल्याला टेंडर बिलो आहे ९% चा जे सेव्हिंग होणार आहे. या सेव्हिंगच्या रकमेमधुन निधी आपल्याकडे यासाठी ऑलरेडी मंजुर आहे. तर तुम्हाला DPDC ला मंजुरी द्यायला पुन्हा अडचण येवु नये. मा.जिल्हाधिकारी महोदय आणि मा.पालकमंत्री महोदयांना आपण रिक्वेस्ट करु . त्याच्यामधुन शिल्लक राहणारा बचत निधीमधुन आपण त्या कामाला प्रशासकीय मंजुरी मागवु या आणि मला वाटते ती आपल्याला मिळु शकेल. तरी ही आपण म्हणत आहात त्याप्रमाणे त्यातही जर काही अडचण आली. तर हा प्लॅन बी म्हणुन हा ठराव करु.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** शिवाजी नगर पुलाची जशी लाईटांची व्यवस्था केली, टी मार्ग हा पुलाचा नकाशा आहे. टी होतो की वाय होतो काय माहिती आता तेच भांडण चालु आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** पण हा विषय पुलाचा नाही लाईटचा आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** लाईटाचंच सांगत आहे आप्पा. जसा लाईटाचा विषय घेतला त्याच्या बाजुला दोघी जिने का घेतले नाही. जिने कोण करणार.

**श्री.कैलास सोनवणे :-** जिने आणि लाईट मध्ये फरक आहे ना. तुम्ही लाईटाच बोला ना.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** पुलावर चढेल कसा मानुस. मग त्याची पण व्यवस्था करावी लागेल ना. पुलावर चढेल कसा?

**श्री.नितीन लढ्ढा** :- नवनाथ भाऊ ती चर्चा येथे करुन काही उपयोग नाही. कारण काय आहे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिनस्त असलेला तो विषय आहे. या संदर्भात आपण पालकमंत्री महोदयांना विनंती करु. पालकमंत्री महोदयांना विनंती करुन बी.ॲण्ड सी च्या माध्यमातुन ज्या ज्या पथदिवे व्यवस्था त्यांना अपेक्षित आहे त्या पध्दतीने पालकमंत्र्यांकडे विनंती करुन ती तशी सार्वजनिक बांधकाम विभागाला डावलण्यात येईल.

**मा.आयुक्त :-** याच्या संदर्भामध्ये आपण जे पत्र दिलेल होत महानगरपालिकेने आणि पी.डब्ल्यु.डी.चे आधिकारी आणि त्यांची एजन्सी यांच्या उपस्थितीत ही चर्चा झालेली आहे. आपण दोन ठिकाणी जी पुलावर पायऱ्यांची मागणी करत आहे. त्याच्या पलीकडच्या बाजुला आपल्याला मागणी करता येणार नाही टेक्नीकली असे पी.डब्ल्यु.डी. अधिकाऱ्याच म्हणण आहे. परंतु आपल्याला इकडच्या म्हणजे नवीपेठ साईडला जे आहे. त्या ठिकाणी आपण जिल्हा परिषदेच्या ठिकाणी आपली रेल्वेची हद्द संपल्यानंतर त्या ठिकाणी पायऱ्यांची व्यवस्था करु अश्या प्रकारच्या जिल्हाधिकाऱ्याच्या समवेत चर्चेमध्ये पी.डब्ल्यु.डी.च्या अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे आपल्याला त्याच्यामध्ये पाठपुरावा करुन जी काही दोन्हींबाजुला पायऱ्यापैकी जेथे तांत्रिक दृष्टया शक्य असेल. त्या ठिकाणी पायऱ्यांची व्यवस्था आपण करुन घेण्याच्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करु एका ठिकाणी तर करणेबाबत त्यांनी कळविले आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.२ आणि ३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.७६१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील टॉवर चौकाकडुन शिवाजी नगरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील रेल्वे उड्डाण पुल उभारणीचे काम प्रगती पथावर असून अंतीम टप्प्यावर आहे. उभारणी करण्यात येणाऱ्या उड्डाण पुलावर तसेच लगतच्या बाजुच्या रस्त्यावर दिवाबत्तीची व्यवस्था करणे आवश्यक आहे. उड्डाण पुल उभारणीचे काम सार्व.बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांचेमार्फत करण्यात येत असून उड्डाण पुलावर पथदिव्यांची व्यवस्था करणे बाबत सार्व.बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांचे अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता सार्व.बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांच्या अधिकाऱ्यांनी उड्डाण पुल उभारणीच्या कामा अंतर्गत पथदिव्यांची व्यवस्था करणेच्या कामाचा अंतर्भाव नसल्याची माहिती दिली. उड्डाण पुलावर पथदिव्यांची व्यवस्था करणे संदर्भात सन्मा.महानगरपालिका सदस्य तसेच नागरिकांची मागणी असुन उड्डाण पुल उभारणीच्या कामा अंतर्गत पथदिव्यांची व्यवस्था करणेचा अंतर्भाव नसल्याने पथदिव्यांची व्यवस्था करणेचे काम महानगरपालिकेस करावे लागेल. या कामी सार्व.बांधकाम विभागाच्या सन २०२१-२२ जिल्हा दर सुचीनुसार एकुण रक्कम रु.३२,२२,३५४/- मात्र खर्च अपेक्षीत असून प्रस्तृत काम शासकीय निधी उपलब्ध करुन घेवून शासकीय निधीतून करणेसह रक्कम रु.३२,२२,३५४/- मात्रच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदरहु कामी जिल्हा नियोजन समितीकडील नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत निधी उपलब्ध करुन मिळणे बाबत तथा नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत या निधी उपलब्ध नसल्यास इतर शासकीय निधीतुन / योजने अंतर्गत निधी उपलब्ध करुन मिळणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, जिल्हा नियोजन समिती जळगांव यांचेकडेस पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सदर कामी जिल्हा नियोजन समितीकडुन उपरोक्त नमूद योजनेतून निधी उपलब्ध न झाल्यास सदर कामी महानगरपालिकेच्या निधीतून आवश्यक निधी उपलब्ध करुन देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ४) २०२१-२२ चे सुधारीत व २०२२-२३ चे मुळ अंदाजपत्रकाचे अनुषंगाने काही लेखाशिर्षामध्ये बदल करण्यात आलेले असुन त्यानुसार केलेले बदल सन २०२०-२१ चे वार्षिक लेख्यात दुरुस्त करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**श्री.नितीन बरडे :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.७६२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सन २०२०-२१ चे वार्षिक जमाखर्च लेख्यास महासभा ठराव क्र.६८४ दि.१५/१२/२०२१ अन्वये मंजुरी दिलेली आहे. परंतु सन २०२१-२२ चे सुधारीत व सन २०२२-२३ चे मुळ अंदाजपत्रकाचे अनुषंगाने काही लेखाशिर्षामध्ये बदल करण्यात आलेले असुन त्यानुसार खालील प्रमाणे बदल सन २०२०-२१ चे वार्षिक लेख्यात करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्षाचे नांव | रक्कम | करण्यात आलेला बदल |
|---|---|---|---|
| १ | महसुली खर्च अ-१ सामान्य प्रशासन अकृषकसारा | २५००००००/- | देवघेव (असाधारण जमाखर्च) मधुन कमी करुन महसुली खर्चाकडे वर्ग |
| २ | महसुली खर्च ब-१ अग्नीशमन विभाग अग्नीशमन साधनसामुग्री | ६८८५३३/- | आग सुरक्षा निधी अंतर्गत झालेला खर्च |
| ३ | महसुली खर्च ब-२ विदयुत व्यवस्था विभाग - नविन विदयुत पोल उभारणे | ५८७८६५/- | महसुली खर्चाकडुन भांडवली खर्च भाग-१ कडे वर्ग |
| ४ | महसुली खर्च क-१९ सार्वजनिक बांधकाम विभाग - रस्ते व्यवस्था व दुरुस्ती | ६००५४२२/- | सर्वसाधारण रस्ते अनुदाना अंतर्गत झालेला खर्च |
| ५ | महसुली खर्च क-६ दवाखाने व सुतिकागृहे-टेलीमेडीसीन | ८६५२१३८/- | सदरची रक्कम एकुण मध्ये समाविष्ट करुन घेणे. |
| ६ | भांडवली खर्च- आग सुरक्षा बळकटीकरण | ६८८५३३/- | जिल्हा नियोजन समिती मार्फत प्राप्त अनुदानातुन झालेला खर्च |

उपरोक्त प्रमाणे सन २०२०-२१ चे वार्षिक लेख्यात बदल करणेस व नविन वार्षिक लेखे तयार करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ५) जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या बालगंधर्व नाटयगृह, सागर पार्क मैदान, महानगरपालिकेचे उदयान, बगीचे खुल्या जागा अनामत घेऊन जागा तात्पुरत्या स्वरुपात भाडयाने देणेकामी नव्याने धोरण ठरविणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.
**श्री.अनंत जोशी :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे.
**मा.महापौर :-** बोला.

**श्री.अनंत जोशी :-** सन्मा.महापौर महोदया, सन्मा.सभागृह, या ठिकाणी प्रस्तावात दराबाबत प्रशासनाचे मी या ठिकाणी अभिनंदन करु इच्छितो. देर आऐ दुरुस्त आए. ही गोष्ट खुप भारी बसते येथे. कारण त्याचा गैरवापर किंवा अती कमी जे चार्जेस ठेवलेले आहे. याच्यामध्ये खुप जास्त प्रमाणात लोकांना त्रास सहन करावा लागायचा. याच्यामध्ये आणखी त्या गोष्टींना ब्रेक लागेल.या ठिकाणी बालगंर्धवाचा उल्लेख केलेला आहे. माझी सभागृहाला विनंती आहे. ते आपल्या एरियातील वारसाच नाटयगृह आहे. शहरातील एकमेव ओपन थिएटर आहे. महापालिकेच्या मालकीच आणि याचा एक इतिहास आहे आपल्या बालगंर्धवाला या ठिकाणी आपण बाकी जे दिलेले आहे, लग्न, वाढदिवस, मुंजे, साखरपुडा, हे नाटयगृहात नको व्हायला अशी सगळया सभागृहाला विनंती आहे. माझे काही ऑब्जेक्शन नाही पण वर्षानुवर्ष परंपरा तेथे लग्न, मुंजे, साखरपुडा, वगैरे हेच कार्यक्रम चालतात. नाटयगृह आहे शेवटी, त्याला इतक्या वर्षाचा वारसा आहे. खुप मोठा इतिहास आहे. आपल्या ओपन थिएटरला इतर गोष्टींना आपण काही भाडे वगैरे कमवुन ओपन स्पेस असतील इतर ठिकाणी ते देणे ठिक आहे. पण नाटयगृह या ठिकाणी कमीत कमी लग्न, साखरपुडा, मुंजे हे कार्यक्रम नको. तेथे असे बंधनकारक पाहिजे की, कला क्षेत्राशी निगडीत असेल मग ते नाटय असेल किंवा इतर कोणतीही कला असेल त्याच्याशी संबंधीत फार फार तर धार्मिक सप्ताह होतात, फार फार तर धार्मिक कथा या व्यतिरिक्त त्या ठिकाणी इतर कोणत्याही गोष्टीला परवानगी देण्यात येवु नये. अशी सभागृहाला विनंती आहे. महापौरांना विनंती आहे. जसे या ठिकाणी दिलेले आहे. लग्न,वाढदिवस इतर खाजगी कार्यक्रम रु.७५०००/- दिलेले आहे. लग्न/वाढदिवस/मुंज / इतर खाजगी कार्यक्रम आणि नाटक / सर्कस / क्रिडा रु.१०,०००/- व्यवसायिक प्रदर्शन/ आनंद मेळा रु.१५,०००/- आता आपण लग्न समारंभावाल्यांशी रु.७५०००/- घेता योग्य आहे. आता १० - २० हजार स्क्वेअर फुटच्या लॉनसाठी लोकं लाखो रुपये मोजत आहे. ४ आणि ५ हजार स्क्वेअर फुटाचा जरी हॉल दिला तरी त्याचे लोकं ३ आणि ४ लाख रुपये मोजतात. आणि सागर पार्कसाठी ४.५ ते ५ ऐकर जागा असली त्याच्यामुळे रु.७५०००/- पेक्षा जास्त जरी घेतले तर त्याला काही अडचण नाही. याच्यात आणखी एक मुद्दा असा आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** वाढवुन घ्या ना लग्नासाठीची फी, लग्नाची फी वाढुन घ्या रु.१,२५,०००/- करुन घ्या.

**श्री.अनंत जोशी :-** मुळातच

**श्री.सुनिल महाजन :-** ५-५ लाखाचे डेकोरेशन करतो तेथे.

**श्री.अनंत जोशी :-** अप्पा साहेब, मुळातच त्या ठिकाणी लग्न समारंभ झालेच नको पाहिजे. पण मी त्याचा हट्ट धरणार नाही. मोकळे मैदान आहे. त्याच्यावर आर्कीटेक्ट वेगळेच आहे. म्हणजे ते क्रिडांगण पण नाही आणि इतर पण नाही त्याचा आर्कीटेक्ट वेगळाच आहे. गांवात महापालिकेची जागा आहे. त्यामुळे लोकांना सुविधा मिळते त्या बद्दल हरकत नाही असावी. चार चार पाच पाच लाख रुपये लोकं लॉनचे आणि हॉलचे भाडे देत असतील. येथे एवढे कमी ठेवण्यात कारण नाही. देतात ते. सागर पार्कवर जी लग्न होतात. ते मोठयांचेच होतात. म्हणजे जे खर्च करतात त्यांचेच होतात. १० हजार, २० हजार, ५० हजार तिथे येतात. तर आपण वाढवायला काही हरकत नाही. दुसरा विषय माझी एक विनंती अशी होती या ठिकाणी की, आपण हे जे दर ठरविलेले आहे. एका दिवसाचे म्हणत आहोत ना आपण आता जर रु.७५०००/- लग्नासाठी आपण घेणार आहोत. त्याठिकाणी जी लग्न होतात त्याची तयारी १५ दिवस आधी सुरु होते. आणि त्याची आवरासावर १०-१२ दिवसानंतर होते. म्हणजे ते एका लग्नाचे रु.७५०००/- आपण घेत असतो. ते सागर पार्क जे आहे ते कमीत कमी १५ ते २० दिवस त्यांच्या ताब्यात असते. त्या लग्नाच्या कार्यक्रमासाठी किंवा जो काही मोठा कार्यक्रम असेल. लग्नच नाही म्हणत मी इतर कोणतेही मोठे कार्यक्रम, प्रदर्शने असतील काही व्यवसायाचा विषय असेल. ते त्यांच पिंडोल टाकायला, टेंट टाकायला, त्याची सगळी तयारी करायला, किमान ४-८ दिवस पहिले आणि ४-८ दिवस नंतर वापरतात. आपण भाडे एका दिवसाचे घेतो. याच्या बद्दल पण आपण विचार केला पाहिजे. म्हणजे माझ्या प्रभाग क्र.१२ मध्ये ती जागा आहे. तेथील नागरीक त्या सागरपार्कमुळे सहन करत आहे. मी काय त्रास सहन करीत आहे. हे एकदा जर आयुक्त साहेब आपण कानोसा घेतला प्रभाग क्र.१२ मध्ये येवुन तिकडचा जो परिसर आहे तिकडचे जे दोन तिन कॉलनी ज्या त्याच्या लगतच्या आहे. त्या ठिकाणी एकदा जर तुम्ही कानोसा घेतला, तुम्ही एकदा वेळ द्या तिकडच्या सगळया कॉलन्यांमध्ये मी तुम्हाला घेवुन जाईन. तिकडच्या लोकांच काय म्हणण आहे. सगळा जो तमाशा चालु आहे रात्रंदिवस दर दुसऱ्या दिवशी काही ना काही चालु असतं. लोकं कंटाळलेले आहे. ठिक आहे. मी त्याला विरोध नाही करत आहे. जागा आहे ती मोक्याची जागा आहे. महापालिकेची जागा आहे, महापालिकेने निर्णय

घ्यावा, सभागृहाने निर्णय घ्यावा. पण त्या ठिकाणी काही बंधनं असले किंवा त्यात आपण काही बदल केले, कमीत कमी दर दुसऱ्या दिवशी जो त्रास होतो तो कमी होईल. मोजके तेथे कार्यक्रम होतील, मोजके लोक येतील. व्यवस्थीत कार्यक्रम होतील. यासाठी यात आपण वाढ केली तर हरकत नाही आणि मी बोलतो त्या मुद्दयाकडे पण लक्ष दिले गेले पाहिजे. एका दिवसाच नाही १५ ते २० दिवस त्यांच्या ताब्यात असते आपल्या शहरात जितके ग्राऊंड व स्पोर्टस असतील, खेळासाठी मोकळे मैदाने इतक्या मोठया जागेची उपलब्धता नाही आपल्या महानगरपालिकेकडे आणि शहराच्या मध्यवर्ती असलेले एक चांगल मैदान आहे. मोक्याच ठिकाणचे आहे. आणि आरक्षण असल्यामुळे आपण त्याला क्रिडांगण म्हणुन ट्रिट करत आहोत आणि १५-१५ दिवस, १०-१० दिवस, २०-२० दिवस जर असे कार्यक्रम होत असतील तर खेळाडुंनी काय कराव. तेथे सकाळ संध्याकाळ फिरणारे असतात. व्यायाम करणारे असतात. पोलिस भरतीची तयारी करणारे असतात. स्पर्धा परिक्षाची तयारी करणारे मुल मुली असतात. २००-३०० पोरे सकाळी असतात. संध्याकाळी पायी फिरणारे असतात.माता बघिणी असतात, जेष्ठ नागरिक असतात. ज्या वेळेस कार्यक्रम असतो. सगळयांच जाण-येण डिस्टर्ब होतो. फिरणाऱ्यांच डिस्टर्ब होत, खेळणाऱ्यांच, स्पर्धा परिक्षाची तयारी करणारे सगळयांच डिस्टर्ब होतं. ८-१५ दिवस त्यांच्या ताब्यात असतं ते सगळीकडे घाण असते, सगळे वापर चुकीच्या पध्दतीने चाललेले असते. म्हणजे मला खेदाने सांगाव लागेल. मी जे बघतो तेथे. मी हे जाहिर सभागृहात बोलतो आहे. ५०-५५ लक्ष रुपये खर्च करुन सुप्रीमचा टॉयलेट तेथे बनविला, अतिशय अत्याधुनिक आणि स्वच्छ असा सुविधाजनक त्या ठिकाणी आपण केलेले आहे. सागरपार्कवर जे कार्यक्रम होत असतील ज्या मॅचेस होत असतील. किंवा रस्त्यावर जे वापरणारे लोक त्यांना सुविधा म्हणुन आपण केलेले आहे. पण या टॉयलेटला ५-६ महिने झाले असतील टॉयलेट सुरु होवुन ते सुप्रीमच जे आपण महापालिकेमार्फत केलेल आहे. या ५-६ महिन्याच्या दरम्यान जे जे कार्यक्रम त्या ठिकाणी झाले इवन मॅचेस, क्रिकेट मॅचेस सगळयात जास्त होतात. टुर्नामेंट सगळयात जास्ती होतात. मी संध्याकाळी जेव्हा तेथे वॉकला जायचो, फिरायला जायचो. मी माझ्या डोळयांनी रोज बघितलेले आहे, रोज वाद व्हायचे. पण मग शेवटी मी कंटाळुन की, एखाद्या दिवशी काही तरी मोठ भांडण होईल. म्हणजे तेथे टॉयलेट असुन स्वच्छतागृह असुन ते मॅचेस खेळणारे पोरं सगळे यंग पोर नविन जनरेशन, एखादा पेशन्ट असला, वयस्कर माणुस असला, जेष्ठ नागरीक असला त्याच्याकडुन चुक होते. त्याला नाही सहन होत तो उभा राहतो ठिक आहे. सगळे यंग पोर सगळी यंग पोर, म्हणजे संध्याकाळी तेथे लेडीज फिरायला येत असतात, माता बहिणी फिरायला येत असतात त्या ट्रॅकवर सागरपार्कच्या आणि तेथे लघुशंकेला सगळे भिंतीला तेथे कोपऱ्यात म्हणजे त्या टॉयलेटच्या मागच्या साईडला, म्हणजे ही लोकांची केवळी मोठी चुक आहे, म्हणजे आपण नागरीकांना सुविधा देतो पण नागरीकांनी ही थोडी समज ठेवली पाहिजे. माझी वेदना आहे ही, माझ दुख: आहे. वर्तमानपत्रात आले पाहिजे हे. आले पाहिजे म्हणुन मुद्दाम बोलत आहे मी. मी आतापर्यंत अनेक लोकांशी वाद घातले पण शेवटी रोजचा विषय होता तो. लग्नासाठी आपण वाढवावे आणि दुसरी माझी विनंती अशी होती की, याठिकाणी आपण याठिकाणी आता लग्न, साखरपुडा किंवा इतर कुठलाही कार्यक्रम जे विषय असतील, त्याला आपण रु.७५०००/- म्हणतो रु. १ लाख म्हणतो. आणि जे व्यवसायीक जे प्रदर्शनी लावणारे आहेत. पैसे कमविणार आहेत. त्यांना आपण रु.१५०००/- लावतात असे का ? म्हणजे व्यवसाय करतील तेथे, प्रदर्शन लावतील तेथे, त्याच्यातुन काही तरी अर्न करतील, कमवतील आणि त्यांना रु.१५०००/- लावत आहे आपण.

**श्री.कैलास सोनवणे :-** दुकानांची संख्या जास्त राहील ना तेथे.

**श्री.अनंत जोशी :-** संख्या जास्त राहिली म्हणजे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो संख्या, लोक जास्त जातील ना.

**श्री.अनंत जोशी :-** मुळात जास्त ठेवायले पाहिजे ना. व्यवसायीकाला रु.१५०००/- दिलेले आहे त्याच्या मध्ये.

**सभागृहात निर्माण झालेल्या आवाजामुळे व कॅमेरामध्ये कोणते सन्मा.सदस्य बोलत आहेत याबाबत बोध होत नाही.**

**मा.आयुक्त :-** आपण आयोजकाकडुन घेतो ना प्रत्येक दुकान वाल्याकडुन घेत नाही.

**श्री.अनंत जोशी :-** नाही नाही, आयोजक शेवटी पैसेच कमवितात ना. आयोजक पैसेच कमविता याच्यामधुन.

**श्री.नितीन बरडे :-** प्रत्येक स्टॉलकडुन पैसे घेतो आयोजक.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आयोजक याच्यामधुन पैसे कमवितात ही बाब बरोबर आहे पण बंटी भाऊ आपण एक मुद्दा विचारात घेतला पाहिजे. बरेच प्रदर्शने जे असतात यामध्ये महिला बचत गटाचेही प्रदर्शने असतात. दोन वेगवेगळे मुद्दे हे आहे. व्यवसायीक प्युवर्ली व्यवसायीक असेल त्याचे रेट बंटीभाऊ सांगत आहे तसे वाढवायला हरकत नाही. पण ज्या वेळेला महिला बचत गटासाठी काही करत आहे तर त्यासाठी मात्र आपण कमी रेट ठेवले पाहिजे. कारण शेवटी कोणी जरी ती प्रदर्शने अरेंज करतो, ते शेवटी वसुल कुठुन करतात ते जे स्टॉल धारक आहे त्यांच्याकडुनच, महिला बचतगट वगैरे अश्यांसाठी आपण तो एक वेगळा मुद्दा कन्सीडर केला पाहिजे. आणि धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम जी आहे त्यासाठी सुध्दा बालगंधर्व असु द्या किंवा सागरपार्क असु द्या. दोन्हीकडे आपण रिजनेबल रेटस आहे. म्हणजे आता येथे सागरपार्कला धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमाला १ ला डायरेक्टली १० हजार करुन टाकलेला आहे. हजार रुपये जो होता तो १० हजार करुन टाकलेला आहे. धार्मिक कार्यक्रम साधारणता कोणाही ७ दिवसाचा असतो. जे सप्ताह वगैरे जे असतात ते कोणतेही ७ दिवसाचे असतात. तर धार्मिक कार्यक्रमांना बघण्याचा दृष्टीकोन हा आपला वेगळा असला पाहिजे आणि क्रिडा तर शेवटी आपण क्रिडेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. बंटी भाऊंनी जो मुद्दा मांडलेला आहे. तर युवा वर्गाकडुन ज्या घटना घडलेल्या आहे त्या १००% चुकीचे आहे. त्याचे संमर्थन करणार नाही. मी तर पुढे असे म्हणेल, असे जर काही घटना त्याठिकाणी घडत असेल. तर त्यासाठी एक वेगळे फाईन आपण या ठिकाणी ठेवली पाहिजे महापालिका म्हणुन आणि फक्त तेथेच नाही शहरामधुन अनेकदा या गोष्टींना सांगुन अतिशय लाजीरवाण्या घटना घडतात. तर त्या गोष्टीचही फाईन. अश्या गोष्टींसाठी पण काही कडक तरतुदी कराव्यात. मात्र क्रिडेला प्रोत्साहन मिळावे म्हणुन क्रिडेचे सुध्दा रेट आपण कमी करु शकतो आणि ते करावे म्हणजे आपण डायरेक्टली ते पाठविलेले आहे जसे आपण धार्मिक, सांस्कृतीक कार्यक्रम आपण बालगंधर्वच हजार वरुन २ हजार केल. ठिक आहे रिजनेबल आहे. पण सागरपार्कच एकदम हजार पासुन १० हजार केलेले आहे. ते आपण सर्वानुमते चर्चा करुन कमी कराव. तोच दर आपण ठेवा मला असे वाटते. सर्वांनी मिळुन ठरवा.

**श्री.नितीन बरडे :-** ताई एक मिनीट, ती रु.१०००० करायला पाहिजे आणि ती पण रु.१५००० केली पाहिजे त्यांना, तुमचा प्रभाग नसला तरी धार्मिक कार्यक्रम राहता ना रोज वार्डातले झाडुवाले आम्हाला तेथे पाठवावे लागतात.

**श्री.अंनत जोशी :-** मी त्या मुद्दयावर येणार आहे. त्या मुद्दयावर येतो, ताई.

**श्री.नितीन बरडे :-** थांबा थांबा, एक मिनीट थांबा. ताई तुम्हाला सांगतो जो महाराज येतो तो १-१ लाख रुपये घेतो. तेथे फोटोचे दुकाने लावतो. पुस्तकांचे दुकाने लावतो. त्याच्यातुन पैसा कमवितो. क्रिडाला तुम्ही १०-१० हजार केले आम्ही मान्य केले.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** कमी करा अशी माझी विनंती आहे. क्रिडासाठी ही कमी करा.

**श्री.कैलास सोनवणे :-** जळगांव मधले जे स्पोर्टसमन आहे ना. त्यांची परिस्थिती इतकी काही बरोबर नाही. मॅचेसचे आयोजन करुन कितीही वर्गणी त्यांनी घेतली कोणाकडुन तरी पैसे घरातुन टाकनेच आहे. कोणतीही मॅच असो.

**श्री.नितीन बरडे :-** अप्पा, अप्पा, क्रिडा स्पर्धकांना नियम लावा. मान्यता प्राप्त क्रिडा संघटनांकडुन आलेल्याच स्पर्धांना मान्यता द्या तुम्ही.

**श्री.कैलास सोनवणे :-** बिलकुल हे मान्य आहे.

**श्री. नितीन बरडे :-** कोणीच येणार नाही रिकामे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हे मान्य आहे. हे मान्य आहे आपल्याला.

**श्री.नितीन बरडे :-** क्रिडा स्पर्धा संघटनेची मान्यता असलेल्यांनाच मान्यता द्या त्या ठिकाणी.

**श्री.कैलास सोनवणे :-** कारण काय, शेवटी मला बोलायचेच आहे या विषयावर तुमच होवुन जावु द्या.

**श्री.अनंत जोशी :-** शुचिताताईंनी मगाशी जो विषय मांडला, त्या संदर्भात मला एक सांगायचे होते की, ताई आपण जे म्हटले की, त्या ठिकाणी पॅनल्टी चार्जेस लावावे. वेगळी व्यवस्था केली पाहिजे. मी मा.आयुक्त साहेब बसलेले आहे आणि संबंधीत जे कोणी अधिकारी आहे. माझ्या प्रभागाचे, प्रभाग समितीचे, मी संदर्भात कमीत कमी दोनदा पत्र दिलेले आहे आणि मी वांरवार संबंधीतांना भेटुन हे ही सांगितले की, त्या ठिकाणी एक बांधकाम विभागाचा माणुस कोणी तरी द्या. शिपाई द्या, जो कोणी तुम्ही देत असेल. जो तेथे झाडु काढेल, स्वच्छता ठेवेल, गेट उघडेल, गेट बंद करेल टाईमींगनुसार, झाडांना पाणी देईल, तेथे झाडे लावलेले आहे. पाणीची सोय आपण केलेली आहे. पण पाणी द्यायला कोणी नाही. मी तेथे समक्ष भेटुन पत्र ही दिलेले आहे. एक माणुस दिला जात

नाही. एक वर्ष झालेल आहे आता पर्यंत, भाऊच्या उद्यानामध्ये भाऊचे उद्यान जैन वाल्यांनी विकसीत केलेले आहे. त्या ठिकाणी कोणी २ व्हिलर आत मध्ये घेवुन जावुन ट्रॅक वर चालवेल का ? ४ व्हिलर, रिक्षा ट्रॅकवर घेवुन जाईल का ? सागरपार्कला या, संध्याकाळी २ व्हिलर त्या ट्रॅकवर चालविली जाते. सामानाच्या रिक्षा त्या ट्रॅकवर असतात. ४ व्हिलर त्या ट्रॅकवर असतात. अस का घडत, कारण की, सार्वजनिक आहे. ते खाजगी लोक बरोबर मेनटेन करत आहे. तेथे लोकं तसे वागणार नाही. पण हे सार्वजनिक आहे आणि सदा उघडं पडलेल असते,याचा गैरवापर करतात, चुकीच्या पध्दतीने वागतात. तेथे माणुस पाहिजे, मी ही वारंवार मागणी करत आहे, जो पाणी देईल त्याठिकाणी झाडांची निगा राखेल, स्वच्छता ठेवेल, एक ही माणुस अजुन दिला जात नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** बंटी भाऊ तुमची मागणी अगदी रास्त आहे, ती मागणी चौकस आहे, मी तुमच्या मागणीला विरोध नाही केला होता, होर्डींगचा त्याचे सुध्दा आज पर्यंत प्रशासनाकडुन इम्पलीमेंटेशन झालच नाही.

**श्री.अंनत जोशी :-** मी याच्यात पण सांगतो.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** काही ठिकाणी मी काही स्पॉट स्पेसीफाय केलेले होते की, जेथे प्रशासनाने तेथे सुध्दा इम्पलीमेंटेशन केले नाही. त्या जागांवर वारंवार वाहतुकीला अडथळा ठरतील, त्या जागेच विद्रुपीकरण होईल अजुन ही अश्या पध्दतीने कोणीना कोणी असतात. तर खरं आहे. त्यांच दुख: आहे ते मांडत आहे. पोटतिडकीने जेव्हा माणुस एका विषयावर काम करतो, पण प्रशासनाकडुन सहकार्य मिळत नाही. ही वस्तुस्थिती आहे.

**श्री.अनंत जोशी :-** हा जो मुद्दा आला ना साहेब, ४३ माणसे आहे प्रभाग क्र.१२ मध्ये गटार कामगार आणि झाडु कामगार मिळुन ४३, त्यातील २,४,५ गैरहजर असतात. रोज ते सगळे हजर नसतात कामावर, काही तरी ३५,३६,३७ लोकं हे कामावर असतील. झाडुकामगार आणि गटार कामगार, ५० कॉलन्या आहेत जवळपास प्रभाग क्र.१२ मध्ये लहान मोठया धरुन प्रत्येक कॉलनीत ८ ते १० झाडे जरी पकडले तर ५०० झाडे असतील, तेच साफ करायचे असतात, ते तर होत नाही आपल्याकडे, नितीन भाऊंनी जो मुद्दा मांडला, याच्यात तुम्ही दिलेले आहे, तुम्ही म्हणजे प्रशासनाकडुन जो प्रस्ताव आलेला आहे की, त्यांच डिपॉझीट अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. स्वच्छता नाही केली तर, एकाही कार्यक्रमवाले स्वच्छता करुन जात नाही. कालची परिस्थिती पाहायला पाहिजे होती तुम्ही. काल सोनवणे साहेब होते. सोनवणे साहेब, तुम्ही होते सकाळी तेथे नेमाडे साहेब होते, सोनवणे साहेब होते, सोनवणे साहेब काही दुसऱ्या कामासाठी आलेले होते. त्यांनी पण बघितले की, काय परिस्थिती काल ग्राऊंडची होती सागरपार्कची, एकाही कार्यक्रमावाले कुठलेही कार्यक्रम असो, मॅचेस असो, धार्मिक असो की, सांस्कृतिक असो, कोणीही स्वच्छता करुन जात नाही. तुम्ही जरी डिपॉझिट दिल, मी आमच्या एस.आय.ला सांगितले काय रे भाऊ काय झाल, मी रिपोर्ट केलेला आहे त्यांचे पैसे कापु आपण, मी येथे आरोग्य विभागाला विचारले, काय सांगता, त्याचे पैसे कापु आपण एस.आय.कडुन रिपोर्ट आला की, त्याचे पैसे कापु आपण, तुमच्याकडे पैसे कापायला आम्हाला काय घेणे देणे आहे. माझ्या प्रभागामध्ये मुळातच माणस कमी आहे, झाडु कामगार नसतात, गटार कामगार नसतात. दर दुसऱ्या दिवशी ५-५,७-७ कामगार काढुन त्या सागरपार्कवर टाकतात. वार्डाचे कामे कधी व्हायचे.वार्डाचे गटार रस्ते कधी साफ व्हायचे. माझ्या वार्डाचे ५,६, १० लोकं तेथे टाकलेले असतात. तुम्ही इकडे म्हणतात की, आम्ही पैसे कापुन घेवु कार्यक्रम वाल्यांचे, किरकोळ वसुलीवाले म्हणतात आम्ही त्याच्यातुन कापुन घेवु. तुम्ही पैसे कापुन घ्याल. वार्डातील माणस आमचे काढुन टाकले जातात ना तेथे, याला काय अर्थ आहे. याचा पण विचार झाला पाहिजे. दुसरा विषय आता ताईंनी म्हटल्याप्रमाणे, भारतीताई महापौर असतांना त्यांनी एक ठराव केलेला होता की, धार्मिक स्थळे कुठलेही धार्मिक स्थळे असो, त्याचे काही १५-२० मिटरचा ठराव केलेला होता आणि महापुरुषांचे पुतळे, त्या ठिकाणी आपण कुठलेही जाहिरात फलक कुठलाही असो कुठलाही लागु द्यायचे नाही. अगदी वाढदिवसाचे शुभेच्छा पण नाही. आमचे नगरसेवकांचे असले तरी लावु द्यायचे नाही. धार्मिक स्थळे असतील किंवा महापुरुषांचे पुतळे असतील. आता वर्षाचे वर झाले, जास्ती झाल, वर्ष होवुन झाल ठराव केलेला आहे, काहीच इमप्लीमेंट होत नाही साहेब, काही नाही, मी अनेक वेळा, मी अनेक वेळा नरेंद्र चौधरी साहेबांना भेटलो, प्रकाश पाटील साहेबांना भेटलो, सगळयांना भेटलो काहीच होत नाही. अतिक्रमण वाल्यांना भेटल्यानंतर ते काय उत्तर देतात. त्याच्यावर पावती क्रमांक आहे आम्ही नाही काढु शकत. इकडे आले तर हे काय म्हणतात. आम्ही तर त्यांना नाही सांगितले होते तेथे लावायला. त्यांनी लावल असेल तेथे, काही कार्यवाही होत नाही साहेब सगळे विद्रुपीकरण आहे, सगळे बॅनर असतात मोठमोठे जाहिरातींचे, सगळे महापुरुषांचे पुतळे पण असतात, घाण विषय आहे साहेब घाण, मी पोटतिडकीने बोलतो, मी गेल्या वर्षापासुन बोलत आहे, अनेक जागा आहे ना स्वत:ची जाहिरात करायला, त्या जागा सोडल्या पाहिजे

साहेब, जर लोकं ऐकत नसतील तर प्रशासन म्हणुन तुम्ही कठोर भुमिका घेतली पाहिजे. मी हा विषय आता का बोलत आहे, ताईंनी विषय काढला म्हणुन, या ठिकाणी तुम्ही दिलेले आहे की, सागर पार्कवर जे तुम्ही जाहिरात फलक लावाल. त्याची वेगळी परवानगी द्यावी लागेल. परवानगी घ्यावी लागेल म्हणजे त्यांचेकडुन शुल्क आकारणार आहात का ?

**मा.आयुक्त** :- शुल्क आकारणार आहोत.

**श्री.अनंत जोशी :-** जे जाहिरात फलक लावतील त्याचे शुल्क आपण आकारणार आहोत. खुप चांगल आहे, एकदम योग्य निर्णय आहे. पण मला एक सांगा साहेब, मी त्या ठरावामध्ये असे देखील बोललेलो होतो की, सागर पार्कच्या चौफेर म्हणजे सागरपार्कची जी आपण चेंनलिंग फेंसींग केलेली आहे, जाळी केलेली आहे, त्याच्यावर बॅनर लागायला नको, एकही कार्यक्रम असा नसतो, एकही कुठलाही कार्यक्रम, पुर्ण सागरपार्कची चेंनलिंग फेन्सींग जी तीला कंपाऊंड केलेली आहे, सगळी बॅनर तेथे केलेली असते सगळी, आपली कामे इतकी क्वॉलिटी वाईस आहे असे मी मागे ही बोललेलो आहे साहेब मी रिपीट करत आहे सभागृहामध्ये, मी गेल्या वेळेस ही हा विषय बोललेलो आहे. आपल्याकडचा काम इतकी क्वॉलिटी असते का ? ते चेंनलिंग फेन्सींग इतक मजबुत आहे का एकदम किल्ल्याच्या भिंती वगैरे सारखे आहे का ? त्याच्यावर बॅनर लावतील ते. आता तुटुन पडेल साहेब, एका बाजुने तुटुन पडलेले आहे, सोनवणी साहेबांना दाखविले मी, मी हात जोडुन सांगतो की, आपल्या लोकांनी का लक्ष द्यायला नको तेथे. प्रभाग, समजा तुम्ही इकडे असाल, युनिट ऑफिस तर तिकडे आहे ना. ते लोकं का डोळे झाकतात ते लोकं का करत नाही. त्यांना येता जाता सागरपार्क दिसत नाही का ? त्यांना दिसत नाही का हा ठराव झालेला आहे आपल्याकडुन, त्यांना जर लावायचेच आहे ना तर सागरपार्कच्या भिंतीच्या खाली तुम्ही टेन्ट वाल्याकडुन तुम्ही फ्रेम बनवा त्या फ्रेमवर बॅनर लावा त्या जाळीवर लावणे महत्वाचे गरजेचे आहे का ? पण कोणी बघायला तयार नाही. ना प्रभाग समितीवाले बघतात ना किरकोळ वसुलीवाले बघतात. ना अतिक्रमणवाले बघतात कोणीच बघत नाही. आणि मग काय होत, मी फोन लावतो. ते काढायला लावा, ते काढुन घेवुन जा. ते काढुन टाका. मग आपले लोक जो समोरचा व्यक्ती असतो किंवा संस्था किंवा संघटना असते जो कोणी असतो त्याला माझे नाव सांगतात. बंटी जोशीची तक्रार आहे म्हणुन काढाव लागेल. म्हणजे काय? स्वत: काम करणार नाही. आणि नगरसेवकाने सांगितले तर नगरसेवकाची नांव सांगणार. बंटी जोशीची तक्रार आहे म्हणुन. म्हणजे आमचा वाईटपणा येतो. हे योग्य नाही साहेब भ्रष्टाचार, लोकांची जबाबदारी आहे आणि प्रत्येक गोष्टीसाठी आपल्यापर्यंत नाही येवु शकत मी शेवटी आपल्यावरही पुर्ण शहराची जबाबदारी आहे. आपल्याला अनेक गोष्टी बघायचे असतात. पण आपण खालच्या लोकांना ताकीद करा साहेब योग्य नाही आणि मी पहिल्यांदा बोलतो आहे असे नाही. मी जाहिर पहिल्यांदा बोलत आहे. मी समक्ष भेटुन तर अनेकदा बोललेलो आहे. आणि एक शेवटचा विषय आहे साहेब याच्या संदर्भातला. आपण सगळ करत आहोत. आपण शुल्क वाढवत आहोत. नितीन भाऊंनी म्हटल्याप्रमाणे धार्मिक कार्यक्रमाचे जास्त घ्या. ते लाख रुपये बोलले, मी स्वत: सांगतो, २-२, ४-४ लाख रुपये घेतात साहेब. महाराज लोकांची किती प्रथा वाढलेली आहे. २-२, ४-४ लाख रुपये घेतात. त्याच्यापेक्षा आनखी जास्त धरा. जे खरं आहे ते खंर आहे. एक शेवटचा विषय असा होता साहेब.

**श्री.कैलास सोनवणे :-** शेवट शेवट करुन चालुच आहे. चालु द्या चालु द्या.

**श्री.अनंत जोशी :-** अप्पा, ऐका ना, ऐका ना. दोन वर्ष, दोन वर्षातली ही दुसरी ऑफलाईन सभा, त्यात पण मी एका विषयावर बोलत आहे. पहिल्यांदा, तुम्ही विचार करा किती पोट तिळकीने व कळकळीने बोलत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** बोला बोला, बोला ना बोला.

**श्री.अनंत जोशी :-** तरी सुध्दा सगळया विषयांवर बोलत नाही. प्रत्येक वेळा तुमच्या सारखं, म्हणजे तुमच्या सगळयांसारख उठुन बोलणार नाही. एका विषयावर बोलत आहे आणि परत बोलणार नाही. सगळयात शेवटी तिथल्या तिथे साऊंड सिस्टीम याच्याबद्दल काय करु सर आता सागरपार्कला, लोक कंटाळले आहे साहेब, त्रासले आहे लोकं, माझेशी रोजी भांडणे करतात. लोकं माझ्याशी उध्दटपण्याने बोलतात, नागरीक, माझे मतदार आहे मी त्यांच्याशी चुकीच ही बोलु शकत नाही. परवाचीच गोष्ट आहे. इतक्या घाण पध्दतीने बोलले आहे माझ्याशी, माझी काही चुकी नाही त्याच्यात, मी कार्यक्रम आयोजित करत नाही तेथे, मी परवानगी देत नाही, मी पैसे अडकवत नाही, मी पैसे कमवत नाही तेथे, लोक येतात, मॅचेस खेळतात, कार्यक्रम करतात. गोंधळ करतात, डी.जे. वाजवितात, मोठमोठयाने साऊंड सिस्टीम वाजवितात. नागरीकांचा रोष आमच्यावर असतो. माझ्याशी इतक्या चुकीच्या पध्दतीने बोलतील, मी त्यांना समजवुन सांगितले, माझ काय दोष आहे याच्यामध्ये तुम्ही जा कलेक्टर साहेबांकडे, जा आयुक्त साहेबांकडे, मत मागायला कसे येता म्हणे तुम्ही. त्रास देतात साहेब, परवाच्या तिन

दिवसाचा विषय आहे. अतिशय घाण पध्दतीने बोललेले आहे. या आवाजाबद्दल जरी आपण काही करु शकलो तर काय आहे साहेब, रात्री १०, ११,१२ वाजेपर्यंत कार्यक्रम चालतात आणि पुर्ण मोठयाने गोंधळ असतो. याच्यावर काय करु शकतो आपण. जर मर्यादा घातल्या तर त्याची अंमलबजावणी होईल का ? आपल्या लोकांकडुन.

**मा.आयुक्त :-** आता हा जो विषय जर खुपच असा असेल तर आपण जी सगळी तपशीलवार माहिती दिली. तर हा वरदळीचा विषय दिसतो. मला वाटते आता याच्या मध्ये आपण दराच्या बाबतीत निर्णय घ्यावा आणि त्याच्या वापराच्या संदर्भामध्ये जी काही आपल्याला रिबॉंडींग करायची आहे. तर जे जे सदस्य याच्यामध्ये भाग घेवु शकतात. त्यांच्याकडुन सुचना प्राप्त करुन येणाऱ्या महासभेसमोर हा सर्व समायोजन प्रस्ताव ठेवु या की, याच्या मध्ये वापर करत असतांना नागरीकांची सोय हाईल पण तिथल्या रहिवाश्यांची गैरसोय होवु नये. त्यांना कशाचाच त्रास होवु नये. अश्या दृष्टीने मग आपण कुठल्या प्रकारच्या कार्यक्रमांना परवानगी द्यायची. त्याचे बंधने काय असावी. स्वच्छतेच्या बाबतीमध्ये आपण म्हणत आहे. त्याप्रमाणे सागरपार्कला वेगळे स्वच्छता कर्मचारी दिलेले नसल्याने तुमच्या वार्डचे जे एकत्रीत कर्मचारी आहे त्यांच्यावर लोड येतो आणि जवळपास जर बघितले तर पावसाळयाचे चार महिने सोडता. इतर वेळेला बहुतांश वेळेला सागरपार्कवर काही ना काही कार्यक्रम असतात. म्हणजे रोजचे ५-१० कर्मचारी तुमचे त्या स्वच्छतेवर देतील. डिपॉझिट आपण घेत होते. जप्त जरी झाल तरी डिपॉझिट जप्त झाले म्हणजे काही ऑटोमॅटीक स्वच्छता होणार नाही. सागरपार्कच्या स्वच्छतेसाठी काही स्वतंत्र व्यवस्था करता येईल किंवा तुमच्या प्रभागासाठी विशेष काही कर्मचारी कायमस्वरुपी वाढुन देता येईल का ? त्या सगळयांचच आपण विचार करु. आता दराचा आपण निर्णय घ्यावा आणि मग आता मी म्हटल त्याप्रमाणे आपल्या या जाहिरात विभागाकडुन सागरपार्कच्या किरकोळ वसुली विभागाकडेस आपण सर्व सदस्यांच्या याच्याबद्दल काही ते सुचना येतील. त्याचा विचार करुन सविस्तर प्रस्ताव आपण येणाऱ्या महासभेमध्ये देवु. आणि त्याच्यामध्ये काही स्ट्रीक्ट बंधने आपण त्याच्यामध्ये ठेवु. वापर झाले पाहिजे नागरीकांची सोय झाली पाहिजे. परंतु त्याचा गैरवापर किंवा तेथील नागरीकांची गैरसोय या सगळयांचा आपण एक मध्यमार्ग काढु या.

**श्री.अनंत जोशी :-** मी परत एकदा विनंती करतो की, लग्नाचे रु.७५०००/- पेक्षा जास्त करावे. धार्मिकचे पण जास्त करण्यात यावे. आणि व्यवसायीकांकडुन जे रु.१५०००/- ठेवलेले आहे ते पण जास्त करण्यात यावे ही विनंती.

**मा.आयुक्त :-** बंटी भाऊ आता आपण ज्या काही सुचना मांडल्या, या सुचना आपल्या ठरावासाठी सुचना म्हणुन लिखीत द्या. आता धार्मिक कार्यक्रमाबाबत जसे आपण म्हणतो. आता धार्मिक कार्यक्रमाबाबत जे आपण लग्न वगैरे म्हणतो. तसे लग्न जर बघितले तर लग्न हे पण धार्मिक विधीच आहे. त्याच्यामुळे त्याच्यामध्ये सुध्दा आपण त्या दुरुस्ती करु नंतर वाद होतात.लग्न हे धार्मिक विधी नाही का ?

**श्री.कैलास सोनवणे :-** लग्नासाठी वेगळच ठेवा,

**मा.आयुक्त :-** सर्व अश्या बाबींमध्ये आपण स्वच्छ नियम बनवु या आणि आता जी आपण सुचना मांडाल ती सर्वांना मान्य असेल.

**श्री.नितीन बरडे :-** साहेब, त्याच्यामधुन सर्कस वगळा साहेब, सर्कस मध्ये खोदला जातो साहेब, सर्कस वगळुन टाका त्याच्यामधुन सर्कस शब्द वगळुन टाका.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, महापौर महोदया,

**सौ.सरिता नेरकर :-** याच विषयाला धरुन विषय आहे महात्मा फुले मार्केट, ते मध्ये ज्या मार्केट मध्ये फुलेंचा पुतळा आहे. त्याला सुध्दा सगळे दुकानदारांनी अस बांधुन टाकलेले आहे स्टॉल लावुन अगदी पुतळा बिलकुल मोकळा नसतो. त्याच्यावर ही काही तरी विचार करावा. कारण फुलेंचा, ज्यांच्यामुळे आम्ही आज इतपर्यंत पोहचलो आहोत. त्यांना अगदी त्या सगळया दुकानदारांनी पॅक केलेले आहे म्हणजे दिसत सुध्दा नाही तो पुतळा.

**श्री.कैलास सोनवणे :-** महापौर ताई.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौरताई, त्याच प्रमाणे असच एक पारिक पार्क उद्यान आहे साहेब, आता आपण त्याच्यावरती येणाऱ्या काळात खर्च करतो आहे, लॉन करतो आहे. तेथे खेळणे बसवितो आहे. तेथे नाईट वाचमन नाही आणि दुसरी गोष्ट तेथे माळी नाही. माझी पुन्हा विनंती आहे आपणास जशी सागरपार्कसाठी आपण सुविधा करतो आहे तसे या बगिचामध्ये जात असाल, जेष्ठ नागरीक असेल, हास्य क्लब असेल. या माध्यमातुन मोठया प्रमाणावर जेष्ठ नागरीक, हास्य क्लब असेल, लहान मुले असेल या माध्यमातुन येतात. आपण येणाऱ्या

काळामध्ये, काल परवाच आपण याच्याबद्दल या संबंधात पाहिल असेल, या पारिक पार्क सुशोभिकरणावर आपण खर्च करत आहोत. तेथे जवळ जवळ १० ते १५ लाख रुपये. तर त्या माध्यमातुन होणारा लॉन असेल, तेथे पाण्याची व्यवस्था कमी आहे. आपण पाण्याची टाकी सुध्दा तेथे उपलब्ध करतो आहे. पाणी देण्यासाठी आणि माळी, याची सुध्दा व्यवस्था करणे कारण की त्याची निगा राहावी आणि ते सुशोभिकरण राहावे. यासाठी एक माळीची आणि वॉचमनची व्यवस्था आपल्या पारिकपार्कसाठी करण्यात यावी.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आता बगिच्यांची आहे. त्यामुळेच महापालिकेच्या बगिच्यांची म्हणजे कॉलनी ऐरियातील जी बगिचे आहे. ते आपण वेगवेगळया निधीतुन डेव्हलप केलेले आहे. आमदार निधीतुन असु द्या, खासदार निधीतुन असु द्या. अगदी माझ्या प्रभागात सुध्दा टागोर नगरला खेळणे लावण्यात आलेले होते, बगिच्यांमध्ये अनेक कामे करण्यात आलेले होते पण वॉचमन नाही त्यामुळे तेथे सगळ उध्वस्त झाले. तर वॉचमन या विषयावर प्रशासनाने सेपरेटली काम केले पाहिजे. नियुक्ती झाली पाहिजे आणि दुसरे जसे आता बंटी भाऊंनी मुद्दा मांडला होता की, त्यांच्या प्रभागातील स्वच्छता कर्मचारी सागरपार्कला वापरावे लागतात आणि त्यामुळे प्रभागात अडचणी येतात. आयुक्त साहेबांच्या आताच्या भुमिकेच मी स्वागत करेल की, यासाठी स्वतंत्र आपण सुचना मागवु आणि त्यानुसार प्रस्ताव पुढच्या महासभेसमोर आणु असे आश्वासन केलेले आहे येथे तर त्याच निश्चितच मी सगळयांच्या वतीने स्वागत करेल. तसेच आयुक्त साहेब तुम्ही हे मान्य केल की, बंटी भाऊंच्या वार्डातल्या कर्मचाऱ्यांचा हा प्रश्न येतो आणि प्रभागाची दुरावस्था होते. तर माझ्याही प्रभागात, माझा प्रभाग क्र.६ हा शहराचा मध्यवर्ती भाग आहे. मी प्रशासनाकडे वारंवार मनुष्यबळ कमी पडतो याची मागणी केलेली आहे. तर त्याचा सुध्दा असाच विचार व्हावा. जळगांव जिल्ह्यातले सगळे लोक माझ्या प्रभागात येतात. कारण जिल्हा न्यायालय माझ्या प्रभागात आहे, एस.टी.स्टॅण्ड माझ्या प्रभागात आहे. सगळे सरकारी कार्यालय, कलेक्टर ऑफिस पासुन ते पाटबंधारे विभागापर्यंतचे सगळे कार्यालय हे माझ्या प्रभागात आहे. डॉक्टर्स बेल्ट हे मॅक्सीमम माझ्या प्रभागात आहे. आणि तेथे सुध्दा कर्मचाऱ्यांचा हाच प्रश्न येतो. माझ्याकडे तर कायम कर्मचारी आहे आणि कायम कर्मचाऱ्यांच्या सुट्टया, त्यांच्या सगळया कायदेशीर मार्गाने मिळत असलेल्या रजा वगैरे बघता उपस्थिती ही फार कमी असते. ज्यामुळे प्रभाग स्वच्छ राहत नाही. प्रत्येक प्रभाग स्वच्छ राहिलाच पाहिजे पण जे जिल्ह्याचा मध्यवर्ती भाग आहे. तेथील इम्प्रेशन जिल्ह्याभरातील नागरीक घेवुन जाणार आहे. जळगांव शहर महानगरपालिका म्हणुन जळगांव शहराकडे तो बघणार आहे जेव्हा या ठिकाणी माझ्या वार्डामध्ये जिल्ह्याचा नागरीक येणार. ही स्वच्छता मला वाटत जास्त महत्वाची आहे. जसे आता आपण बंटी भाऊंना आश्वासीत केले सागरपार्कसाठी वेगळे कर्मचारी देण्याचे नियोजन करु . तुम्हाला विनंती आहे आयुक्त साहेब की, माझ्या प्रभागात सुध्दा त्याच दृष्टीने बघा, शहराचा मध्यवर्ती भाग म्हणुन बघा. नुसता प्रभाग म्हणुन बघु नका आणि साधारण गेलेल्या दिड वर्षापासुन मी वारंवार मागणी करत आहे की, मला मनुष्यबळ वाढवुन द्या. जेणे करुन जळगांव जिल्ह्याचा मध्यवर्ती ठिकाण स्वच्छ दिसेल, चांगला दिसेल आणि जळगांव महापालिकेच नाव खराब होणार नाही. त्या गोष्टीकडे लक्ष द्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** काय घोळ होत आहे या प्रकरणांमध्ये ते सांगत आहे मी माझ्याकडे डायरेक्ट कागद आणि पुरावे आहे. डायरेक्ट तक्रार आली आहे नागरीकांची माझ्याकडे जी सागर पार्कची बुकींग होते. ती आपले काही लोकं काय करतात. तुम्ही ते आपले बुकींगचे पुस्तक पहा किरकोळ वसुली वाले असतील. मी चेक केले वेरीफाय केले, बरोबर आहे. ते असे बुक करुन टाकतात. महिनेच्या महिने महिनेच्या महिने, पेन्सीलने बुक होत फक्त, फक्त पेन्सीलने बुक होत आणि त्यानंतर समजा समोरचा कोणी आला बुक करायला. आपला जो कोणी क्लार्क असेल संबंधीत तो त्याला सांगतो की, या या नगरसेवकाने बुक केलेले आहे. त्याच्याशी कॅन्टॅक्ट करा. आणि त्या ठिकाणी सुरु होतो, पैसे खाण्याचा प्रकार. तो म्हणतो माझे इतके खर्च झालेले आहे मला इतके देवुन टाका आणि तोडीपाणी करुन हे सगळे विषय होतात. माझ्या मते साहेब तुम्हाला सांगतो, तुम्ही लक्ष घाला. संबंधीतांना सांगा, काही सिस्टीम काढा. जसे जळगांव मध्ये मराठा प्रिमियर लिग भरतात, कोळी प्रिमियर लिग भरतात, लेवा पाटील प्रिमियर लिग भरतात सगळेच भरतात. तर त्या अनुषंगाने या प्रकरणात तस झालेल आहे की नाही मला याची सत्यता माहित नाही. परंतु जे कागद पाहिले म्हणजे नगरसेविकेच्या मुलाने ग्राऊंड बुक केले, त्यानंतर कोविड असल्यामुळे आम्ही हे रद्द करत आहे. असे त्यांनी पत्र दिले. त्याच्यानंतर त्या रेकार्ड वरती, हे माझ्याकडे कागदे आहे. तुमच्या लक्षात येईल. रद्द करुन टाकले त्यांनी, त्यानंतर श्री जैन युवा फाऊंडेशन यांनी अर्ज दिला २ तारखेला आणि ४ मार्च ते ६ मार्च बुकींग करण्याचा अर्ज दिला. आपल्या लोकांनी त्यांना दोन दिवस थांबायचे सांगितले की, आम्ही त्यांना विचारतो. त्यांच रद्द झालेले होते तरी आम्ही त्यांना विचारतो असे

बोलले ते आणि त्यानंतर त्यांनी परवानगी दिली. त्यांनी डिपॉझिट भरली अनामत भरली. उज्वल निकम साहेबांची परवानगी आणली. संबंधीत पोलिस स्टेशनची परवानगी आणली. त्यानंतर ट्राफिकची परवानगी आणली आणि त्यानंतर संबंधीत हे समोरचे कोर्टात गेले. त्यांचा काही वाद झाला असेल किंवा काही झाला असेल आणि कोर्टातुन निकाल आला साहेब म्हणजे येथे बुकींग कशा आहे ते पण मी दाखवितो. २०२४ पर्यंत बुक आहे आपल सागर पार्क हे पहा हे कागद आहे साहेब, काय आहे काय होत माहिती आहे का ते पेन्सीलने होत. फक्त पेन्सीलने बुक होत म्हणुन जर आपण बुकींगचे पैसे घेवुन टाकले दिवसाप्रमाणे तर हे गडबड होणार नाही. ते बघा तुम्ही लक्ष देवुन काय करता येईल आणि हा प्रकार बंद कसा करता येईल ते पहा तुम्ही आणि त्यानंतर अजुन सांगतो, २८ फेब्रुवारीला निकाल आला कोर्टातुन. ते कोर्टात गेले होते समोरचे तक्रारदाराचे वकील हजर तंतोतंत मनाई हुकुम मिळणेसाठी तक्रारदाराचे वकीलाचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराने कागदपत्राचे अवलोकन केले. तक्रारदाराने दि.२०/१२/२०२१ रोजी सामनेवालाकडे अर्ज देऊन दि.०१ मार्च २०२२ ते दि.१० मार्च २०२२ रोजी क्रिकेट सामनासाठी सागरपार्क मिळणेबाबतचा अर्ज केलेला होता. बरोबर आहे हे लिहले त्याच्यामध्ये की, हा अर्ज दिलेला होता, पण तो अर्ज रद्द केला हे माझ्या मते कोर्टाचे निदर्शनास सुध्दा त्यांनी आणुन दिले व कोर्टापासुन लपविलेले आहे या बाबी म्हणजे रद्दचा अर्ज लपविलेला आहे. त्यानंतर महापालिकेने रद्द केले हे ही लपविलेले आहे. त्यानुसार सामनेवालाने त्याच्या रजिष्टर मध्ये १ ते १० फेब्रुवारी तक्रारदाराची बुकींगची नोंद केलेली आहे. परंतु तक्रारदाराने सदरची बुकींग कधीही रद्द केलेली नाही व सदर क्रिकेट सामनासाठी कार्ड पण छापलेले आहे. म्हणजे त्यांची एकतर्फी बाजु मांडलेली आहे. म्हणजे आपल्या वतीने आपल्याला महापालिकेला विचारणा ही केलेली नाही. सेम-डे हे ॲप्लीकेशन दाखल, सेम-डे निकाल वरील परिस्थितीचे अवलोकन केले असता सामनेवाला यांना निर्देश देण्यात येते की, सामनेवाला यांनी तक्रारदार यांचे हे १ मार्च २०२२ ते १० मार्च २०२२ पर्यंत सागर पार्क येथे क्रिकेट स्पर्धासाठी दिलेले आरक्षण प्रमाणे सागरपार्क मिळणे करीता तक्रारदार यांना १ मार्च पासुन ते १० मार्च पर्यंत उपलब्ध करुन द्यावे. आता हा डायरेक्ट निकाल येवुन गेला साहेब आता क्रिकेटच्या मॅचेस व्हायला पाहिजे. सामाजिक स्तरावर क्रिकेटच्या मॅचेस होत आहे. यात काही वाईट नाही. परंतु त्या ठिकाणी सगळ जर एकतर्फी हे केले. मी बाजु का घेत आहे सामनेवाल्याची कारण सामनेवाला या शहराचा सामान्य नागरीक आहे. जैन समाजाचे नागरीक होते ते, त्यांना काय अडचणी आल्यात. २८ मार्चला हे रद्द झाल्यानंतर २८ तारखेला हे आल्यानंतर ४ आणि ४ ते ६, तिन दिवसात त्यांनी महिला दिनाच्या महिला उद्योजक म्हणुन काही तरी कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते संपुर्ण भारतामधुन त्या ठिकाणी लोकं आले होते. तर त्यांची ऐन वेळेला धावपळ झाली ते रडायला लागले. त्यांच खरं तर स्थळ छापले गेला होते परवानगी दिल्यामुळे. त्यांनी त्यांच्या घरातुन १५-२० लाख रुपये लावले. परंतु शेवटी त्यांना रमेशदादांनी जागा दिली. बिगबाजाराला म्हणुन त्यांच ते सगळ व्यवस्थीत झाल. पण तरीही त्यांची खुप धावपळ झाली. तर सामान्य नागरीकाला आपल्या महापालिकेकडुन त्रास होता कामा नये. हा फक्त बोलण्याचा हेतु आहे. त्यांना या कामासाठी सुनिलभाऊंनी, नितीनभाऊंनी मदत केली. त्यांच काम होण्यासाठी परंतु जजने कोर्टातुन ऑर्डर देवुन दिली की, यांना देण्यात यावी यांना देण्यात येवु नये आणि कोर्टात समजा त्यांनी चुकीचे कागद दिले असतील. तर ते तपास करा तुम्ही ते काय झालेले आहे आणि निकाल का आला असा. हे सगळे कागदे मी तुमच्याकडे देतो. हे मी व्हेरीफाय केलेले आहे. तुम्हीही व्हेरीफाय करा. साहेब तुम्ही तुमच्या स्तरावर व्हेरीफाय करा. माझा बोलण्याचा उद्देश काय आहे. सामान्य नागरीक याला या महापालिकेपासुन त्रास होता कामा नये. अहो नागरीक इतक्या शिव्या देतात आपल्याला या रस्त्यांच्यामुळे फार म्हणजे आपल्याला या दोन वर्षापासुन कोणी चांगल म्हणत नाही. जळगांव शहरामध्ये आणि त्याच्यात असा त्रास जर लोकांना होईल. कोणताही असो कोणालाही तो या जळगांव शहराचा नागरीक आहे. या जळगांव शहराचा करदाता आहे. कोणालाही त्रास होता कामा नये.

**श्री.सुनिल महाजन :-** डिपॉझिट घेतली पाहिजे आपण.

**श्री.कैलास सोनवणे :-** ते आता पासुन ठरवा आणि याच्यातुन कसा गैरप्रकार टाळता येईल. म्हणजे हे चुकीचे आहे. नगरसेवकांना पैसे कमवायला किती रस्ते आहे हो, नुसता इकडुन तिकडे गेला की, पैसे भेटुन जाता साहेब. इकडुन तिकडे गेला, तिकडुन इकडे आला पैसे भेटुन जातात. त्याच्याशी नागरीकांना काही घेणे देणे नाही. नागरीक दोन शिव्या देऊन मोकळे होवुन जातात. पण तुम्ही नागरीकांना जेव्हा त्रास देतात ना. मग ते सगळयांना शिव्या देतात. आपल्या महापालिकेबद्दल चांगल कोणी बोलतच नाही. तर नगरसेवकांनाही ही समज द्यावी. तुम्ही जेष्ठ नगरसेवक आहात सुनिलभाऊ, नितीनभाऊ तुम्ही विष्णुभाऊ तुम्ही त्यांना सांगा की, असे धंदे करायचे नाही.

योग्य नाही हे. आमच्याकडचे सदस्य करत असेल त्याला आम्ही सांगु किंवा आमच्या निदर्शनास आणुन द्या. हे योग्य नाही. नागरीकांना त्रास होता कामा नये.

**श्री.नितीन बरडे :-** अप्पा, ज्या दिवशी आला त्याच दिवशी पैसे घ्यायला लावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ना मग सर्व आपण आता ठरवु आणि महापौर मॅडम मी तुम्हाला विनंती करतो की, आर्ध्या घंटयाची सुटी द्या. म्हणजे आपल्याला जेवण करता येईल. नाही तर ते सगळ पडुन राहील.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, या सागर पार्कच्या बुकींग संबंधीत मी आपल्याला सांगु इच्छितो, जस आता नितीन भाऊं आणि आप्पा पण बोलले, आपण बुकींगच्या वेळेस त्याला अटीशर्तीच्या अनुषंगाने त्याची डिपॉझिटची पावती फाडावी की, आपण रद्द करायची असेल तर निम्य पैसे आपले कट होतील. रद्द करायची असल्यास आणि आपली जर परवानगी काही शासकीय कारणास्तव रद्द झाली तर आपल्याला परत करण्यात येईल. ही एक अट खाली टाकण्यात यावी.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई, महापौरताई आता आपली जी चर्चा चालु आहे. त्याच विषयावर बोलायचे आहे. जो डी.जे.चा विषय निघाला. आता ज्या परमिशन असतील त्यांना आताच सुचना करण्यात याव्यात. ज्यांचे ज्यांचे कार्यक्रम असतील की, त्यांनी आवाज कमी करावा. कारण की परिक्षा असल्यामुळे सगळयांना त्रास होतो. त्याच्यामुळे ज्या काही परमिशन घेतल्या असतील. आता येत्या काळामध्ये त्यांना तसे सुचना करण्यात यावे. आणि तो कचऱ्याचा विषय, दोन तिन दिवसापुर्वीचा जो कार्यक्रम झालेला आहे. तर सागर पार्क आहे. त्याच्यामागे थोडी मोकळी जागा आहे. त्या ठिकाणी नेहमीच कचरा टाकलेला असतो आणि त्या नागरीकांना त्रास होतो. दोन तिन दिवसापुर्वी मी आयुक्त साहेबांना निवेदन देणार होते. परंतु साहेब सुट्टीवर असल्यामुळे ते थांबलेले आहे. तर हा विषय आलेलाच होता. पण कळकळीची विनंती आहे की, परिक्षेचे दिवस असल्यामुळे त्यांना आवाज कमी करायला लावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** खरं तर योग्य सुचना आहे. आणि या सर्वांच्या सुचनांचे आपण याच्यामध्ये समाविष्ट करणेच्या दृष्टीकोणातुन आजचा हा प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव हा रद्द करण्यात यावा. प्रशासनाने सर्व सन्मा. सदस्यांच्या ज्या काही सुचना आता येथे व्यक्त केलेल्या असतील. त्या व्यतिरिक्त ज्या ज्या त्यांना सुचना द्यायच्या असतील. तश्या पध्दतीच्या सुचना घेवुन एक सर्व समावेशक प्रस्ताव तो पुढच्या महासभेमध्ये देण्यात यावा. जर याला तहकुब केले तर काय होईल. पुन्हा नविन सुचनांचा समावेश करत असतांना मुळ प्रस्ताव आणण्याच्या संदर्भात कायदेशीर अडचणी येतील म्हणुन हा रद्द करावा आणि सर्व समावेशक प्रस्ताव जो आहे. तो पुढच्या महासभेसमोर ठेवण्यात यावा.

**श्री.नितीन बरडे :-** भाऊ तोपर्यंत बुकींग आली तर भाडे नविन आकारायचे की, मागचेच सभेच्या अधिन.

**मा.आयुक्त :-** यात जो सुचनांचा समावेश आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मुळ प्रस्तावच बदलुन जाईन पुर्ण.

**श्री.नितीन बरडे :-** तो पर्यंत या पध्दतीने पैसे घ्या बुकींगला,

**मा.आयुक्त :-** बरोंबर आहे म्हणुन मी सुरुवातीला काय म्हटलो होतो की, दराबाबतचा निर्णय आपण घेवु, जी बाकीचे बंधने किंवा वापराबद्दलचे जे नियम बनवायचे ते आपण येणाऱ्या सभेला घेवुन टाकु म्हणजे दराचे केले तर त्याच्यावर निम्मे आळा त्यावर तेथेच बसणार आहे. जो आता कैलास अप्पांनी विषय मांडला गैरप्रकार, दोन दोन वर्ष ॲडव्हान्स बुकींग हे सगळ बंद होवुन जाईल.

**श्री.नितीन बरडे :-** काही ठिकाणी दर बदलवायचे आहे. आपल्याला आता डिपॉझिट घेणे किंवा ठराविक दिवसांमध्ये जर कॅन्सल केले तर डिपॉझिट परत न करणे. या सगळया गोष्टींचा समावेश आपण आता येथे केले. तर हे मोकळे करायला हरकत नाही. सप्लीमेंटरी आपण येणाऱ्या महासभेमध्ये घेवु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पण याच्यामध्ये दरही आपल्याला बदलवावे लागतील. दराच्या बाबतीत ही सुचना घ्याव्या लागतील.

**मा.आयुक्त :-** दर आज आपल्याला जोडता येणार नाही. दर आता जे आहे ते आपण मान्य करावे आणि येणाऱ्या महासभेमध्ये अंतिम निर्णय घ्यावा. अप्पा तात्पुर्त्या स्वरुपात हा प्रस्ताव मान्य करु या आणि येणाऱ्या महासभेमध्ये जे काही दर वाढवायचे आहे ते अंतिम समजण्यात येतील.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही नाही आता करा, लग्नाचे रु.१,२५,०००/- करा. रोजचे रु.१००००/- घ्या त्यांचेकडुन १० दिवसापासुन टेन्ट टाकत आहे तर

**श्री.नितीन लढ्ढा :-** लग्नाच्या संदर्भात जी दरे आहेत ना ते मी सांगतो आपल्याला, लग्नाच्या संदर्भात आपण

**श्री.कैलास सोनवणे :-** रु.१,२५,०००/- घेतलेले आहे नितीन भाऊ,

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो.

**श्री.कैलास सोनवणे :-** आणि हे जे बोलले ना बंटीभाऊ की, १५ दिवसापासुन येतात, मांडव टाकायला, तर रु.१०,०००/- प्रमाणे रोज घेवु त्यांच्याकडुन.

**श्री.विष्णु भंगाळे :-** आणि स्पोर्टसला थोडी.

**श्री.कैलास सोनवणे :-** स्पोर्टसला आणि धार्मिकला कमी करु. धार्मिक, सांस्कृतिक आणि स्पोर्टस कमीत कमी रु.५००० - रु.५००० आहे ते रु.३००० - रु.३००० करा.

**श्री.नितीन बरडे :-** अप्पा, धार्मिकला रु.१५,०००/- ठेवा.

**श्री.कैलास सोनवणे :-** आपला जसा समज आहे तितकी ऐन्ट्री येत नाही. जे येणारे आहे ते पण बंद होवुन जातील.

**श्री.नितीन बरडे :-** दोन दोन तिन तिन लाख रुपये महाराज घेतात. रोज हजार भक्त येतात तेथे लोकं १०-५० रुपये म्हणुन दक्षणा देतात. रोजची कमाई किती आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** जे मंदिराच भरवत असतील ते करतात असे.

**श्री.नितीन बरडे :-** रोजची साफसफाई आम्हाला करायला लावतात अजुन. भाऊ झाडुवाले पाठुन द्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुमचे म्हणणे वेगळे आहे नितीनभाऊ. त्याच्यासाठी आपण व्यवस्था वेगळी ठेवु.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** सागर पार्कची स्वच्छतेसाठी परमनेन्ट ५ माणसे ठेवुन द्या ना तेथे. तेथेच ठेवुन द्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** लग्नाची संमती आहे का रु.१,२५,०००/-, लग्नाची रु.१,२५,०००/- आणि रु.१०,०००/- रोज जितके दिवस पहिल्यापासुन मांडव टाकत असतील ते लोक स्पोर्टसचे रु.३०००/- घ्या आणि धार्मिकचे रु.५,०००/- घ्या. रु.३०००/- ऐवजी रु.५,०००/- घ्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा जे बंटी भाऊंनी सांगतले ना, मी त्या व्यक्तींचे नांव सांगतो, डॉ.किशोर महाजन म्हणुन

**श्री.कैलास सोनवणे :-** फार पर्टिक्युलर लोकं असतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** असे नाही अप्पा, एक सांगु का ज्याचा रहिवास तेथे त्या ग्राऊंडला लागुन आहे. त्यांच्या ठिकाणी आपण जर कधी राहिलो असतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही. नाही. सहा महिनेतर त्रास होतोच त्या लोकांना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ज्या व्यक्तीला तो त्रास होतो ना त्यालाच तो त्रास होतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यांना डी.जे.चे आहे इतर गोष्टींचे बंधने लावुन देवु ना आपण त्यांना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** डॉ.दातारांच कुटुंब आहे. अत्यंत इतका मोठा त्रास होतो.

**श्री.कैलास सोनवणे :-** तेथे धार्मिक कार्यक्रम होताच किती. तेथे जे लोकं डी.जे. लावतात ना ते बंद करा.

**श्री.नितीन बरडे :-** आप्पा दोन तिन आले असतील नंतर कोणीच नाही . पाच सहा डि जे वाजता.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो, नाही तर त्या लोकांचे जगणे हराम होते.

**श्री.कैलास सोनवणे :-** ठरवा ना काय ठरवायचे. आम्ही रु.५०००/- म्हणत आहे तुम्ही करा तुम्हाला काय करायचे आहे बहुमताने.

**मा.आयुक्त :-** अप्पा साहेब, नितीन भाऊ, आता आपण तात्पुर्त्या स्वरुपात करु आणि येणाऱ्या महासभेमध्ये आपल्या सुचनेप्रमाणे सर्व समावेशक प्रस्ताव ठेवु. त्या सभेमध्ये जो निर्णय होईल तो अंतिम निर्णय राहील. आता पुढील आर्थिक देणे होईपर्यंत धरले तर, तो आपला अंतिम निर्णय आपण पुढे करु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** योग्य आहे. करुन घेवु आप्पा लवकर.

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही होणार, ४० लोक आहे. तुम्हाला ४.०० वाजतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अप्पा तुम्ही जेवण केले ना तर संध्याकाळ करुन देणार येथेच. तुम्ही भुकेले आहात ना तर विषय लवकर लवकर मार्गी लागत आहे. हा विषय मान्य करण्यात यावा आणि तसा सुधारीत प्रस्ताव सर्व सन्मा.सदस्यांनी मांडलेल्या सुचनेच्या अधीन राहुन तसा प्रस्ताव पुढील महासभेमध्ये मांडण्यात यावा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीन भाऊ होणार नाही तसा विषय तुम्ही ऐका. आज तुम्ही हा ठराव मंजुर करत आहात तात्पुर्त्या स्वरूपाचा आणि उद्या आपण दर कमी करू. आज प्रस्ताव प्रशासनाचा आहे. उद्या ऑडिट शक निघाला तर आपण अडकणार ना. त्याच्यामुळे हा विषय तुम्ही जे म्हणत आहात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** दर कमी नाही करायचे आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही पुढे काही गोष्टींचे कमी करावे लागतील भाऊ असे नाही.

**मा.आयुक्त :-** विशाल भाऊ दर ठरविणे हा धोरणात्मक निर्णय आहे. त्याला ऑडिटचा काही विषय नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही असे नाही साहेब, येथे कोणी कुठे माहितीच्या अधिकारात घेतो आणि कोणी कुठे चालला जातो. तुम्हाला काय आहे. तुम्ही रिटायर होऊन जाल.

**मा.आयुक्त :-** किती दर असावे असा जेथे प्रश्न येतो. दर किती असावा हे ठरविण्याचा अधिकार महासभेला आहे. आता पर्यंत आपण जे दर ठरविलेले आहे. त्याच्यामध्ये काही लेखापरिक्षणाचा आक्षेप आला का ? अनावश्यक भिती जर आपण राखली ना. तर निर्णय प्रक्रिया लांबवेल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** वाटल्यास दर आता ठरवला नाही तर हा विषय पेंडींग ठेवा. दोघांपैकी एक करा.

**मा.आयुक्त :-** दर ठरवायला वेळ आताही आहे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** तो पर्यंत आपण जुन्या दराने वसुल करणाच आहे ना म्हणजे महिन्या भरात खुप काही कार्यक्रम होतील तेथे. पुर्वीचे दर तर आपले मंजुरच आहे ना पुर्वीच्या दराप्रमाणे जो हा प्रस्ताव आहे हा रद्द करण्यात यावा. नव्याने प्रस्ताव तयार करा.

**मा.आयुक्त :-** विशाल भाऊ तुम्ही ज्या प्रमाणे बोलत आहे तसे त्याला ऑडीट आक्षेप येणार नाही.

**विशाल त्रिपाठी :-** नाही साहेब पुढच्या सभेत घेवु ना मग.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पुढील महासभेसमोर सर्व सदस्यांच्या सुचनांचा समावेश करुन योग्य तो प्रस्ताव प्रशासनाने सादर करावा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** पुढील सभेत सदरचा प्रस्ताव सादर करावा.

**मा.आयुक्त :-** ही पध्दत हा इन्सीडन्ट झाल्यानंतर प्रशांत पाटील साहेबांनी बंद केलेली आहे. तर आता २०२४ पर्यंत बुकींग होणे, सगळया गोष्टी करण्यात आलेल्या आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** पुढची बुकींग थांबविली पाहिजे.

**श्री.विष्णु भंगाळे :-** चला पुढचा विषय घ्या.

**मा.महापौर :-** विषय क्र.५ सर्वानुमते रद्द करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७६३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या बालगंधर्व नाटयगृह, सागर पार्क मैदान, महानगरपालिकेचे उदयान, बगीचे खुल्या जागा अनामत घेऊन जागा तात्पुरत्या स्वरुपात भाडयाने देणेकामी नव्याने धोरण ठरविणे बाबत प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव रद्द करण्यात येत असून प्रशासनाने जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या बालगंधर्व नाटयगृह, सागर पार्क मैदान, महानगरपालिकेचे उदयान, बगीचे खुल्या जागा अनामत घेऊन जागा तात्पुरत्या स्वरुपात भाडयाने देणेकामी सन्मा.सदस्यांकडून सूचना, अटी-शती व दरां संबंधी माहिती मागवुन सविस्तर परिपुर्ण प्रस्ताव पूढील सभेत सादर करावा.

तोपर्यंत सदयास्थितीत असलेले जुने दर व अटी-शर्तीप्रमाणे जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या बालगंधर्व नाटयगृह, सागर पार्क मैदान, महानगरपालिकेचे उदयान, बगीचे खुल्या जागा अनामत घेऊन जागा तात्पुरत्या स्वरुपात भाडयाने देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ६) अग्निशमन वार्षिक फी व विभागाकडून देण्यात येणाऱ्या इतर सेवेचे दर निश्चित करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.६ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई

**मा.महापौर :-** बोला ताई.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** या मध्ये जे हॉस्पीटल्ससाठी लावलेले आहे, त्या मुद्दयावर मी बोलणार आहे. एक शासन परिपत्रक आहे आयुक्त साहेब की, ५० बेडच्या खाली जर हॉस्पीटल असेल, तर त्याला कोणताही ना-हरकत प्रमाणपत्र आणण्याची गरज नाही असे म्हणतात. तर त्या शासन परिपत्रकाचे सुध्दा पुन्हा अभ्यास होणे आवश्यक आहे प्रशासनाच्या वतीने आणि त्यानुसार मग तो हॉस्पीटल बद्दलचा निर्णय घेणे अपेक्षित आहे. दुसरा एक मुद्दा असा आहे साहेब येथे जो ठराव क्र.८९१ चा उल्लेख आलेले आहे. तो जो ८९१ नंबरचा ठराव होता त्यावेळेला आपले एक स्विकृत सदस्य होते डॉ.राजेश पाटील साहेब त्यांनी तो ठराव मांडलेला होता की डॉक्टरांना ज्या ज्या अडचणी येत आहे म्हणजे मेनली हॉस्पीटल चालविणाऱ्यांना ज्या काही अडचणी येत आहे. अग्निशमन या विषयाला धरून त्याबद्दल तो ठराव मांडलेला होता. तत्कालीन आयुक्तांनी तो विखंडनासाठी पाठविला अजुन पर्यंत तो विखंडीत झालेला नाही. मात्र तेव्हा पासुन आय.एम.ए. वारंवार आय.एम.ए.चे जो कोणी पदाधिकारी असतील. ते प्रशासनाकडे पदाधिकाऱ्यांकडे वारंवार या विषयासंदर्भात पाठपुरावा करत आहे. आज आपण नविन विषय करीत आहोत आणि दुसरे असे की मी लक्षात आणुन देते. ही सेवा कर ज्या आस्थापनांना लावलेले होते, त्यामध्ये हॉस्पीटल्स आस्थापना होती आणि त्यांनीच खरं म्हटलं तर तो कर नियमीत वेळोवेळी आणि जसा या प्रशासनाने मागितला तसा पुर्ण भरलेला आहे. कारण त्यांना त्यांची हॉस्पीटल रन करतांना अग्निशमनचा जर दाखला नसेल तर अनेक अडचणींना तोंड द्याव लागत आणि त्यामुळे त्यांनी जरी त्यांच्या दृष्टीने तो अतिरिक्त कर होता. तरी सुध्दा वेळेवर तो भरलेला आहे. इतर अनेक जी आस्थापना होती हॉटेल म्हणा, रेस्टॉरेंट म्हणा, वाईन शॉप किंवा अनेक प्रकारची अस्थापना होती त्यांनी तो कर कधीही नियमीत भरलेला नाही. प्रशासनाने जर तपासणी केली तर तुमच्या सुध्दा लक्षात येईल की, सगळयात जास्त कर कोणी जमा केलेले आहे. तर तो हॉस्पीटल आस्थापनानेच केलेला आहे. याच्यामध्ये एक विषय असा आहे आयुक्त साहेब, डॉक्टर्स आणि हॉस्पीटल्सला आपण नेहमीच सावत्रपणाची वागणूक दिलेली आहे. डॉक्टरांकडे आपण विविध कर नियम कार्य आणि अन्यायकारक रित्या राबविलेल्या आहे. यात मुळात काय आहे की, अग्निशमन सेवेसाठी चार वेगवेगळया ठरावांनी कर आपण डॉक्टरांकडुन घेतो. अग्निशमन अनामत, अग्निशमन कर तो वेगळा लावला जातो. सेवा कर, आणि बांधकाम क्षेत्राच्या रु.१२/- प्रति चौ.मी. तर एकाच सेवेसाठी वेगवेगळया नावांनी हे जे चार कर लावले जात आहे. याचा प्रशासनाने योग्य तो अभ्यास करावा आणि त्याच्यामध्ये सुसुत्रता आणावी. आताचे जे रेट प्रशासनाने आणलेले आहे. त्याबद्दल खुप आक्षेप नाही. ते खरोखर रिझनेबल दिसत आहे. पण मी हे शासन परिपत्रकाचा उल्लेख केलेला आहे. त्याचा पण विचार व्हावा आणि हे जे चार वेगवेगळया नावाने कर हॉस्पीटल्सला लावले जात आहे. त्या बद्दलचा एक परिपुर्ण अभ्यास व्हावा. त्या संदर्भात ज्या दुरूस्ती करता येणार आहे. त्या दुरूस्तींना अधिन राहुन आजचा हा ठराव मंजुर करण्यात यावा. आपण खरं तर हे लक्षात ठेवायला हव की, कोविडच्या काळामध्ये जी प्रायव्हेट हॉस्टपीटल्स होते. त्यांनीच खरं तर वैद्यकीय सेवेचा भार सगळयात जास्त वाटलेला आहे. तर आपण सुध्दा त्यांना योग्य पध्दतीनेच कर आकारणी केली पाहिजे. त्यांना सहकार्य केले पाहिजे. या गोष्टीची प्रशासनाने नोंद घ्यायची आहे आणि ज्या काही मी सुचना दिलेल्या आहे. त्याचा परिपुर्ण अभ्यास होवुन त्याला अनुसरूनच हा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा.आयुक्त :-** त्यामुळे ह्या प्रस्तावाचा पुन्हा फेरविचार करण्याची तशी आवश्यकता नाही. आपण जे म्हणतात, मल्टीपल टॅक्सींग जे त्यांना लागत हाते. ते आपण काढुन टाकलेले आहे. स्क्वे.मी. वर जी रु.१२/- आकारणी आपण गेल्या ७-८ वर्षापासुन करत होतो. ती नियमाला धरून नाही, ही जी त्यांची मागणी होती. ती ही आपण आता मान्य केलेली आहे. हा ठराव अस म्हणतो, १ एप्रिल पासुन जे लागु होणार आहे. त्याच्यामध्ये स्क्वे.मी वर रु.१२/- आकारणी होणार नाही. आपण जे म्हटलात की ही सन्मा.स्विकृत सदस्यांनी हा विषय मांडला होता आणि तो पाठविला आयुक्तांनी, दुसरा यासाठी पाठविला होता की, तो ठराव आपला फक्त नर्सिंग होम ॲक्ट खाली रजिस्ट्रेशन झालेल्या हॉस्पीटल पुरताच होता. असे आपल्याला आस्थापना मध्ये फरक करणे योग्य नाही म्हणुन तो आपण ठराव पाठविला होता. आता तो ही ठराव आपण खाली विखंडीत करत आहोत. म्हणजे कुठेही

कायदेशीर गुंतागुंती होवु नये म्हणुन प्रत्येक दराचा हा जो ठराव आहे. हा प्रतिबंधक कायदा जो होता त्याच्या अन्वये तो ठराव जो होता तो योग्य होता. सन २०११-१२ मध्ये त्याच्यामध्ये अनावश्यक दुरुस्त्या केल्या गेल्या. त्यामुळे सगळी जी कायदेशीर गुंतागुंत झालेली होती. ती दुर करण्याच्या संदर्भामध्ये आपण आयोगाचे चेअरमन असतील, आयोगाचे सेक्रेटरी असतील. यांच्याशी दोन तीन वेळा बैठका घेतलेल्या आहे. पदाधिकाऱ्यांशी चर्चा केलेली आहे आणि याच्यानंतर सर्व मान्य असा प्रकारचा हा प्रस्ताव आलेला आहे. आदी प्रस्तावाच्या दराच्या संदर्भामध्ये सुध्दा आपण अयोगाच्या लोकांशी औपचारीक दोघी पध्दतीने चर्चा केलेली आहे. त्यामुळे मला असे वाटते, या जर प्रस्तावाला आज आपण जर मान्यता दिली. तर आयोगाचे आता पर्यंत आलेल्या सगळया सुचनांचा समावेश होईल आणि त्याच्यावर होत असलेल्या डबल टॅक्सचा जो भाग आहे तो दुर होणार. कारण त्यामध्ये काही आपण शासन सरक्युलर दिलेले आहे. त्या सरक्युलरचा विचार हे त्यांच्या स्तरावर निश्चितच करतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर** :- माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.६ सर्वानुमते मंजुर करण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.७६४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६, कलम २५ च्या पोटकलम १ नुसार आग सुरक्षा निधी स्थापन करण्यात आलेला असुन अधिनियमाच्या कलम ११ नुसार अनुसुची दोनमध्ये वेगवेगळया प्रकाराच्या इमारतींना अग्निशमन सेवा फी निर्धारीत करण्यात आलेली आहे. या अनुषंगाने जळगांव शहर महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र.२६३ दि.०८/०२/२०१० व मा.महासभा ठराव क्र.४९० दि.२०/०२/२०१० अन्वये ३ ते ५ लाख लोकसंख्येच्या महापालिकेला निर्धारीत केलेल्या वेगवेगळया प्रकाराच्या इमारतींना सदर ठरावाच्या परिशिष्ठात नमूद केलेल्या अग्निशमन सेवा फी आकारण्यास मा.महासभेने मान्यता देण्यात आली होती.

मनपा नगररचना विभागा मार्फत सर्व प्रकाराच्या इमारतींना बांधकाम परवानगी देतेवेळी सरसकट १०,०००/- रु. अग्निशमन सेवा फी संबंधितांकडून वसूल करण्यात येते. तरी स्थायी समिती ठराव क्र.२६३ दि.०८/०२/२०१० व मा.महासभा ठराव क्र.४९० च्या परिशिष्ठात नमूद असलेल्या वेगवेगळया प्रकाराच्या इमारतींना वेगवेगळया प्रकारची अग्निशमन सेवा फी किमान फी च्या अधिन राहून घेण्यात येवून सदर ठरावाची पुर्णपणे अंमलबजावणी नगररचना विभागाकडून होणे आवश्यक आहे.

अग्निशमन सेवा विभागाकरीता पारित करण्यात आलेले ठराव पुढील प्रमाणे १) मा.स्थायी समिती ठराव क्र.६०७ दि.०५/०२/२०११ व २) मा.महासभा ठराव क्र.९३० दि.१४/०२/२०११, अग्निशमन वार्षिक सेवा शुल्क, ३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४ दि.१३/१२/२०१३, मनपा हद्दीच्या बाहेर आग विझविण्याचे बिल ४) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५ दि.१३/१२/२०१३ मनपा हद्दीत व हद्दी बाहेर अग्निशमन लायसन्स नविन देणे व नुतनिकरण करणे फी ५) मा.महासभा ठराव क्र.८९१ दि.२३/०३/२०१८ अग्निशमन वार्षिक फी.

१ ते ५ ठरावा मधील मा.महासभा ठराव क्र.८९१ विखंडनाचा प्रस्ताव शासनाकडे दि.२०/०४/२०१८ रोजी पाठविण्यात आलेला होता परंतू त्यावर आजपावेतो शासन स्तरावरुन कोणतेही आदेश प्राप्त झालेले नाहीत. तरी उक्त १ ते ५ ठराव अधिक्रमीत करुन अग्निशमन विभागाकडून देण्यात येणाऱ्या वेगवेगळया सेवा फी करीता प्रस्तावित तक्त्या नुसार दर निश्चित करण्यात यावेत ज्यामुळे अग्निशमन फी आकारण्यास सुसुत्रता, स्पष्टता व पारदर्शकता येईल. अग्निशमन अधिनियम २००६, कलम १३ नुसार अग्निशमन वार्षिक फी अग्निशमन विभागाने किमान फी च्या आधिन राहून

अग्निशमन वार्षिक फी सुधारीत शुल्काने आकारण्याचा सन-२०२२-२३ या आर्थिक वर्षापासून प्रस्तावित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जिव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६, कलम ११ व कलम १३ नुसार बऱ्याच महानगरपालिकेत त्या त्या वर्गा नुसार अधिनियमातील अनुसुची दोन मधील शासनाने निर्धारीत केलेल्या दरानुसार फी आकारण्यात येते. पुणे, पिंपरी/चिंचवड, औरंगाबाद महानगरपालिका यांचे कडून अग्निशमन फी बाबत मागविण्यात आलेले आदेश व ठराव या फी व्यतीरिक्त पुर्विच्या प्रचलित फायर प्रिमियम चार्जेस सुध्दा आकारण्यात येतात. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ३८६ पोटकलम २ नुसार अग्निशमन दाखले देणे किंवा लेखी परवानगी देणे, तसेच अग्निशमन विभागाकडून देण्यात येणाऱ्या इतर सेवे पोटी वेगवेगळया महानगरपलिकेत वेगळेवगळी फी आकारणी करण्यात येते.

अग्निशमन सेवा हि अत्यावश्यक स्वरुपाची सेवा असून नगारिकांना सक्षम व प्रभावीपणे पुरवणे हे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे, सदरची सेवा पुरविण्यासाठी केंद्राची उभारणी करणे, वाहने, उपकरणे यांची खेरेदी, विशेष वापराची (स्पेशल पर्पज) वाहने, उपकरणे यांची उपलब्धता, त्याची नियमीत देखभाल दुरुस्तीची व्यवस्था, प्रशिक्षित असा सेवक वर्ग नेमणे, कर्मचारी प्रशिक्षणाला पाठविणे, कर्मचारी गणवेश व तदनुषंगिक सुविधा पुरविणे त्याकरीता आर्थिक तरतूद आवश्यक असते. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३८६ पोटकलम २ व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६, नुसार जळगांव शहर महानगरपालिका जळगांव अग्निशमन विभागामार्फत अग्निशमन ना-हरकत दाखला, नुतनीकरण, तसेच इतर सेवा फी यामध्ये सुसुत्रता, स्पष्टता व पारदर्शकता येणे कामी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षा पासून सोबत दिलेल्या परिशिष्ठ “अ” तक्त्यानुसार सुधारीत फी लागू करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच अग्निशमन विभागातंर्गत विविध प्रकारचे सेवा शुल्क आकारणी संदर्भात पारित करण्यात आलेले १) मा.स्थायी समिती ठराव क्र.६०७ दि.०५/०२/२०११, २) मा.महासभा ठराव क्र.९३० दि.१४/०२/२०११, ३) मा.स्थायी समिती ठराव क्र.२४ दि.१३/१२/२०१३, ४) मा.स्थायी समिती ठराव क्र.२५ दि.१३/१२/२०१३ ५) मा.महासभा ठराव क्र.८९१ दि.२३/०३/२०१८ या प्रमाणे ठराव पारीत झालेले ५ ठराव अधिक्रमीत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत असून परिशिष्ठ “अ” मधिल तक्त्यानुसार सुधारीत सेवा शुल्काचे सुधारीत फी/दर निश्चित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**परिशिष्ठ “अ”**

| **अग्निशमन फी/शुल्क** | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | इमारतीचा भोगवटा प्रकार | जळगांव शहर महानगरपालिका प्रस्तावित असलेले दर | |
| | | फी प्रति चौ.मी.रु. | किमान रुपयाचा अधिन |
| १. | महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ चे कलम १३ (१) | अग्निशमन वार्षिक फी २% (कलम ११ नुसार घेण्यात आलेल्या | निवासी इमारती करीता ५००/- रु.<br>अनिवासी/व्यावसायीक इमारती १०००/- रु. |

| | | | |
|---|---|---|---|
| | नुसार अग्निशमन वार्षिक फी | किमान फी वर) | |
| | | उक्त दोन्ही पैकी जी फी जास्त असेल ती आकारावी. | |
| २. | अग्निशमन ना-हरकत दाखला शुल्क | | निवासी इमारती व अनिवासी/व्यावसायीक इमारती २०००/- रु.,<br>हॉस्पिटल ० ते २० बेड करीता २०००/- रु., व २० बेड वरील हॉस्पिटल करीता ३०००/- रु.,<br>(मनपा हद्दीबाहेर ३०००/-) |
| ३. | अग्निशमन ना-हरकत दाखला नुतनीकरण | | निवासी इमारती व अनिवासी/व्यावसायीक इमारती २०००/- रु.,<br>हॉस्पिटल ० ते २० बेड करीता १५००/- रु., व २० बेड वरील हॉस्पिटल करीता ३०००/- रु.,<br>(मनपा हद्दीबाहेर ३०००/-) |
असा ठराव करण्यात येतो की, पिंप्राळा शिवार गट नं.४० ही जागा द्रोपदी नगर बालसंस्कार व सामाजिक मंडळ,जळगांव या संस्थेस दिलेली असल्याने पिंप्राळा शिवार गट नं.४० ही जागा व त्याठिकाणची इमारत सामाजिक, सांस्कृतिक क्रीडा इत्यादी विविध उपक्रमासाठी जळगांव जिल्हा सकल मराठा समाज बहुउद्देशीय संस्थेस देणेबाबत आलेला प्रस्ताव रद्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

मात्र जळगांव जिल्हा सकल मराठा समाज बहुउद्देशीय संस्थेस सामाजिक, सांस्कृतिक क्रीडा इत्यादी विविध उपक्रमासाठी जळगांव शहरातील मध्यवर्ती भागात महानगरपालिकेच्या मालकीची जागा उपलब्ध असल्यास तसा सविस्तर प्रशासकीय प्रस्ताव पूढील महासभेत प्रशासनाने सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- बरडे नितीन मनोहर**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** १६) मौजे जळगांव शिवार स.नं.२४७/३/अ ही मनपा खुली जागा अखिल भारतीय,श्री.स्वामी समर्थ गुरुपीठ यांना समाज उपयोगी कामासाठी देण्याबाबत मा.उपमहापौर,मनपा,जळगांव यांचेकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, नेमकी कोणती जागा कारण यावरुन आम्हाला ज्ञात होत नाही की, नेमकी जागा कोणती?

**मा.उपमहापौर :-** रिंगरोडवर श्री.स्वामी समर्थ केंद्र आहे त्याच्या समोर एक खुली जागा पडलेली आहे. त्या ठिकाणी अखिल भारतीय श्री.स्वामी समर्थ गुरुपीठ यांचा बालसंस्कार सुरु करण्याचा एक मानस आहे. त्या ठिकाणी त्यांनी ती जागा महापौरांकडे आणि माझ्याकडे पत्राद्वारे विनंती करुन महानगरपालिका प्रशासनाला ती जागा मिळणेसाठी एक प्रस्ताव सादर केला होता.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** कुलभुषण भाऊ श्री.स्वामी समर्थ केंद्राबद्दल तुम्ही बोलत आहे. त्याच्या एकझ्याक्ट समोर म्हणजे कुठली जागा. ते माझेच प्रभागात आहे पण लक्षात येत नाही ही जागा कुठे आहे.

**मा.उपमहापौर :-** रिंगरोडच्या एकझ्याक्ट बाजुला,

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** कारण तिथे जे स्वामी समर्थ केंद्र आहे त्याच्या आजूबाजुला पुर्ण रहिवासी भाग आहे.

**मा.उपमहापौर :-** त्याच्या पुढे गेल्यानंतर रिंगरोड लागतो. त्याच्या समोरची जागा आपण दिलेली आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** म्हणजे कुठली.

**मा.उपमहापौर :-** रिंगरोडच्या अपोझीट साईडची.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** नगररचना विभागाने सांगाव. नेमकी कुठली जागा आहे. काय आहे हे मोघम स्वरुपाचे प्रस्ताव असतात.आता तुम्ही म्हणत आहात की, या संस्थेने तुमच्याकडे अर्ज केला.

**मा.उपमहापौर :-** सिटी सर्व्हे नंबर टाकलेला आहे त्याच्यावर

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** सिटी सर्व्हे नंबर दिलेला आहे पण फक्त नुस्ता सिटी सर्व्हे नंबर वरुन आपण बोली भाषेत आपण जे काही म्हणतो. ते सुध्दा जर मेन्शन केलेल असेल, तर सभागृहाला निर्णय घ्यायला सोईचे होईल.

**मा.उपमहापौर :-** बोली भाषेत म्हणजे कसे ?

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** आपण जागेला काही नांव देतो, याच्या शेजारी, या दवाखान्याच्या शेजारी, कोठीच्या शेजारी, यांच्या घरा शेजारची. याच्या समोरची, ते सुध्दा त्याच्यामध्ये मेन्शन असावे. कॉलनीचे नांव मेन्शन असावे. जेणे करुन सन्मा.सदस्यांना समजणे सोयीचे होईल. आता तुमचा अर्ज तुम्ही येथे दिलेला आहे पण या संस्थेचा अर्ज येथे कुठेही दिसुन येत नाही. सोबत डॉकेटमध्ये आम्हाला कसे समजणार, प्रशासनाची शेवटी ही

जबाबदारी आहे. जरी अशासकीय प्रस्ताव असला. तरी सुध्दाही जबाबदारी आहे आणि मुळात त्या भागातल्या नागरीकांची नाहरकत आहे का ?

**मा.उपमहापौर :-** संबंधीत संस्थेने प्रशासनाला देखील तसा अर्ज दिलेला आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** तसा प्रशासनाने प्रस्ताव आणु द्यावा. जर प्रशासनाला दिलेला असेल, जर ते सगळ नियमाला धरुन आहे. त्या भागाच्या नागरीकांची जर ना-हरकत पत्र सोबत जोडलेली असेल संस्थेने तसा प्रशासकीय प्रस्ताव सभेसमोर येऊ द्या.

**मा.उपमहापौर :-** मला सांगा या प्रस्तावाला आपला विरोध आहे का ?

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** विरोधाचा विषय नाही कुलभुषणभाऊ, विषयाला वेगळयाने घेवु नका. असे मोघम स्वरुपाचे प्रस्ताव आल्यामुळे भविष्यात सामोरे जावे लागतात वादाला, आता तुमच्या बोलण्यावरुन स्पष्ट झाले की, हा रिंग रोडचा विषय आहे. रिंगरोड म्हणजे माझाही प्रभाग येतो रिंगरोडचा काही भाग, दिपमालाताई आपले सन्मा.सदस्या सिमाताई या दोघींचाही येतो. अजुन एकझ्याक्ट लोकेशन आमच्या तिघांच्या लक्षातही येत नाही. मामी तुमच्या लक्षात येत आहे का एकझ्याक्ट लोकेशन,

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई, एक मिनीट थांबा मा.उपमहापौर साहेब, एक विषय होता ते लोकं पण माझ्याकडे आलेले होते. आमचे गुरुच आहे ते आणि ते पण मराठा समाजाचेच आहे. तोही विषय आणि हा ही विषय त्या भागाच्या नागरीकांच्या संमतीशिवाय तुम्ही ठराव करा की, काही करा. सुप्रिम कोर्टाचा निकाल आहे तुम्ही देऊ नाही शकत. बाकीच चर्चा आणि वाद घालण्याचा विषयच येत नाही. होणारच नाही. तुमच्या माहितीसाठी सांगतो मी ठराव केला तरी काही होत नाही, विरोध केला तरी ही काही होत नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** होत काय, आपण असे ठराव करुन टाकतात, आपला कोणाचा याच्यामध्ये काही स्वार्थ नाही. अर्ज कुलभुषण भाऊंनी दिला आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** ताई, ताई, एक मिनीट थांबा, शॉर्ट मध्ये मी सांगतो. महापौर मॅडम आणि उपमहापौर साहेब, तुमच्याकडे कोणी नागरीक आला ना, त्या वार्डातील जे असतील त्यांना एक शब्द विचारुन घ्यायचे की, हे होणारच नाही. तुम्ही ठराव जरी केले ना तरी होणार नाही.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** काय होत, तुमच्या सगळयांच्या एखाद्या वेळी लक्षात असेल, अशी रिंगरोडचीच जागृती महिला मंडळ नावाची जागा होती. ज्या मंडळाची कुठेही नोंद सापडली नाही पण त्या जागृती महिला मंडळाच्या जागेवर पोटभाडेकरु आजही जेडीसीसी बँकेची शाखा आहे आणि काय होत आहे की प्रशासन सुस्त आहे. म्हणजे ती जागा आपण शोधली. ते लक्षात आणुन दिले की, हे असे बेकायदेशीर पध्दतीने झालेले आहे. हे मंडळही कुठे अस्तीत्वात नाही. त्याचे संबंधीत कोणी लोकं सापडत नाही. अजुनही प्रशासनाने ती जागा पुन्हा ताब्यात घेतलेली नाही. म्हणजे मनपाच्या बहुमुल्य जागा कोणाच्याही अश्या तश्या निघुन जातात. तर कृपया अश्या पध्दतीचे ठराव करु नका. जर त्या सगळया तेथील नागरीकांची ना-हरकत असेल तर आमची हरकत असण्याचे कारण नाही. पण स्थानिक नगरसेवकांना सुध्दा विश्वासात घेणे आवश्यक आहे. कारण शेवटी नागरीक तक्रार करायला कोणाकडे येतात. स्थानिक नगरसेवकांकडेच येतात. त्यामुळे असे विषय मंजुर करु नका. हाच नाही येथुन पुढचेही काही विषय आहे. त्यामुळे या सगळया गोष्टींची पडताळणी होणे आवश्यक आहे. ना-हरकत आहे का ? सगळया नागरीकांची ले-आऊट धारकांची, नेमके कोणत्या संस्थेने दिलेला आहे अर्ज ते सुध्दा पटलावर येणे आवश्यक आहे. असा जर परिपुर्ण प्रस्ताव असेल तर कोणतीच हरकत नाही. असे मात्र नसेल तर मात्र हे विषय मंजुर करु नका.

**श्री.कैलास सोनवणे :-** साधा विषय आहे, वादच करायचा नाही, चर्चाच करायची नाही, इमप्लीमेंटच होणार नाही.

**मा.उपमहापौर :-** नागरीकांच्या सह्या घेतल्यानंतर तर आपल्याला मंजुर करता येईल ना, मग ठिक आहे ना. मात्र ती पुढची प्रोसिजर आहे. मी त्यांना तुम्हाला वैयक्तीक एक पत्र द्यायला सांगतो त्या संस्थेला.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** वैयक्तीक पत्राचा विषय नाही कुलभुषण भाऊ हा स्थानिक नागरीकांचा विषय आहे. माझा संबंध नाही तो ते अजुन ही ती जागा माझ्या प्रभागात आहे की, ती दिपमालाताईच्या प्रभागात आहे ते अजुन ही मला कळलेले नाही. पण शेवटी स्थानिक नागरीक शेवटी आमच्याकडे येणार आहे. त्यामुळे स्थानिक नागरीकांचे जर तुम्ही सह्या आणलेले असतील. तर दाखवा ते आणि मंजुरी घ्या. कोणीच नाही म्हणणार नाही तुम्हाला,

**मा.उपमहापारे :-** आपले ह्या प्रस्तावाचे काय?

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** रद्द करा हा विषय, ज्या विषयांमध्ये संदिग्धता आहे. ते विषय रद्द करा परिपुर्ण विषय सभेसमोर आणा नंतर आपण मान्यता घेवु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला वाटते मा.महापौरताई, याच्यामध्ये स्थानिक नागरीकांचा मोठया प्रमाणावरती रोष जो आहे ना तो स्थानिक नगरसेवकांवरती होतो. आपण सभागृहात एखादा ठराव करतो, परंतु तेथील स्थानिक परिस्थिती काय असते ती आपल्याला अवगत नसते. परंतु ज्या वेळेला एखादी संस्था जी त्या भागाशी संदर्भीत नसते आणि या संस्थेने तेथे जावुन काही कार्य सुरु केल्यानंतर स्थानिक नागरीकांचा रोष जो आहे. तो संबंधीत लोक प्रतिनिधींवर येतो की, आमच्या प्रभागातली जागा इतर संस्थेला देण्याच्या मागचा हेतु काय ? तो एक ठराव आहे. दुसरं सुप्रिम कोर्टाचा निकाल अगदी स्पष्ट आहे की, ज्या ले-आऊट मध्ये ती खुली जागा असेल, त्याच्यावर पहिला हक्क तेथील स्थानिक नागरीकांचाच आहे. मला वाटते आता खुल्या जागा संदर्भातले जितकेही प्रस्ताव असतील. मला वाटते हे सर्व तहकुब करुन प्रशासनाच्या माध्यमातुन देवु या आणि यापुढे खुल्या जागांचे जे काही प्रस्ताव मा.महापौरताई किंवा मा.उपमहापौरांकडुन आपल्याकडे येत असतील. सरळ आपण काय करायचे की, असे प्रस्ताव संबंधीत प्रशासनाकडे डॉकेटसह येण्याचे संदर्भातल्या सुचना द्याव्या. जेणे करुन त्याच्यातली त्या जागेच्या संदर्भातली पार्श्वभुमी, त्याच्यावर असेलेले कोणाचे हक्क या सगळया गोष्टींचा खुलासा केल्यानंतर या सभागृहाला त्याच्यावरती निर्णय घेणे सोयीस्कर पडेल. कारण याच्यातला संघर्ष टाळला जाईल. आपण काय करतो ठराव करतो. त्याची अंमलबजावणी होत नाही. या संस्थेचे पदाधिकारी सुध्दा येवुन जावुन आपल डोक खातात. आपण प्रशासनाचा डोकं खातो. संबंधीत तिथला लोकप्रतिनिधी येवुन तो प्रशासनाला जबाबदार पकडत असतो. याच्याने खुप मोठे कॉनफ्लक्ट निर्माण होतात. हे सगळे प्रस्ताव जर खुल्या जागांचे संदर्भातले असतील तर ते सगळे तहकुब करण्यात यावे. जसे जसे विषय येतील तसे तसे ते तहकुब करु या आणि संपुर्ण प्रस्ताव रितसर प्रशासनाने डॉकेटसह पुढील महासभेमध्ये पाठवु या.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** हा विषय पुढच्या महासभेमध्ये घ्या आणि नगरसेवकांकडून माहिती घेण्यात यावी.

**मा.महापौर :-** या पुढच्या महासभेला डॉकेटसह प्रस्ताव सादर करावा. याच पध्दतीने याच्यापुढे सुध्दा जे आमच्याकडे स्थानिक नागरीक असतील किंवा संस्था एखाद्या जागेची मागणी करत असतील. तर आपण प्रशासनाकडे पाठविल्यानंतर आपण त्याची पुर्ण माहिती घेवुन डॉकेटसह येवु द्यावे. असे होते की, डॉक्युमेंट आम्ही पाठवितो, पत्र पाठवितो पण त्याच उत्तर प्रशासन देत नाही वेळेवर डॉकेट त्याचे बनवत नाही. तो प्रस्ताव तसाच राहतो. तर त्या अनुषंगाने आपण पुन्हा ती कार्यवाही करुन पुढच्या महासभेला तो प्रस्ताव घेण्यात यावा.

**नगरसचिव :-** २२ पर्यंत आहे का ते ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो २२ पर्यंत आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र. १६ हा सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७७४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मौजे जळगांव शिवार स.नं.२४७/३/अ ही मनपा खुली जागा अखिल भारतीय,श्री.स्वामी समर्थ गुरुपीठ यांना समाज उपयोगी कामासाठी देण्याबाबत आलेला प्रस्ताव तहकूब करण्यात येत आहे.

प्रशासनाने उपरोक्त जागेसंदर्भात सविस्तर माहिती घेवून अधिनियमातील तरतूदीनूसार पूढील सभेत परिपूर्ण प्रशासकीय प्रस्ताव सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** १७) नागरीकांना वैदयकिय सुविधा उपलब्ध करुन देणेकामी “वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैदयकीय मदत कक्ष” यांना जळगांव शहराच्या मध्यवर्ती भागात जागा उपलब्ध करुन देणेबाबत मा.उपमहापौर,मनपा,जळगांव यांचेकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** या संदर्भात जागा कुठली आहे ते स्पष्ट होत नाही. जर कधी जागा निश्चित झालेली असेल, तसा प्रस्ताव आला तर योग्य पध्दतीने त्याच्यावर विचार करु.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई विरोध करण्याच काही कारण नाही. पण जेव्हा इतक्या मोठया व्यक्तीच्या नावाने आपण एखादे कार्य करण्यासाठी जी जागा मागतो. त्यावेळेला परिपुर्ण प्रस्तावच महासभेसमोर आला पाहिजे. अन्यथा काय होत की, ते कायद्याच्या कचाटीत सापडतो आणि नाहक वादाला दोन्ही पक्षांना सामोरे जाव लागते. तशी काही घटनाच नसते. पण तशी ती रंगते. तरी परिपुर्ण प्रस्ताव आणुन जसे नितीन भाऊंनी मांडल परिपुर्ण प्रस्ताव आणा आणि त्यानंतर आपण या विषयावर निर्णय घेवु.

**मा.महापौर :-** विषय क्र. १७ हा सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७७५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरीकांना वैदयकिय सुविधा उपलब्ध करुन देणेकामी "वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैदयकीय मदत कक्ष" यांना जळगांव शहराच्या मध्यवर्ती भागात जागा उपलब्ध करुन देणेबाबत आलेला प्रस्ताव तहकूब करण्यात येत आहे.

प्रशासनाने वंदनीय बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैदयकीय मदत कक्षासाठी जागा देणे आवश्यक आहे त्यासाठी जळगांव शहराच्या मध्यवर्ती भागात जागा उपलब्ध असल्यास त्या जागेसंदर्भातील सविस्तर प्रशासकीय प्रस्ताव पूढील महासभेत सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** १८) मनपा खुला भुखंड क्रं.१५१/१ ही जागा समाजोपयोगी कामासाठी हॅप्पी मिरर रिसर्च ॲण्ड मल्टीपर्पज फौऊंडेशन यांना उपलब्ध करुन देणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.पार्वताबाई दामु भिल यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तहकुब,

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र. १८ हा सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७७६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा खुला भुखंड क्रं.१५१/१ ही जागा समाजोपयोगी कामासाठी हॅप्पी मिरर रिसर्च ॲण्ड मल्टीपर्पज फौऊंडेशन यांना उपलब्ध करुन देणेबाबत आलेला प्रस्ताव तहकूब करण्यात येत आहे.

प्रशासनाने हॅप्पी मिरर रिसर्च ॲण्ड मल्टीपर्पज फौऊंडेशन यांना समाजोपयोगी कामासाठी जागा देणे आवश्यक आहे त्यासाठी जागा उपलब्ध असल्यास त्या जागेसंदर्भातील सविस्तर प्रशासकीय प्रस्ताव पूढील महासभेत सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** १९) प्र.क्र.३ अंतर्गत खेडी गावठाण परिसरातील गट नं.६४ चा खुला भुखंड विकसित करणेसाठी शिवराज्य प्रतिष्ठान,जळगांव शहर यांना देणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.रंजना भरत सपकाळे यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तहकुब,

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र. १९ हा सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.७७७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्र.क्र.३ अंतर्गत खेडी गावठाण परिसरातील गट नं.६४ चा खुला भुखंड विकसित करणेसाठी शिवराज्य प्रतिष्ठान,जळगांव शहर यांना देणेबाबत आलेला प्रस्ताव तहकूब करण्यात येत आहे.

प्रशासनाने शिवराज्य प्रतिष्ठान,जळगांव शहर यांना समाजोपयोगी कामासाठी जागा देणे आवश्यक आहे त्यासाठी जागा उपलब्ध असल्यास त्या जागेसंदर्भातील सविस्तर प्रशासकीय प्रस्ताव पूढील महासभेत सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** २०) जळगांव शिवार स.नं.१४२ मधील खुली जागा (ओपनस्पेस) सांस्कृतिक व शैक्षणिक कामासाठी मिळणेबाबत श्री श्याम परिवार फौऊंडेशन,जळगांव यांनी दिलेल्या अर्जावर निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** तहकुब,
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय क्र. २० हा सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७७८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शिवार स.नं.१४२ मधील खुली जागा (ओपनस्पेस) सांस्कृतिक व शैक्षणिक कामासाठी मिळणेबाबत आलेला प्रस्ताव तहकूब करण्यात येत आहे.

प्रशासनाने श्री श्याम परिवार फौऊंडेशन,जळगांव यांना सांस्कृतिक व शैक्षणिक कामासाठी जागा देणे आवश्यक आहे त्यासाठी जागा उपलब्ध असल्यास त्या जागेसंदर्भातील सविस्तर प्रशासकीय प्रस्ताव पूढील महासभेत सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** २१) मनपा हद्दीतील मौजे पिंप्राळा गट नं.१९०/५ मोकळी जागा अध्यक्ष, राम आनंद बहुउद्देशीय संस्था,जळगांव यांना मिळणेबाबत अध्यक्ष, राम बहुउद्देशिय संस्था,जळगांव यांनी दिलेल्या अर्जावर निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** तहकुब,
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय क्र. २१ हा सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे.
**मा.उपमहापौर :-** भाऊ एक मिनीट, हा नंबर-२१ चा जो विषय आहे ना तो तेथील नागरीकांनीच दिलेला आहे. त्यांच्या सह्यापण आहे त्याच्यावरती तेथील भुखंड धारकांच्या,
**श्री.सुनिल महाजन :-** प्रशासनामार्फतच येवु द्या विषय.
**मा.महापौर :-** विषय क्र. २१ हा सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७७९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा हद्दीतील मौजे पिंप्राळा गट नं.१९०/५ मोकळी जागा अध्यक्ष, राम आनंद बहुउद्देशीय संस्था,जळगांव यांना मिळणेबाबत आलेला प्रस्ताव तहकूब करण्यात येत आहे.

प्रशासनाने राम आनंद बहुउद्देशीय संस्था,जळगांव यांना समाजपयोगी कामासाठी जागा देणे आवश्यक आहे त्यासाठी जागा उपलब्ध असल्यास त्या जागेसंदर्भातील सविस्तर प्रशासकीय प्रस्ताव पूढील महासभेत सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** २२) मौजे निमखेडी गट नं.२४ या मंजुर अभिन्यासातील खुला भुखंड (ओपनस्पेस) विकसीत करणेकामी जयभद्रा बहुउद्देशिय संस्था,जळगांव यांना देणेबाबत जयभद्रा बहुउद्देशिय संस्था,जळगांव यांनी दिलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तहकुब,

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र. २२ हा सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्यामध्ये एकच आहे. प्रशासनाने या संदर्भातील योग्य ती कायदेशीर प्रक्रिया पार पाडुन योग्य डॉकेटसह पुढील महासभेसमोर प्रस्ताव सादर करावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७८० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मौजे निमखेडी गट नं.२४ या मंजुर अभिन्यासातील खुला भुखंड (ओपनस्पेस) विकसीत करणेकामी जयभद्रा बहुउद्देशिय संस्था,जळगांव यांना देणेबाबत आलेला प्रस्ताव तहकूब करण्यात येत आहे.

प्रशासनाने जयभद्रा बहुउद्देशिय संस्था,जळगांव यांना समाजपयोगी कामासाठी जागा देणे आवश्यक आहे त्यासाठी जागा उपलब्ध असल्यास त्या जागेसंदर्भातील सविस्तर प्रशासकीय प्रस्ताव पूढील महासभेत सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

| | | | |
|---|---|---|---|
| **अनुकूल मते** | **:- ६६** | **प्रतिकुल मते :- ००** | |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** | | |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** | | |

**नगरसचिव :- विषय क्रं:-** २३) मनपा प्र.क्र.१५ अंतर्गत मेहरुण गावठाण सि.स.नं.४८६ मनपाच्या खुल्या जागेत सामाजिक हॉलला माजी नगरसेविका स्व. श्रीमती सुभद्राबाई सुरेश नाईक यांचे नांव देणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.कैलास नारायण सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.कैलास सोनवणे :-** विषय क्र.२३, २४ ते सारखे विषय आहे. त्यामुळे ते मंजुर. नांव देण्याचे आहे ते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्र. २३,२४ मंजुर.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र. २३ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७८१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा प्र.क्र.१५ अंतर्गत मेहरुण गावठाण सि.स.नं.४८६ मनपाच्या खुल्या जागेत सामाजिक हॉल स्थित असून सदर प्रभागासाठी माजी नगरसेविका स्व.श्रीमती सुभद्राबाई सुरेश नाईक यांनी विविध विकास कामांसाठी अथक प्रयत्न केलेले असून त्या सुमारे ३० वर्षापासून या प्रभागाच्या जेष्ठ नगरसेविका होत्या. स्व.श्रीमती सुभद्राबाई सुरेश नाईक यांची या प्रभागात आठवण म्हणून मनपा प्र.क्र.१५ अंतर्गत मेहरुण गावठाण सि.स.नं.४८६ मनपाच्या खुल्या जागेत सामाजिक हॉलला माजी नगरसेविका स्व. श्रीमती सुभद्राबाई सुरेश नाईक यांचे नांव देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागेस यापुर्वी कोणाचे नांव दिले गेले नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

| | | | |
|---|---|---|---|
| **अनुकूल मते** | **:- ६६** | **प्रतिकुल मते :- ००** | |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** | | |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** | | |

**नगरसचिव :- विषय क्रं:-** २४) प्र.क्र.२ कांचन नगर मधील प्ले सेंटर जवळील चौकास " विलास चौक " नामकरण करणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.किशोर रमेश बाविस्कर यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र. २४ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७८२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्र.२ अंतर्गत कांचन नगर परिसरात प्ले सेंटर जवळ विलास चौक स्थित असून तेथे सुमारे २० वर्षापासुन नागरीक दाटवस्तीचा रहिवासी परिसर आहे तसेच सदर परिसरात " विलास चौक " हे एकमेव लॅन्डमार्क (स्थळदर्शक) ठिकाण असून या परिसरातील नागरीकांच्या विविध दस्तऐवज जसे आधारकार्ड, मतदान कार्ड, प्रभागनिहाय मतदार यादी, गॅस कार्ड यावर पत्रव्यवहारासाठी प्रमुख स्थळदर्शक म्हणुन " विलास चौक " असा उल्लेख स्पष्ट नोंदविण्यात आलेला आहे. तसेच सदर चौकास जळगांव शहर महानगरपालिकेकडुन अधिकृतरित्या " विलास चौक " असे नामकरण करणेबाबत सतत नागरीकांकडुन मागणी होत असल्याने प्र.क्र.२ कांचन नगर मधील प्ले सेंटर जवळील चौकास " विलास चौक " नामकरण करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर चौकास यापुर्वी कोणाचे नांव दिले गेले नसल्याबाबत खात्री करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** २५) ओपनस्पेसमध्ये ओपन जिम बसविण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी यांना प्रस्ताव देणेकामी मा.महासभेची मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.नितीन मनोहर बरडे यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र. २५ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.७८३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे विदयमाने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील ओपनस्पेसमध्ये ओपन जिमसाठी निधीची उपलब्धता शासनाकडून मिळणार असल्याने सदर कामास महानगरपालिकेस कोणताही खर्च येणार नसल्याने खालील नमूद प्रभाग क्र.१२ मधिल ओपनस्पेस व इतर ठिकाणच्या ओपनस्पेसमध्ये ओपन जिम बसवण्यासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडेस प्रस्ताव पाठविणेकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | ओपन जिम बसविण्यासाठी जागेचे ठिकाण |
|---|---|
| **१.** | शामा प्रसाद मुखर्जी उदयान |
| **२.** | निमखेडी शिवार सर्वे क्रं.९८/१+२ हिरा शिवा कॉलनी, विठ्ठलवाडी |
| **३.** | टीपी स्कीम नं.२, ओपनस्पेस ४४८, विवेकानंद व्यायामशाळा ओपनस्पेस |
| **४.** | मेहरुण सर्वे क्र.४७२/२ इंद्रप्रस्थ नगर मधील जागेत |
| **५.** | सागरपार्क, महापालिकेची जागा, जळगांव |
| **६.** | मेहरुण शिवार ५६१/१ब, धांडे नगर |
| **७.** | मेहरुण सर्वे क्र.४८०/२, पार्वती नगर |
| **८.** | मेहरुण सर्वे क्र.४७२/२ इंद्रप्रस्तनगर |
| **९.** | मेहरुण सर्वे क्र.४१६/१/२, जीवनमोती नगर, मोहाडी रोड |
| **१०.** | मेहरुण सर्वे क्र.५६३/४/A, पवन हिल्स |
| **११.** | मेहरुण सर्वे क्र.४६७/१ हनुमान कॉलनी |
| **१२.** | मेहरुण सर्वे क्र.४७३/अ+ब गुरुदत्त कॉलनी |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** २६) मनपा विदयुत विभागाचे प्रमुख कार्यालय प्रशासकीय इमारतीत स्थलांतरीत करणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.प्रशांत सुरेश नाईक यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र. २६ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** ताई फक्त एक विचारायचे आहे, विषय क्र.२६ मध्ये**,** मला वाटते दोन मजली इमारत आहे ती गणपती नगरची नितीनभाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** मग त्या इमारतीचा उपयोग आपण काय करणार आहोत. या संदर्भात आपण काही विचार केलेला आहे का ? नंतर काय होणार की, आज वापरात असलेली इमारत भंग अवस्तेत चालली जाणार. कार्यालय शिफ्ट करण्याला कुठलाही विरोध नाही. त्याला कोणतीही हरकत नाही. पण आता याच्यामध्ये ही चर्चा होणे आवश्यक आहे की, आज ती सुस्थितीत असलेली. वापरात असलेली इमारतीच आपण भविष्यात काय करणार आहोत? आणि त्याचा पण पुन्हा हा कोणताही प्रस्ताव यायला नको. या संस्थेला देवुन टाका किंवा त्या संस्थेला देवुन टाका. या संदर्भात ही चर्चा होणे आवश्यक आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ती स्टोरीज जी आहे, ती कामाच्या सुस्थितीचे अनुषंगाने त्यांच कार्यालय तेथे शिफ्ट होईल.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** त्याची तशी सुरक्षा व्यवस्था वाढवली का ?

**श्री.सुनिल महाजन :-** आपल्या नगरसेवकांना ताई तिकडे जाव लागत, त्यामुळे ते इकडे शिफ्ट केल.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** या गोष्टी मान्य आहे. त्याला काहीच विरोध नाही.

**मा.महापौर :-** विषय क्र. २६ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७८४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका विदयुत विभागाचे प्रमुख कार्यालय हे सदयस्थितीत शहरातील गणपती नगर येथे स्थित असून सदर परिसर प्रशासकिय इमारत तसेच इतर युनिट कार्यालयांपासुन बऱ्याच अंतरावर आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना सतत वाहनांव्दारे ये-जा करावी लागते व विदयुत विभागासंबंधी अनेक कामकाजात अडचणी निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. परिणामी कार्यालयीन कामकाजास विलंब होवून विपरीत परिणाम होत असल्याने महानगरपालिकेचे आर्थिक हित लक्षात घेता तसेच विदयुत विभागातील कर्मचाऱ्यांवर वरिष्ठांकडुन नियंत्रण ठेवणे व सन्मा.सदस्यांना तक्रारी निवारणासाठी संपर्क सुलभ करणेच्या दृष्टीने सरदार वल्लभभाई पटेल जळगांव शहर महानगरपालिका प्रशासकीय इमारतीच्या १४ व्या मजल्यावरिल रिक्त असलेला कार्यालयात महानगरपालिका,विदयुत विभाग प्रमुख यांची कार्यालयीन कामकाजासाठी कायमस्वरुपी बैठक व्यवस्था करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** २७) काव्यरत्नावली चौक ते डी-मार्ट या मार्गावरील पोलीस अधिक्षक यांच्या निवासस्थानालगतच्या जागेत स्व:खर्चाने बगीचा विकसित करणेस व त्याअनुषंगाने नियोजित बगीच्यास " कांताई स्मृती बगीचा " असे नांव देणेबाबत मिळकत व्यवस्थापक, जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. यांनी दिलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय क्र. २७ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.७८५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, काव्यरत्नावली चौक ते डी-मार्ट या मार्गावरील पोलीस अधिक्षक यांच्या निवासस्थानालगतच्या जागेत स्व:खर्चाने बगीचा विकसित करणेस व त्याअनुषंगाने नियोजित बगीच्यास " कांताई स्मृती बगीचा " असे नांव देणेबाबत मिळकत व्यवस्थापक, जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. यांनी दि.१०/०३/२०२२ चे पत्रान्वये मागणी केलेली आहे.

आज जळगांव शहरातील विविध क्षेत्रात जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. आणि भवरलाल ॲण्ड कांताबाई जैन फाऊंडेशन हया संस्था भरघोस सामाजिक कार्य करीत आहे. जळगांव शहरासाठी कंपनीची सहकार्यशील भूमिका वर्षानुवर्षे अबाधीत कार्यान्वीत असतांनाच केवळ व्यावसायिक असणं किंवा उदयोजक असणं याच्या पलीकडचं जीवनमुल्य श्रध्देय मोठे भाऊंनी आयुष्यभर जपलं त्यांच संस्काराची प्रचिती म्हणून कंपनीने " भाऊंचे उदयान " व " महात्मा गांधी उदयान " हे अत्यंत सुसज्ज, सुशोभित, नुतनीकरण व विकसित केले आहे, ज्यायोगे आबालवृध्दांसाठी सर्व सुखसोईंयुक्त सुविधा उपलब्ध करुन शहरवासियांना अभुतपूर्व भेट स्वरुपात दिले आहे ज्यांमुळे जळगांव शहराच्या सौंदर्यात भर पडली आहे. कंपनीने वेळोवेळी सामाजिक बांधिलकी जोपासत जळगांव शहर व शहरवासियांकरीता अनेक लोकोपयोगी नवनवीन उपक्रम आजपर्यंत राबविलेले आहेत व यापुढेही राबविणार आहे.

याच धर्तीवर काव्यरत्नावली चौक ते डी-मार्ट या मार्गावरील पोलीस अधिक्षक यांच्या निवासस्थानालगतच्या मोकळया जागेत कंपनीमार्फत स्व:खर्चाने बगीचाची निर्मिती व विकास व्हावा अशी आमची मनस्वी इच्छा आहे. जेणेकरुन, शहराच्या विकासात व सौंदर्यात अजून मोलाची भर पडेल यात शंका नाही.

जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. यांच्या आजपर्यंतच्या सामाजिक व लोकोपयोगी कामांचा विचार करता विषयांकित काव्यरत्नावली चौक ते डी-मार्ट या मार्गावरील पोलीस अधिक्षक यांच्या निवासस्थानालगतच्या जागेत जैन इरिगेशन सिस्टीम्स लि. यांना स्व:खर्चाने बगीचा विकसित करणेस व त्याअनुषंगाने नियोजित बगीच्यास " कांताई स्मृती बगीचा " असे नांव देणेस महानगरपालिकेच्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापूर्वी कोणत्याही संस्थेस विकसित करणे कामी दिली गेली नसल्याबाबत खात्री करुन घेवुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** २८) जळगांव शहरातील रस्त्यावर विज वाहिनी उभारणी कामी नवीन पोल टाकणे किंवा जुने पोल/लाईन स्थलांतरीत करणेपुर्वी मनपाची लिखीत परवानगी (NOC) घेणेबाबत म.रा.वि.वि.कं.मर्यादीत यांना बंधनकारक करणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.कैलास नारायण सोनवणे यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर करण्यात येत आहे.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**श्री.कैलास सोनवणे :-** याच्या पुढे एक पत्र दिल, घरी राहुन गेल ते.
**मा.महापौर :-** विषय क्र. २८ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७८६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत, महानगरपालिकेच्या रस्त्यावर, मनपाच्या मिळकती ठिकाणी महावितरण कंपनी मर्या./महापारेषण कंपनी मर्या. यांचया मार्फत तसेच महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपरव्हिजन स्किम अंतर्गत शासन मान्य विदयुत ठेकेदार मार्फत विविध लघुदाबाची / उच्चदाबाची / अति उच्चदाबाची विज वाहिनी उभारणीचे कामे करण्यात येत आहेत. भारतीय विज अधिनियम

१९१० चे कलम १२ ते १६ व १८ विज अधिनियमय २००३ चे कलम ६७,६८ व १८५ महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम २२९ तसेच प्रचलित विदयुत नियमाच्या चौकटीत राहून महावितरण कंपनी मर्या./ महापारेषण कंपनी मर्या. पायाभूत सुविधांची उभारणीची कामे करावयाची आहेत. काम करणे पूर्वी संबंधीत जागा मालकीची संमती तथा NOC प्राप्त करुन घ्यावयाची असतांना महानगरपालीका हद्दीत महानगरपालीका मालकीच्या जागेवर रस्त्यावर महानगरपालीकेची पुर्व परवानगी न घेता महावितरण कंपनी मर्या./ महापारेषण कंपनी मर्या. मार्फत विज वाहिनी उभारणीची विविध कामे करण्यात येत आहे.

परवानगी न घेता पोल उभारणीचे स्थळ निश्चित करुन न घेता इतरत्र कोठेही पोलची उभारणी करण्यात येत असल्याने रस्त्याची ड्रेनेज सिस्टिम तसेच विविध विकास कामे करतांना चुकीच्या पध्दतीने उभारणी केलेल्या विज वाहिनीचा अडथळा निर्माण होतो. अश्या वेळेस महानगरपालिकेस विकास कामे करण्या कामी अडथळा निर्माण करणारे पोल स्थलांतरीत करण्याचे काम हाती घ्यावे लागते. विज वाहिनी महावितरण कंपनी मर्या.च्या मालकीची असल्याने विज वाहिनी स्थलांतरीत करण्या बाबत महावितरण कंपनीला सांगितले असता महावितरण कंपनी मर्या. याकामी खर्च करण्यास नकार देते व महानगरपालिकेस स्वखर्चाने काम करण्या बाबत सुचविते. महानगरपालिकेची चुक नसतांना विज वाहिनी स्थलांतरीत करणे कामी खर्च करणे चुकीचे आहे. याकामी मनपास खर्च करावा लागत असल्याने मनपाचे आर्थिक नुकसान होत आहे. करीता भारतीय विज अधिनियम १९१० चे कलम १२ ते १६ व १८ विज अधिनियम २००३ चे कलम ६७,६८ व १८५ महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम २२९ तसेच प्रचलित विदयुत नियमाच्या चौकटीत राहून तसेच मनपाची लिखीत परवानगी घेतल्यानंतरच पायाभूत सुविधांची उभारणी करण्याची कामे करावी. महावितरण कंपनी मर्या./महापारेषण कंपनी मर्या. यांना मनपा जागेवर तथा रस्त्यावर विना परवानगी विज वाहिनीची उभारणीची कामे केल्यास ती कामे मनपाच्या जागेवर अतिक्रमण केल्याचे ठरविण्यात येवुन महाराष्ट्र प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे २३१ मधील तरतूदीनुसार कोणतीही नोटीस न देता मनपा मार्फत उभारणी केलेली विज वाहिनी निष्कासित करेल तसेच या कामी येणाऱ्या खर्चाची वसुली सुध्दा महावितरण कंपनी मर्या./ महापारेषण कंपनी मर्या. यांचे कडुन करण्यात येईल.

जळगांव महानगरपालिकेने म.रा.वि.वि.कं.मर्यादीत यांना जा.क्र./विदयुत/५८८/२०२१ दिनांक ०२/०७/२०२१ चे पत्रान्वये कार्यवाही करण्या संदर्भात कळविले आहे मात्र असे निदर्शनास आले आहे की, महावितरण कंपनी अदयापावेतो ही विदयुत पोल नवीन टाकणे किंवा जुने पोल स्थलांतरीत करणे संदर्भात मनपाची कोणतीही NOC घेतांना दिसून येत नाही. यास्तव महावितरण कंपनीने नवीन पोल टाकणे किंवा जुने पोल / लाईन स्थलांतरीत करणेपुर्वी महासभेची परवानगी घेणे बंधनकारक राहील

जळगांव शहर महानगरपालिका प्रशासनास उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** २९) सोमाणी मार्केट येथील कालबाह्य पाण्याची टाकी निष्कसित करण्याबाबत मा.उपमहापौर,मनपा,जळगांव यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** मंजुर करायला काही हरकत नाही. ते निष्कासित करणे आवश्यकच आहे. सर्व सदस्यांची ही मागणी आहे. फक्त निष्कासित करत असतांना त्या जागेच आपण पुढे काय वापर करणार आहोत. तर तेथील स्थानिक लोकांकडुन तेथे पोलिस चौकी असावी. अशी एक मागणी पुर्वी पासुन होती. तर आजच्या या प्रस्तावामध्ये आपण तसे लिहु शकतो की, तेथे पोलिस चौकीला जागा देणेस हरकत नाही.

**मा.उपमहापौर :-** ठिक आहे त्या जागेचे आरक्षण बघता किंवा त्या जागेचे आपण आपल्या नगररचना विभागामार्फत योग्य तो प्रस्ताव मागवुन जो काही योग्य त्या ठिकाणी असेल ते आपण करु.

**मा.महापौर :-** विषय क्र.२९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७८७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, पिंप्राळा येथील सोमाणी मनपा मार्केट आवारात पाण्याची एक जुनी टाकी अस्तित्वात आहे. पुर्वीच्या काळी पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी या टाकीचा वापर होत होता. मात्र आता ही टाकी वापरात नसुन कालबाहय झालेली आहे. टाकीची पडझड झालेली असुन, या टाकीच्या बांधकामाच्या आडोशाने लोक या खाजगी थांबुन असतात. तसेच अवैध व्यवसाय चालवले जातात. यामुळे गैर प्रकार गुन्हे घडण्याची भिती आहे. त्याचबरोबर या टाकीवर चढण्याची वा आत उतरण्याचा प्रकार कोणी केल्यास अपघात घडण्याचीही भिती आहे. शिवाय टाकीच्या बांधकामामुळे जागाही नाहक अडवली गेलेली असुन, स्वच्छता, हवा-प्रकाश या दृष्टीनेही टाकी अडचणीची ठरत असल्याने उपरोक्त बाबींचा विचार करता सोमाणी मार्केट येथील कालबाह्य पाण्याची टाकी (बांधकाम) निष्कसित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ३०) पिंप्राळा येथील मुख्य चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा आश्वारुढ पुतळा उभारण्याबाबत मा.उपमहापौर,मनपा,जळगांव यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर विषय मंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** या विषयासंबंधी मागे या संदर्भात एक प्रस्ताव नवनाथ दारकुंडेंनी आपल्याला एक अर्ज दिलेला आहे तो सुध्दा या प्रस्तावामध्ये ॲड करण्यात यावा. अपुर्ण उंची आहे, त्याची उंची वाढवायची आणि मागे सरकवायचे त्याला.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** पोकळे साहेबांचे प्रस्ताव याच्यात ॲड करुन मंजुर करा विषय.

**मा.महापौर :-** पोकळे साहेबांनी ज्या सुचना दिलेल्या आहे त्या प्रशासनाने या ठरावामध्ये इन्क्ल्युड करुन घ्यावे परंतु त्याठिकाणी प्रशासनाने जागेच्या संदर्भात काय असेल काय नाही कायदेशीर बाबी तपासुन घ्याव्यात. त्याच्या मागे शाळा वगैरे आहे. जागेच्या संदर्भात अडचणी निर्माण होणार नाही. या संदर्भात पाहुन या संदर्भातला ठराव यात इन्क्ल्युड करुन घ्यावा. विषय क्र. ३० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७८८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारुढ पुतळा पिंप्राळा येथील मेन चौकात बसविण्याची मागणी स्थानिक नागरिकांतुन होत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठयांचा दैदीप्यमान इतिहास आमच्यासाठी प्रेरणास्त्रोत आहे. जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या दैदिप्यमान इतिहासाचे स्मरण होऊन नविन पिढीला प्रेरणा मिळावी या दृष्टीने छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारला जाण्याची आवश्यकता आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी गनिमी पध्दतीने दिलेले लढे हे जगप्रसिध्द आहेत. धुरंदर सेनानी असलेल्या छत्रपती शिवाजी राजांनी मावळयांच्या मदतीने स्वराज्य स्थापन केले. केवळ लढवय्या आणि विजयी सम्राटच नाही तर रयतेचा कैवारी असलेला जनकल्याणकारी राजा म्हणुनही छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेतले जाते.

छत्रपती शिवाजी महाराज हे अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत होय. तसेच त्यांचा इतिहास कायमस्वरुपी जिवंत तसेच येणाऱ्या पिढीला कायम स्मरणात राहावा म्हणुन त्यांचा अश्वारुढ पुर्णाकृती स्वरुपातील पुतळा पिंप्राळा मुख्य चौकात बसविण्याची स्थानिक नागरिकांतुन मागणी होत असल्याने पिंप्राळा येथील मुख्य चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा आश्वारुढ पुतळा उभारणेकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे व सन्मा.सदस्य,श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे यांनी मा.महापौर यांना दिलेल्या लेखी प्रस्तावानूसार तसेच मा.पिठासिन अधिकारी यांचे सूचनेप्रमाणे रेल्वे उड्डाण पुलाच्या

विस्तारिकरणामुळे शिवाजी नगर येथील कित्येक वर्षे जुना छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हलविण्यात येणार आहे. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांचा हा अर्धाकृती स्वरुपातील पुतळा हा अश्वारुढ पुर्णाकृती स्वरुपात स्थलांतरित करण्याची मागणी छत्रपती शिवाजी नगरवाशियांतर्फे करण्यात येत असल्याने अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले छत्रपती शिवाजी महाराज यांचा जुना अर्धाकृती स्वरुपातील पुतळा हा अश्वारुढ पुर्णाकृती स्वरुपात नविन जागी बसविण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने उपरोक्त बाबत नियमाप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ३१) जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या मेहरुण शिवार सर्व्हे नं. ४३१/अ (फायनल प्लॉट नं.२८७) आणि सर्व्हे नं.४३१/ब (फायनल प्लॉट नं.२८८) सागर पार्क मैदानावर स्व:खर्चाने ओपन जिम विकसित करणे कामी परवानगी मिळणेबाबत एल.के.फाऊंडेशन, जळगांव यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र. ३१ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.७८९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरात एल.के फाऊंडेशनतर्फे विविध सामाजिक, शैक्षणिक व समाजपयोगी अनेक उपक्रमे राबवित आहे. शहरात मनपा मालकीचे सागर पार्क मैदानावर सकाळच्या वेळी परिसरातील नागरीकांसह संपूर्ण शहरातुन जॉगींग, व्यायाम, योगासाठी मोठया संख्येने येत असतात तसेच सांयकाळच्या वेळी देखिल नागरीकांची वर्दळ असते. अश्या ठिकाणी ओपन जिम विकसित केल्यास नागरीकांसाठी उत्तम सेवासुविधा होईल. सदर ठिकाणी एल.के.फाऊंडेशन मार्फत स्व:खर्चाने ओपन जिम विकसित करण्याचा मानस असल्याचे एल.के.फाऊंडेशन,जळगांव यांनी दि.१५/०३/२०२२ रोजी चे पत्रात नमूद केले असून सागर पार्क मैदानावर स्व:खर्चाने ओपन जिम विकसित करणे कामी परवानगी मिळणेबाबत विनंती केलेली असल्याने महानगरपालिकेच्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या मेहरुण शिवार सर्व्हे नं. ४३१/अ (फायनल प्लॉट नं.२८७) आणि सर्व्हे नं.४३१/ब (फायनल प्लॉट नं.२८८) सागर पार्क मैदानावर एल.के.फाऊंडेशन, जळगांव यांना स्व:खर्चाने ओपन जिम विकसित करणे कामी परवानगीस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागेत ओपन जिम विकसित करणे कामी यापूर्वी कोणत्याही संस्थेस जागा दिली गेली नसल्याबाबत खात्री करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ३२) व्यायाम शाळेकरिता शासकीय अनुदान मिळणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.नितीन मनोहर बरडे, सरकार्यवाह, क्रीडा रसिक स्पोर्टस क्लब,जळगांव यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ३२,३३ एक सारखेच विषय आहे. मंजुर करण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** दोघी विषयांना माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र. ३२ आणि विषय क्र.३३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७९० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, व्यायाम शाळेकरिता शासकीय अनुदान मिळणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेकामी क्रीडा रसिक स्पोर्टस क्लब,जळगांव यांनी दि.१०/०२/२०२२ चे पत्रान्वये विनंती केलेली असून सदर पत्रात नमूद केलेनूसार जळगांव शहरातील ओपनस्पेस सर्वे क्रं.२३६/३ड या जागेत क्रीडा रसिक स्पोर्टस् क्लबची ॲड बबनभाऊ बाहेती जिम्नेशियम (व्यायामशाळा) हि जागा ठराव क्र.२६४ दि.१५/०७/१९८९ अन्वये ताब्यात दिलेली आहे. त्या जागेवर संस्थेने व्यायाम शाळा स्व:खर्चाने बांधलेली आहे.

व्यायाम शाळा ३३ वर्षे जुनी असुन सदरची जागा मनपाने करारनामा व ताबापावती करुन ताब्यात दिलेली आहे, परंतु ७/१२ वर मनपाचे नाव असल्याने जिल्हा क्रीडा कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करतांना ७/१२ ची तांत्रीक बाब असल्याने अनुदान मिळत नाही, व्यायामशाळेस महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाशी संलग्न असुन आम्ही अनुदानास पात्र आहे. महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेची मान्यता आहे. त्यास जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,जळगांव यांचे मार्फत जिमचे साहित्य देण्याची तरतुद आहे. तसेच नुतनीकरणसाठी, क्रीडांगणासाठी अनुदान मिळते. सदर व्यायाम शाळेची जागा ही महापालिकेची असल्याने आपले ना हरकत प्रमाणपत्र, ठराव आवश्यक असल्याचे त्यांनी आपले पत्रात नमूद केलेले आहे.

तसेच याचसंदर्भात दि.०३/०८/२०१९ रोजीच्या सर्वसाधारण सभेत विषय क्र.१६ ठराव क्र.१८५ अन्वये ठराव पारित करण्यात आलेला परंतु जिल्हा क्रीडा अधिकारी,जळगांव यांना चालु वर्षातील ठराव आवश्यक असल्याने क्रीडा रसिक स्पोर्टस क्लब,जळगांव यांना व्यायाम शाळेकरिता शासकीय अनुदान मिळणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ३३) विवेकानंद व्यायाम शाळेस शासकीय अनुदान मिळणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत सचिव, विवेकानंद व्यायाम शाळा,जळगांव यांनी दिलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.७९१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, विवेकानंद व्यायाम शाळेस शासकीय अनुदान मिळणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेकामी विवेकानंद व्यायाम शाळा,जळगांव यांनी दि.०१/०२/२०२२ चे पत्रान्वये विनंती केलेली असून त्यांचे पत्रात नमूद केलेनूसार जळगांव शहर टी.पी.स्किम-२ मधील ओपनस्पेस क्र.४१८ (क्रीडांगणासाठी आरक्षित) जागेत विवेकानंद व्यायाम शाळा स्वातंत्र्य चौक,जळगांव ही करारनामा करुन संस्थेस दिलेली आहे.

व्यायाम शाळा ३० वर्षे जुनी असुन त्यास जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,जळगांव यांचे मार्फत जिमचे साहीत्य देण्याची तरतूद आहे तसेच नुतनीकरणासाठी, क्रीडांगणासाठी अनुदान मिळते. सदर व्यायाम शाळेची जागा ही जळगांव शहर महानगरपालिकेची असल्याने आपले ना-हरकत प्रमाणपत्र, ठराव आवश्यक असल्याचे त्यांनी आपले पत्रात नमूद केलेले आहे तसेच याचसंदर्भात दि.०३/०८/२०१९ रोजीच्या सर्वसाधारण सभेत विषय क्र.१६ ठराव क्र.१८५ अन्वये ठराव पारित करण्यात आलेला परंतु जिल्हा क्रीडा अधिकारी,जळगांव यांना चालु वर्षातील ठराव आवश्यक असल्याने विवेकानंद व्यायाम शाळा,जळगांव यांना व्यायाम शाळेकरिता शासकीय अनुदान मिळणेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ३४) जळगांव जिल्हयातील सहकार क्षेत्रातील सेवाभावी व्यक्तिमत्व,जळगांव जनता सहकारी बँकेचे संस्थापक अध्यक्ष, सेवाभावी वृत्तीने वैदयकीय क्षेत्रात केलेले कार्य, सहकार चळवळ तसेच सामाजिक क्षेत्रात केलेली उल्लेखनीय कामगिरी, शैक्षणिक क्षेत्रातील मौलिक योगदान अशा बहुआयामी व्यक्तिमत्वाचे स्व.डॉ.अविनाश दादा आचार्य यांच्या उत्तूंग कार्याची दखल घेऊन त्यांना भारत सरकारने आगामी काळात मरणोत्तर पद्मपुरस्कार देऊन यथोचित गौरव करणेबाबतचा प्रस्ताव पारित करुन भारत सरकारकडेस पाठविणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.नितीन बालमुकूंद लढ्ढा यांनी दिलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक मिनीट या ठरावमध्ये फक्त माजी नगरसेवक भारतीय जनता पार्टीचे माजी सरचिटणिस श्री.उदयजी भालेराव हे माजी नगरसेवक आहे. त्यांनी या विषयाला सुरुवातीला चालना दिली होती. त्यांनी तसे पत्र पण दिलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विशालजी

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक मिनीट नितीन भाऊ,

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला उदय भालेराव यांचा फोन आला आणि त्यांच्या सांगण्यावरुन मी प्रस्ताव दिलेला आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हो हो, त्यांच्या नावाचा उल्लेख करण्यात यावा ठरावामध्ये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला उदय भालेराव यांचाच फोन आला की, पुढच्या महासभेमध्ये प्रस्ताव द्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही पण हे काम काही सिरियसली करणार नाही मला माहित आहे. त्याच्यापुर्वी हे आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** त्यांनी नितीन गडकरी साहेबांना सुध्दा निवेदन दिलेले आहे. की त्या ठरावामध्ये त्यांच्या नावाचा उल्लेख करण्यात यावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ते माझे प्रभागातील रहिवासी आहे.

**मा.महापौर :-** ठरावात याची नोंद घेण्यात यावी. विषय क्र. ३४ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.७९२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आपल्या जळगांव जिल्हयातील सहकार क्षेत्रातील सेवाभावी व्यक्तिमत्व स्वर्गीय डॉ.अविनाश रामचंद्र तथा दादासाहेब आचार्य यांच्या कार्याशी आपण जवळून परिचीत आहोत.

समाजावर आई सारखे निस्वार्थ प्रेम करु या ही राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे व्दितीय सरसंघचालक श्री.गोळवलकर गुरुजी यांची शिकवण आयुष्यभर अंगी बाणवणारे, ४५ वर्षांपूर्वी जळगांव सारख्या त्या वेळच्या तुलनेने छोटया गावात चारित्र्यवान सामाजिक कार्यकर्त्यांच्या बळावर सहकारी बँकेची स्थापना करुन त्या माध्यमातून सहकाराचा वटवृक्ष निर्माण करणारे दादा.

उत्तर महाराष्ट्रातील एक प्रथितयश स्त्री रोग तज्ञ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जळगांव जिल्हा संघचालक, जळगांव जनता सहकारी बँकेचे संस्थापक अध्यक्ष, ॲपेक्स को ऑपरेटिव्ह बँक ऑफ महाराष्ट्र ॲण्ड गोवाचे संस्थापक संचालक ते सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष अशा विविध पदांवर निरलसपणे कार्यरत असतानाही डॉ.आचार्य यांची ओळख अजातशत्रू व्यक्तिमत्वाचे अशीच राहिली आहे.

कट्टर हिंदुत्ववादी विचारसरणी असुनही राजकीय क्षेत्रापासून कटाक्षाने दूर राहून केशवस्मृती सेवा समुहाच्या माध्यमातून त्यांनी उभारलेले विविध समाजोपयोगी उपक्रम विशेषत: विवेकानंद शैक्षणिक प्रकल्प हे त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील मौलिक कार्याचे ज्वलंत उदाहरण आहे.

सेवाभावी वृत्तीने वैदयकीय क्षेत्रात केलेले कार्य, सहकार चळवळ तसेच सामाजिक क्षेत्रात केलेली उल्लेखनीय कामगिरी, शैक्षणिक क्षेत्रातील मौलिक योगदान अशा बहुआयामी व्यतिमत्वाचे स्व.डॉ.अविनाश दादा आचार्य यांच्या उत्तूंग कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना आगामी काळात मरणोत्तर पद्मपुरस्कार देऊन यथोचित गौरव करणे संदर्भात प्रस्ताव केंद्र शासनाकडेस पाठविणेकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :-** स्थायी समितीच्या मान्यतेसाठी प्राप्त झालेले काही प्रस्ताव आहे. ते मा.महासभेच्या निर्णयास्तव ठेवण्यात येत आहे.

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ३५) भविष्य निर्वाह निधी संघटन कार्यालयाने बजावलेल्या रिकव्हरी नोटीसी संदर्भात मा.उच्च न्यायालय,खंडपीठ, औरंगाबाद येथे दावा दाखल करणे कामी विधीतज्ञ ॲड विनायक उपाध्ये,औरंगाबाद यांची नियुक्ती करणेस व मेहनतांना पोटी फी रक्कम रु.१,७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात येत आहे.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय क्र. ३५ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.७९३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, भविष्य निर्वाह निधी संघटन यांनी दिनांक ८ जानेवारी,२०११ ते ३१ एप्रिल,२०१८ दरम्यान रोजंदारी कर्मचारी यांची ई.पी.एफच्या भरण्याची रक्कम उशिरा भरल्याने जळगांव महानगरपालिकेवर नुकसान व व्याजापोटी रक्कम रु.१,२७,३०,२९९/- मात्र दिनांक ४ सप्टेंबर,२०२१ च्या आदेशाव्दारे निश्चीत करुन इंडियन बँकेकडून परस्पर वसूली केलेली आहे. तदनंतर सदर कार्यालयाकडून पत्र क्रमांक: ३०५४, दिनांक २२ डिसेंबर,२०२१ अन्वये एप्रिल,२०१६ ते ऑगस्ट,२०१६ पर्यंत म.न.पा.रोजंदारी कर्मचारी बाबत रु.१५,०६,३१५/- व मक्तेदार यांचेकडील कर्मचारी बाबत रु.३६,२६,८१२/- अशी एकुण रक्कम रु.५१,३३,१२७/- रिकव्हरी तसेच पत्र क्रमांक ३२५२, दि.४ जानेवारी,२०२२ नुसार जानेवारी,२०११ ते मार्च,२०१६ दरम्यान म.न.पा.रोजंदारी कर्मचारी संदर्भात रु.६४,२५,३०७/- व मक्तेदार यांचे कडील कर्मचारी बाबत मक्तेदार यांना अदा केलेल्या देयकांच्या रक्कमेवरुन भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने रु.५,६०,६७,८८२/- मात्र रिकव्हरी अशी एकुण रक्कम रु.६,२४,९३,१८९/- मात्र उपरोक्त दोन्ही आदेशांची एकत्रित रक्कम रु.६,७६,२६,३१६/- होत असल्याबाबत भविष्य निधी कार्यालयाने जळगांव महानगरपालिकेला वसुलीबाबतचा आदेश पारित केलेला आहे. याबाबत मा.सी.जी.आय.टी.,न्यायालय, नागपुर येथे ॲड देशपांडे यांचेमार्फत दावा दाखल करुन न्यायालयाने सदर रिकव्हरी आदेशावर अंतरिम आदेश पारित केलेले आहे. याबाबत आयुक्त यांची मुख्यलेखाधिकारी, ॲड देशपांडे व ॲड उपाध्ये सोबत झालेल्या चर्चेनुसार सदर बाब ही महानगरपालिकेच्या विरोधात असल्याने मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दावा दाखल करणे गरजेचे आहे. त्याकामी ॲड विनायक उपाध्ये यांची नियुक्ती करणेस व त्यांना मेहनतांना पोटी येणारा खर्च रक्कम रु.१,७०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ३६) दैनिक बाजार वसुली**,**आठवडे बाजार शुल्क वसुली कामी मक्तेदार यांची नियुक्ती करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे**.**
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय क्र. ३६ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.७९४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील दैनंदिन बाजार शुल्क, आठवडे बाजार शुल्क वसुली करणे कामी अभिकर्त्यांची सन २०२१-२२ करीता नियुक्ती करणे कामी देकार रक्कम रु.१,८६,३४,०००/- वर राज्यस्तरीय ई-निविदा तिन वेळा प्रसिध्द केली असता तीन्ही वेळेस ई-निविदेस कोणीही प्रतिसाद दिलेला नाही. निविदा प्रक्रिया चालु असतांना वसुली मक्तेदार श्री.किरण भालोदकर यांना निविदा प्रक्रिया पुर्ण होई पावेतो वसुली करण्यासाठी मुदत दिली असता मक्तेदार श्री.किरण भालोदकर यांनी शहरात हॉकर्स यांची संख्या पाहता मक्त्याची रक्कम भरु शकत नाही त्याकामी मी काम करु शकत नाही असे लेखी दिले असता दिनांक १३/०९/२०२१ पासुन मनपा कर्मचारी यांचे कडून वसुली सुरु आहे.

मात्र नव्याने निविदा प्रसिध्द करणे व वसुली शुल्क देकार रक्कम ठरविणे कामी मा.महासभेकडे देकार रक्कम निश्चितीसाठी प्रस्ताव सादर केले असता मा.महासभा ठराव क्र.६८८ दिनांक १५/१२/२०२१ अन्वये मा.महासभेने वसुली देकार रक्कम रु.१,६४,००,०००/- निश्चितीस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार आयुक्त यांचे दि.२९/१२/२०२१ रोजी मान्यतेनुसार दिनांक १८/०१/२०२२ रोजी राज्यस्तरीय ई-निविदा क्र.११८ प्रसिध्द केली असता त्यात कोणीही भाग घेतला नाही. दिनांक ३१/०१/२०२२ अन्वये राज्यस्तरीय दुसरी ई-निविदा क्र.१२१ प्रसिध्द केली असता त्यातही कोणीही भाग घेतला नाही. त्यानंतर पुन्हा तिसरी राज्यस्तरीय ई-निविदा क्र.१२५

दिनांक ०३/०२/२०२२ अन्वये प्रसिध्द केली असता त्याची मुदत दिनांक ०९/०२/२०२२ पावेतो असल्याने त्यात एक मक्तेदार यांनी भाग घेतला आहे. दिनांक १०/०२/२०२२ रोजी लिफाफा क्र.१ उघडण्यात आले त्यानुसार मक्तेदार श्री.किरण शंकर भालोदकर यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी निविदा समिती यांनी केली असता मक्तेदार यांनी संपुर्ण कागदपत्राची पुर्तता केलेली आहे. ते पात्र झाल्याने निविदा समितीच्या दिनांक १०/०२/२०२२ च्या मान्यतेने मक्तेदार श्री.किरण शंकर भालोदकर यांचा दिलेला लिफाफा क्र.२ दि.११/०२/२०२२ रोजी उघडण्यात आला असता मक्तेदार श्री.किरण शंकर भालोदकर यांनी रक्कम रु.१,६४,००,७८६/- असा दर दिला असून त्यांनी मनपाच्या देकार रक्कम रु.१,६४,००,०००/- च्या जास्तीचे .७८६/-रुपये असल्याने त्यांची एक वर्षासाठी रक्कम रु.१,६४,००,७८६/- मात्र ची स्विकारण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच प्रशासनाने मक्तेदाराशी संविदा करुन कार्यादेश देणेस सुध्दा मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ३७) नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१५ मेहरुण गावठाण अंतर्गत बुरुजापासून ते महादेव मंदिरापर्यंत व्हाया मेहरुण स्मशानभूमी पर्यंत तसेच जय दुर्गा पतपेढी पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.**४१,**८६,८५५**/-** मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे**.**

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र. ३७ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७९५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.१५ मेहरुण गावठाण अंतर्गत बुरुजापासून ते महादेव मंदिरापर्यंत व्हाया मेहरुण स्मशानभूमी पर्यंत तसेच जय दुर्गा पतपेढी पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्र.नप/नियोजन/आर.आर/६९७/२०२१ दि.१२/०५/२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त मनपा यांचे दि.२३/०५/२०२१ च्या मान्यते अन्वये ई-निविदा सुचना क्र.७९/१० सन २०२१-२२ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्र.सा.बा./२४१ दि.१०/०६/२०२१ चे पत्रान्वये दै.सामना या वर्तमान पत्रात दि.११/०६/२०२१ रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे.

त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ०२ मक्तेदारांचे ई-निविदा कागदपत्रांची छाननी केली असता मक्तेदार निखल कृष्णराज पाटील यांचे कडेस आतापर्यंत असलेल्या कामांचा विचार करता त्यांची बिड कॅपेसीटीत बसत नाही तसेच सिमीलर टाईप ऑफ वर्क पुर्ण झाल्याचा दाखला जोडलेला नसल्याने त्यांना निविदा समितीच्या मान्यतेनुसार अपात्र ठरविण्यात आले असल्याने फेर ई निविदेस आयुक्त यांनी दि.१८/०१/२०२२ रोजी मान्यता दिल्यानुसार उक्त कामाची फेर ई निविदा सुचना क्र.१२२ सन २०२१-२२ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्र.सा.बा./१२७१ दि.२०/०१/२०२२ चे पत्रान्वये दै.दिव्यमराठी या वर्तमान पत्रात दि.२१/०१/२०२२ रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत ००(एकही) ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या नसल्याने चार दिवसाची मुदतवाढ देण्यास शहर अभियंता यांनी मान्यता दिल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दि.२०/०१/२०२२ ते दि.३१/०१/२०२२ पर्यंत मुदत देण्यात आली होती. दिलेल्या मुदतीत ०२ ई निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-

निविदा कागदपत्रांची छाननी केली असता मक्तेदार यांनी सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| **अ.क्र.** | **निविदाधारकाचे नांव** | **निविदा रक्कम रु.३४७३९८१/-** | **अपेक्षीत खर्च** |
|---|---|---|---|
| १ | पंकज गजानन वाघ | निविदा रक्कमेवर १०% जास्तीचे दराने | ३८२१३७९/- |
| २ | श्री बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | निविदा रक्कमेवर ९.५०% जास्तीचे दराने | ३८०४००९/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर ९.५०% जास्तीचे दर सर्वात कमीचे आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी पत्र देवून बोलविणेत आले असता मक्तेदार यांनी पत्राव्दारे निविदा रक्कमेवर ७% जास्तीच्या दरात काम करण्यास लेखी संमती दर्शविली आहे. त्याअनुषंगाने गणिती केली असता सदर कामाला ७% जादा दर विचारात घेता एकुण रक्कम रु.३७१७१६०/- मात्र इतका खर्च येणार आहे. निविदा दरापेक्षा रक्कम रु.२४३१७९/- मात्रने जास्त आहे. सदर अंदाजपत्रकाचे दर हे सन २०२०-२१ चे असुन त्यासाठी लागणारे डांबराचे दर हे रक्कम रु.२५८३०/- मे.ट विचारात घेण्यात आलेले आहे. सदर कामी मक्तेदार फक्त डांबराचे दराचा फरक हा निविदा भरण्याचा दि.३१/०१/२०२२ रोजी डांबराचा दर हा रक्कम रु.४१५३०/- मे.ट त्यानुसार डांबराचा दराचा फरक हा विचारात घेता रक्कम रु.६७३०५९/- मात्र वाढ होते

सन २०२१-२२ च्या SSR च्या दराशी तुलना केल्यास सन २०२०-२१ चे निविदा रक्कम ३४.७३ लक्ष मात्र येते व सन २०२१-२२ ची रक्कम ४२.२२ लक्ष येते म्हणजेच फरक रक्कम रु.७.४८ लक्ष जास्त येतो. मक्तेदाराने वाटाघाटी अंती ७% जास्तीचे दरात काम करण्यास संमती दिल्यास डांबराचा जास्त खर्च रक्कम रु.२४३१७३/- मात्र इतका येतो वरील बाबी विचारात घेवून सन २०२०-२१ SSR नुसार ७% जास्त दर स्विकारणे योग्य आहे.

वरील बाब विचारात घेता मक्तेदार श्री बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दर मुळ निविदा किमतीवर म्हणजेच रक्कम रु.३७१७१६०/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | वाटाघाटी अंति ७% जास्तीचे दरा नुसार अपेक्षीत खर्च रक्कम | ३७१७१६०/- |
| ०२ | जि.एस.टी.१२% | ४४६०५९/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | १८५८६/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | ५०५०/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.:- | ४१८६८५५/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.४१८६८५५/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.३९३१३०५/- मात्र नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतुन तसेच मक्तेदार यांनी निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दरानुसार होणारी रक्कम रु.२५५५५०/- मात्र सन २०२१-२२ चे मनपा अर्थ संकल्पातील नविन रस्ते या लेखा शिर्षाअंतर्गत खर्च करणेस तसेच मक्तेदार श्री बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ३८) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.०५ अंतर्गत डांबरी रस्ते तयार करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.२,८७,५६,५०९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लद्धा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा. परंतु त्याच्यामध्ये काही टाईपींग मिस्टेकमुळे काही आकडे चुकलेले आहे, सदर रकमांपैकी रक्कम रु.२,३२,५०,०००/- पैकी ती रक्कम रु.१,६२,६५,३८५/- आहे. आणि खालची एक रक्कम आहे. १,२४,८१,५०९/- ती १,२४,९१,१२४/- तशी शहर अभियंता आपल्याला दुरुस्ती सुचवतील. त्यापध्दतीने दुरुस्ती करुन घ्यावी.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र. ३८ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७९६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.०५ अंतर्गत डांबरी रस्ते तयार करणे कामास मा.जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्र.नपा/नियोजन/आर.आर./७४१/२०२१ दि.१७/०६/२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त मनपा यांचे दि.१९/०७/२०२१ च्या मान्यते अन्वये ई निविदा प्रसिध्द करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे परंतु सदर ई निविदा फॉर्म मधील अटी शर्ती दुरुस्त करणे नव्याने अटी शर्तींचा समावेश या कारणामुळे ई निविदा फॉर्म नविन तयार करण्यास विलंब झाल्यामुळे सदर कामांची ई निविदा प्रसिध्द करण्यास विलंब झालेला आहे. त्यानंतर मा.महापौर यांनी त्यांच्याकडील पत्र जशमनपा/म.का./२०७ दि.२३/०९/२०२१ अन्वये प्रभाग क्रं.१२,१५ व १८ यांचे वर नमुद प्रशासकीय मान्यता आदेशामधील मंजुर कामांचे एकत्रिकरण करणे तसेच प्रभाग क्रं.०५ मधिल मंजुर कामांचे एकत्रिकरण करणेबाबत सुचित केलेले आहे त्यानुसार आयुक्त यांनी सदरचे कामांची ई निविदा एकत्रिकरण करुन प्रसिध्द करण्यास मान्यता दिल्यानुसार दि.२९/१०/२०२१ रोजी उक्त कामाची ई-निविदा सुचना क्र.९६ सन २०२१-२२ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्र.सा.बा./७६६ दि.२९/१०/२०२१ चे पत्रान्वये दै.लोकमत (जळगांव,नागपुर,पुणे,मुंबई,नाशिक) या वर्तमान पत्रात दि.३०/१०/२०२१ रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदा कागदपत्रांची छाननी केली असता मक्तेदार यांनी सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदा रक्कम रु.२०४४५३५०/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | शिवाजी गणपत भंगाळे | निविदा रक्कमेवर ३४.७०% जास्तीचे दराने | २७५३९८८६/- |
| २ | एल.एच. पाटील कंन्स्ट्रक्शन | निविदा रक्कमेवर ३७.७७% जास्तीचे दराने | २८१६७५५९/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार शिवाजी गणपत भंगाळे यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर ३४.७०% जास्तीचे दर सर्वात कमीचे आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी सदरचे काम निविदा रक्कमेवर २४% जास्तीचे दरात काम करण्यास मनपा आ.क्र.जशमनपा/साबा/३३७४ दि.११/०२/२०२२ च्या पत्रानुसार लेखी समंती दिली आहे. त्याअनुषंगाने सदर कामाला २४% जादा दर विचारात घेता सदर कामी एकुण रक्कम रु.२५३५२२३४/- मात्र इतका खर्च येणार आहे. निविदा दरापेक्षा रक्कम रु.४९०६८८४/- मात्रने जास्त आहे.

| अ.क्र. | तपशिल | निविदा रक्कम | २४% जास्तीच्या दरा नुसार होणारी रक्कम | जादा होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | अंदाजित रक्कमेवर २४% प्रमाणे जादा होणारी रक्कम | २०४४५३५०/- | २५३५२२३४/- | ४९०६८८४/- |

| सन | डांबराचा दर (VG-३०) | परिमाण | रक्कम |
|---|---|---|---|
| निविदा दर सन २०२०-२१ | मार्केट दरा नुसार २९५२० | २६०.७६ | ७६९७६३५/- |
| दि.२५/१२/२०२१ | मार्केट दरा नुसार ४९१२० | २६०.७६ | १२८०८५३१/- |
| डांबराचे मार्केट दरा नुसार निविदा फरक रक्कम - | | | ६४८९१०४/- |

१. मक्तेदाराने वाटाघाटी अंति दिलेले दर हे २४% जादा विचारात घेता रक्कम रु.२५३५२२३४/- इतका खर्च येत असुन मुळ निविदा रक्कमेपेक्षा ४९०६८८४/- जादा खर्च लागणार आहे. मात्र
२. वाढलेलया डांबराचे दर विचारात घेता डांबर फरकाची रक्कम रु.६४८९१०४/- मात्रचे आहे. एकुण रक्कम रु.२६९२८०५५/-
३. सन २०२१-२२ चे दराने येणारी रक्कम रु.२७२९८१४३/- वरील तिनही बाबी विचारात घेता मक्तेदार शिवाजी गणपत भंगाळे यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर २४% जास्तीचे दर मुळ निविदा किमतीवर म्हणजेच रक्कम रु.२५३५२२३४/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. ते स्विकारणे योग्य आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | वाटाघाटी अंति २४% जास्तीचे दरा नुसार अपेक्षीत खर्च रक्कम | २५३५२२३४/- |
| ०२ | जि.एस.टी.१२% | ३०४२२६८/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | १२६७६१/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | ७६४९३/- |
| ०५ | रॉयल्टी | १५८७५३/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.:- | २८७५६५०९/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.२,८७,५६,५०९/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. (सभागृहात झालेल्या चर्चेनूसार) सदर रक्कमेपैकी रक्कम रु.१,६२,६५,३८५/- मात्र महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन योजने अंतर्गतच्या निधीतुन व याच योजनेतील मनपा हिस्सा रक्कम २४% प्रमाणे जादा होणारी रक्कम एकुण रक्कम रु.१,२४,९१,१२४/- मात्र मनपा निधीतुन सन २०२१-२२ चे मनपा अर्थ संकल्पातील नविन रस्ते या लेखा शिर्षाअंतर्गत खर्च करणेस तसेच मक्तेदार शिवाजी गणपत भंगाळे यांचे निविदा रक्कमेवर २४% जास्तीचे दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ३९) अतिक्रमण विभागास आवश्यकतेनुसार मजुर पुरवठा करणे कामी सेवा शुल्क मागविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन बरडे :-** महापौर साहेब, आपल्याकडे मनुष्यबळ लागणार होते म्हणुन आपण हा विषय घेतलेला होता. आता आपल्याकडे मनुष्यबळ आहे आणि स्टीनमध्ये शहर चालु आहे. त्यामुळे आपल्या महापालिकेवर आर्थिक भुर्दंड पडणार नाही. याची आपण काळजी घ्यायची आहे. त्याकरीता हा विषय रद्द करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र. ३९ हा सर्वानुमते रद्द करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७९७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सध्या कोविडचा संसर्ग कमी झालेला असल्यामुळे मजूरांची आवश्यकता नसल्याने सदरचा प्रस्ताव रद्द करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ४०) पाणी पुरवठा विभागा अंतर्गत वाघुर योजनेच्या १५०० मीमी ते ४५७ मीमी एम.एस. व पी.एस.सी. पाईपलाईन तसेच एअर व्हॉल दुरुस्ती कामी आकस्मित खर्च भागविणेसाठी रक्कम रु.०३ लक्ष मात्रची तरतूद करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय क्र. ४० हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ७९८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, पाणी पुरवठा विभागा अंतर्गत वाघुर योजनेच्या १५०० मीमी ते ४५७ मीमी एम.एस. व पी.एस.सी. पाईपलाईन तसेच एअर व्हॉल दुरुस्ती कामी मक्तेदार श्री.संजय दिनेश भोळे,जळगांव यांचे प्रशासकीय आदेश क्र./११० दि.३१/१२/२०२० अन्वये मक्तेदार यांचे अंदाजित रक्कमेवर १% जास्तीचे दर स्विकारुन रक्कम रु.२४,८३,०६७/- मात्र खर्चाची संविदा झालेली आहे. त्यानुसार कार्यादेश क्रं.२५९ दि.०१/०१/२०२१ अन्वये देण्यांत आलेला आहे. तसेच निविदा प्रक्रियेस निविदा मंजुरीस लागणारा कालावधी विचारात घेता सध्याचे मक्तेदार श्री.संजय दिनेश भोळे,जळगांव यांना आयुक्त यांचे मान्यतेने दिनांक ३१/०३/२०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यांत आली आहे. सदर कालावधीत आकस्मित कामे उद्भवल्यास पाणी पुरवठा वितरणमध्ये व्यत्यय निर्माण होवू नये यासाठी कार्यादेशातील मंजुर दरानूसारच काम करुन घेणेसाठी रु.३ लक्ष मात्रची वाढीव तरतूद करणे आवश्यक आहे. कार्यादेशानुसार रक्कम रु.२४,८३,०६७/- व वाढीव तरतुद रु.३ लक्ष असे एकूण रक्कम रु.२५ लक्ष रकमेच्या वर होत असल्याने वाघुर पाणी पुरवठा व्यवस्था व दुरुस्ती या लेखाशिर्षकाखाली उपलब्ध असलेल्या शिल्लक रक्कम रु.१० लक्ष या रक्कमेतून पाणी पुरवठा विभागा अंतर्गत वाघुर योजनेच्या १५०० मीमी ते ४५७ मीमी एम.एस. व पी.एस.सी. पाईपलाईन तसेच एअर व्हॉल दुरुस्ती कामी आकस्मित खर्च भागविणेसाठी रक्कम रु.०३/- लक्ष मात्रची तरतूद करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ४१) जळगांव शहरातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र.५३ (जुना राष्ट्रिय महामार्ग क्र.६) वरील कालिंका माता चौका पासुन ते खोटे नगर चौका पर्यंतच्या नविन विकसित होणाऱ्या चौपदरी करण्याच्या रस्त्यावर नविन पोल उभारुन व काही प्रमुख चौकांमध्ये हायमास्ट पोल उभारणेकामी एकूण रक्कम रुपये २,७८,७७,७६२/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.
**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.
**मा.महापौर :-** विषय क्र. ४१ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.७९९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातुन जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्र.५३ (जुना राष्ट्रिय महामार्ग क्र.६) वरील कालिंका माता चौका पासुन ते खोटे नगर चौका पर्यंतच्या नविन विकसित होणाऱ्या चौपदरी करण्याच्या रस्त्यावर नविन पोल उभारुन व काही प्रमुख चौकांमध्ये हायमास्ट पोल उभारुन प्रकाश व्यवस्था करणे कामी जिल्हा अधिकारी कार्यालयाकडुन त्यांच्याकडील पत्र क्रं./न.पा/नियोजन/आरआर/७६७/२०२१ दि.५/०७/२०२१ अन्वये रक्कम रु.३,०६,३४,९०३/- मात्रचे कामास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार शहर अभियंता यांची दि.२/११/२०२१ रोजीच्या मान्यतेने ई-निविदा सुचना क्र.१०४ सन २०२१-२२ शासनाचे संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर रक्कम रु.२,७३,५२,५९२/- (GST वगळून) प्रसिध्द करण्यात आली. ई-निविदा सुचना मनपा पत्र जा.क्र./विदयुत/२१२ दि.१५/११/२०२१ अन्वये दै.लोकमत (राज्यस्तरी) यावृत्तपत्रात माहिती प्रसिध्द करण्यात आली. संगणकाव्दारे ई-निविदा भरण्याकरीता दि.१५/११/२०२१ ते दि.९/१२/२०२१ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. दिलेल्या मुदतीत एकुण-०७ (सात) ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार आलेल्या ई-निविदा कागदपत्रांची छाननी/तपासणी केली असता १) अर्णव इंडस्ट्रीज,नंदुरबार २) राजसन इलेक्ट्रॉन्स,नाशिक यांच्या निविदा अपात्र ठरविण्यात आल्या असून पात्र ०५ मक्तेदारा यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदा रक्कम रु.२,७३,५२,५९२/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | इंगळे इलेक्ट्रीकल्स,जळगांव | निविदा रक्कमेपेक्षा ८.८९% जास्त (२४,३१,६४५) | २,९७,८४,२३७/- |
| २ | बालाजी असोशिएट नागपुर | निविदा रक्कमेपेक्षा ७.२०% कमी (१९,६९,३८७) | २,५३,८३,२०५/- |
| ३ | मे.पवन क्वीक सर्व्हिसेस,पुणे | निविदा रक्कमेपेक्षा ९% कमी (२४,६३,७३३) | २,४८,९०,८५९/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | मॅग्नेटीक इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स,औरंगाबाद | निविदा रक्कमेपेक्षा ११% जास्त (३०,०८,७८५) | ३,०३,६१,३७७/- |
| ५ | भुषण इलेक्ट्रीकल्स,जळगांव | निविदा रक्कमेपेक्षा ९.९९% जास्त (२७,३२,५२४) | ३,००,८५,११६/- |

वर नमुद तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार मे.पवन क्वीक सर्व्हिसेस,पुणे यांचे दर सर्वात कमीचे म्हणजे निविदा रक्कमेवर ९% कमीचे आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.२,४८,९०,८५९/- मात्र इतका खर्च निविदाप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद केलेप्रमाणे आलेल्या दरामध्ये १२% GST रक्कमेचा समावेश करावयाचा असून त्याप्रमाणे खर्च खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १ | निविदाप्रमाणे अपेक्षीत खर्च | रक्कम रु.२,४८,९०,८५९/- |
| २ | **GST१२%** | रक्कम रु.२९,८६,९०३/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च | रक्क्म रु.२,७८,७७,७६२/- |

वर नमुदप्रमाणे निविदेत आलेल्या दरानुसार व GST सह अपेक्षीत खर्च रक्कम रु.२,७८,७७,७६२/- मात्र इतका आहे. मक्तेदार मे.पवन क्वीक सर्व्हिसेस,पुणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ९% कमीचे दर आलेले असल्याने शासन निर्णय क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र./०८/ईमा-२ मंत्रालय, मुंबई-३२ दि.२७/०९/२०१८ मधील परिच्छेद क्रं.४-६-३ मध्ये नमुद तरतुदीनुसार व निविदा अटीशर्तीनुसार मक्तेदार यांचेकडुन १ ते १०% कमीच्या दरा पर्यंत १% व त्यावरील प्रत्येक टक्क्यास १% याप्रमाणे परफॉमस सिक्युरीटी करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मक्तेदार मे.पवन क्वीक सर्व्हिसेस,पुणे यांनी निविदेत निविदा रक्कमेच्या ९% कमीचे दर सादर केलेले असल्याने त्यांच्याकडुन १% परफॉमस सिक्युरीटी म्हणुन अनामत रक्कम रु.२,७८,७७८/- मात्रचा डी.डी. व्दारे परफॉमस सिक्युरीटी चा भरणा करणेबाबत कळविले असता मक्तेदार यांनी मुदतीत मनपा पावती क्रं.७६७२ दि.१४/०३/२०२२ रोजी रक्कम रु.२,७८,७७८/- मात्रचा भरणा महानगरपालिका खजिन्यात केलेला असुन सदर कामी रक्कम रु.२,७८,७७,७६२/- मात्र १२% GST सह इतका खर्च अपेक्षीत आहे. आलेले ई-निविदा लघुत्तम दर निविदा रक्कमेवर ९% कमीचे आलेले दर या दरानुसार येणाऱ्या पर्यायी एकुण रक्कम रु.२,७८,७७,७६२/- मात्रच्या (GST सह) खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ४२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** संविदांची माहिती घेण्यात आली.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र. ४२ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८०० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

**१.** प्रशासकीय आदेश क्र.विदयुत/२१ दि.०८/०२/२०२२ अन्वये मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे यांचे आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२०-२१ अंतर्गत जळगांव शहरातील विदयुत विभाग यु.क्र.१ मधील म्हाळसा देवी मंदिरा जवळ त्रिभुवन कॉलनी जवळ विष्णुकांत पुरोहित यांचे प्लॉट जवळ काळे नगर समोर शिवाजी नगर येथे १ नग मिनी हायमास्ट पोल उभारुन त्यावर एलईडी पथदिवे बसवून प्रकाश व्यवस्था करणे व इतर १५ कामे करणे कामी मक्तेदार सनराईस इलेक्ट्रीकल,जळगांव यांचे निविदा रक्कमेपेक्षा १.८८% सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.८,९४,६५०/- मात्र खर्चाची संविदा.

**२.** प्रशासकीय आदेश क्र.विदयुत/२२ दि.०८/०२/२०२२ अन्वये मा.आ.श्री.चंदुभाई पटेल यांचे आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२१-२२ अंतर्गत जळगांव शहर येथील प्रभाग क्र.६

विवेकानंद व्यायाम शाळे जवळ स्वातंत्र चौक येथे सौर लॅम्प बसविणे व इतर १२ कामे करणे कामी मक्तेदार इंगळे इलेक्ट्रीकल्स,जळगांव यांचे निविदा रक्कमेपेक्षा १% सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.८,५१,०८०/- मात्र खर्चाची संविदा.

**३.** प्रशासकीय आदेश क्र.विदयुत/२३ दि.११/०२/२०२२ अन्वये मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे यांचे आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सन २०२१-२२ विदयुत विभाग यु.क्र.१ अंतर्गत येणाऱ्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर उदयान येथे ६ मी. उंचीचे पोल नव्याने उभारुन भुमीगत केबल टाकून त्यावर एलईडी लाईट बसवून प्रखर प्रकाश व्यवथा करणे कामी मक्तेदार वरद इलेक्ट्रीकल्स वर्क्स,जळगांव यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९६,५५०/- मात्र खर्चाची संविदा.

**४.** प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१८० दि.१७/०२/२०२२ अन्वये नागरी दिलतेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र.०८ निमखेडी शिवार गट नं.२३,२५,१+२ शिवधाम परिसर,श्रीराम समर्थ कॉलनी येथे आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार नितीश कैलास कापडणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ८% सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२२,३०,४११/- मात्र खर्चाची संविदा.

**५.** प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१७८ दि.१६/०२/२०२२ अन्वये जळगांव शहरातील डांबरी रस्ते पॉटहोल मशिनच्या सहाय्याने दुरुस्ती करण्याकरीता इमल्शन डांबर पॅक डब्यात शासकीय दराने हिंदुस्थान कोलॅस प्रा.लि.मुंबई यांचे कडुन खरेदी करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.१५,७७,५२०/- मात्रचे खर्चास तसेच इमल्शन डांबर दोन वेळा वाहतुक करणे कामी येणारा रक्कम रु.१,३०,४७८/- मात्रचे खर्चास असा एकूण रक्कम रु.१७,०७,९९८/- मात्र खर्चाची संविदा.

**६.** प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१८५ दि.२४/०२/२०२२ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र.०९ पिंप्राळा गट नं.४० द्रोपदी नगर ओपनस्पेसला चेनलिंग फेन्सींग व पेव्हिंग ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार श्री.निलेश रमेश पाटील,जळगांव यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१९,९८,६९२/- मात्र खर्चाची संविदा.

**७.** प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१८६ दि.२४/०२/२०२२ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्र.०३ जळगांव ११९/१ व तळेले कॉलनीत गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.मकरंद दिलीप सुर्यवंशी यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१०,००,३७७/- मात्र खर्चाची संविदा.

**८.** प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१८७ दि.२४/०२/२०२२ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्र.०९ पिंप्राळा गट नं.२३+२२ पंचायत ओपनस्पेसला चेनलिंग फेन्सींग करणे कामी मक्तेदार श्री.निलेश रमेश पाटील,जळगांव यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१०,२८,६९३/- मात्र खर्चाची संविदा.

**९.** प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१८८ दि.०४/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्र.०१ अंतर्गत जनाई नगर स.नं.३००/२ब/१ मध्ये आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हर्ट बांधणे कामी मक्तेदार श्री बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२०,००,००१/- मात्र खर्चाची संविदा.

**१०.** प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१९० दि.०९/०३/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१८ सर्वे नं.१७/०४ येथील मनपा ओपनस्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार श्री.गौरव राजेश पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,५६,२०६/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६६ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर साहेब, पाणी पुरवठाच्या संदर्भातली चर्चा आहे. पाणी पुरवठाच्या संदर्भातील एक आपण निर्णय घेतलेला आहे. फ्लॅट सिस्टीमच्या संदर्भातला, फ्लॅट धारकांना एकच कनेक्शन देणे संदर्भातला आता आपण काही २४x७ पाणी देऊ शकणार नाही. तुर्त तरी देऊ शकणार नाही. आता एक एक इमारतीमध्ये १५-१५, १६-१६ फ्लॅटस असतील आणि आपण फक्त एक कनेक्शन प्रोवाईड करायचे आणि त्याच्यानंतर ही आपण पाणीपुरवठा फक्त ४५ मिनीटाचा देतो. पाणी पुरवठा आपण २ दिवसा आड तिसऱ्या दिवशी देतो. प्रॅक्टीकली शक्य आहे का ? आणि ज्या गोष्टी प्रॅक्टीकली शक्य नाही त्याची अंमलबजावणी कशी होऊ शकते. म्हणजे संपुर्ण जळगांव शहरामध्ये ज्या ज्या काही फ्लॅट सिस्टीम आहे. बऱ्याच फ्लॅट सिस्टीम मध्ये अशी परिस्थिती आहे की, त्यांच्याकडे बोरींग सुध्दा स्वत:ची नाही. काही ठिकाणी बोरींग आहे पण बोरींगच पाणी आटलेल आहे. दुसरी बोरींग करण्याची व्यवस्था नाही. मग अश्या परिस्थितीमध्ये ४५ मिनीट पाणी देणे एका कनेक्शन वरुन कश्या पध्दतीने त्यांच्या पिण्याच्या पाणीचा पुरवठा होऊ शकेल. म्हणजे जुनी आपली जी योजना होती. जुन्या योजनेप्रमाणे ते लोकं समाधानी होते. परंतु नविन योजना देवुन जर कधी नागरीक समाधानी नसतील. किंवा ते त्रासात पडत असतील. या संदर्भातला निर्णय आपण कश्या पध्दतीने अंमलबजावणी करणार. याचा कुठेतरी व्यवहारीक साध्य होणे गरजेचे आहे. हे प्रॅक्टीकल मध्ये शक्यच होवु शकत नाही सर.

**श्री.लुले, पाणी पुरवठा अभियंता :-** आपण अमृत योजना पाणी पुरवठा योजना वेळोवेळी झालेल्या आढावा बैठकीच्या अनुषंगाने हा कार्यालयीन आदेश काढलेला आहे. पण याच्यामध्ये सर्व कनिष्ठ अभियंता यांना वेळेनुसार आणि परिस्थितीनुसार कनेक्शन देणेबाबतचे पण याच्यामध्ये मी नमुद केलेले आहे. नळ संयोजन मंजुरी देते वेळी युनिट अभियंता यांनी जागेवर खातरजमा करावी. व्यवस्था नसल्यास मालमत्ता धारक यांनी व्यवस्था केल्याशिवाय नळ संयोजन मंजुरीसाठी प्रस्ताव आणु नये अश्या बाबतीचे आदेश आहे.

**श्री.सचिन पाटील :-** आयुक्त महोदय,

**श्री.लुले, पाणी पुरवठा अभियंता :-** आणि आता प्रॅक्टीकली किमान ६ ब्लॉक अपार्टमेंटला एक कनेक्शन एक इंची देण्याचे प्रयोजन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला लुले साहेब फक्त इतके पटवुन द्या की, आपण एक कनेक्शन पौन इंची जे काही असेल ते देणार आणि पाऊन तास पाणी देणार आणि तिसऱ्या दिवशी पाणी देणार. दोन दिवसा आड म्हणजे तिसऱ्या दिवशी. त्याच्यात ही कधी आपली वाघुरची पाईपलाईन फुटली, तर एक दिवस पाणी पुरवठा पुढे ढकलला गेला, पाऊसाच्या दिवसात विजेचे खांब कोलॅप्स झाले, पाणी पुरवठा पुन्हा खंडीत होतो. अश्या परिस्थितीमध्ये या नागरीकांना पाणी कश्या पध्दतीने पुरविणार आपण प्रॅक्टीकली मला हे तुम्ही ऑन रेकॉर्ड सिध्द करुन दाखवा की, एक कनेक्शन दिल्यानंतर आठ फ्लॅट धारक असतील, बारा फ्लॅट धारक असतील, ज्यांच्याकडे पर्यायी व्यवस्था नसेल, त्यांना पाणी पुरवठा करणे ही महानगरपालिकेची प्राथमिक जबाबदारी आहे आणि तो कर्तव्याचा भाग आहे. आदेश काढणे खुप सोपे आहे. परंतु त्या आदेशची प्रॅक्टीकल रित्या अंमलबजावणी होवु शकते का ? याच्या संदर्भातला मला तुम्ही स्पष्टीकरण द्या. आज इतकी वाईट परिस्थिती आहे साहेब. प्रत्येक नागरीक, जे फ्लॅट धारक असतील, प्रत्येक लोक प्रतिनिधींना रोज डोक्याला तान देतात. त्यांची चुक नाही. कारण ते शक्यच नाही. जुने अपार्टमेंट आहे तेथे अंडरग्राऊंड टाकीची व्यवस्था सुध्दा नाही. बोरींग नाही. बोरींगच्या काही भागांमध्ये बोरींगला पाणी सुध्दा लागत नाही. मग हा अव्यवहारीक धोरण आपण कश्या पध्दतीने राबविणार.

**ॲड.सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, नितीन भाऊंनी जे मुद्दे मांडलेले आहे ते सगळे जे अपार्टमेंटस आहे जेथे सोसायटी सुध्दा स्थापन झालेली नाही. तर तेथे हा तिढा सोडविणे खुप कठीण होत आहे. म्हणजे अगदी रोज उठुन भांडणाचा हा विषय भविष्यात असणार आहे आणि नागरीकांचे ही खरे आहे हे नितीनभाऊंनी सांगितले हे की, वारंवार लोकप्रतिनिधींकडे येवुन याची विचारणा करत आहे की, आम्हाला कश्या पध्दतीने पाणी पुरवठा करणार आहात. खुप जागी अंडरग्राऊंड टाक्या नाही. काहीच नाही त्यांच्याकडे सोयीच नाही. मोठे अपार्टमेंट नविन बांधकाम जी झालेले आहे. तेथे खुप सोपे आहे. हे सगळे करणे. पण जुन्या अपार्टमेंट मध्ये या सगळया सोयी नाही. त्याच्यासाठी खुप विचारपुर्वक धोरण ठरवाव लागणार आहे आणि लुले साहेबांनी त्यांचा जो आदेश वाचला की, कनिष्ठ अभियंता यांना स्पॉटवर निर्णय घेण्याचे अधिकार दिलेले आहे. निर्णय काय घ्यायचा हे सुध्दा आपल्याला ठरवाव लागणार आहे. कनिष्ठ अभियंता नेमक काय ठरविणार कसे ठरविणार म्हणजे प्रत्येक अपार्टमेंटच्या वेळेला वेगळया स्वरुपाचे भांडणांना आपल्या प्रशासकीय यंत्रणेलाच सामोरे जावे लागणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई याच्यात एक सांगतो तुम्हाला, महापौरताई, याच्यामुळे कनेक्शन दिल्याचा हेतु पुर्ण होत नाही. त्या फ्लॅट धारकांच्या समोरच्या रस्त्याच काम सुरु करायच आहे. परंतु नळाचा तिढा सोडविला जात नाही म्हणुन रस्त्याच

काम सुध्दा मार्गी लागत नाही. रस्त्याच काम मार्गी लागत नाही. तर त्याला दिलेली वर्कऑर्डरची मुदतही संपुष्टात येते. मग परत निधी परत जाण्याचा धोका त्याच्या मागे मागे येत आहे. म्हणजे एका निर्णयावरती अनेक निर्णय अवलंबुन आहे. नागरीकांच म्हणजे काय होत की, एखादी मोठी योजना ज्या वेळेला शहरामध्ये, कोट्यावधी रुपये खर्च करुन ज्या वेळेला एखादी नविन योजना आणतो, नागरीकांमध्ये एक उत्साहच वातावरण असत की, चला आपली कायमस्वरुपी पाण्याची कटकट दुर होईल. परंतु कटकट कमी होण्याच्या ऐवजी कटकट वाढत असेल, तर मला वाटत ती योजनाच भविष्याच्या दृष्टीकोणातुन डोकेदुखी ठरेल. तर याच्यावरती कुठेतरी सर्वकक्ष निर्णय होणे अपेक्षित आहे आणि ते ही तातडीने होणे गरजेचे आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** नितीनभाऊ आपण काय करु हे नळ कनेक्शनची लोकांची जी अडचण आहे ती पटकन सोडवु याच्यामध्ये हाच एक विषय नाही. जळगांव शहरातले जे भाडेकरी आहे ना. त्यांना मालकाच्या संमती शिवाय कनेक्शन भेटत नाही. ते पण एक विषय राहिलेले आहे.

**श्री.सचिन पाटील :-** आहो अप्पा साहेब, एक मिनीट, साहेब मागेच केले आपल्याला संगम सोसायटीने आपल्याला स्वत: याच्याबाबतीत लेखी निवेदन दिले होते. त्याच अनुषंगाने तत्कालीन पाणी पुरवठा अभियंता बाबा साळुंखे, लुले साहेब या सर्वांनी जागेवर जावुन स्थळ निरिक्षण केलेल आहे. त्या बिल्डींगमध्ये खाली पार्कींग नाही अनेक प्रकारची १७ सदनिका आहेत त्या अपार्टमेंटला आहे. असे मोठमोठे ज्याच्यामध्ये १० च्या वरती संख्या आहे राहणाऱ्यांची आणि त्यावेळेस त्यांनी रिपोर्ट देखील केलेला आहे आपल्याकडे की, त्या अपार्टमेंटला पॉसीबल नाही. आणि तरी परंतु अश्या प्रकारे हा असा निर्णय आणायचा आणि श्री.लुलेंनी स्वत: सर्वेक्षण केलेले आहे माझ्या समोर अपार्टमेंट धारकांसह. म्हणजे जर सर्वेक्षण तुम्ही करत आहे. स्थळ परिक्षण तुम्ही स्वत: करत आहे आणि परत निर्णय या पध्दतीने पारित करायचा. सर्व अपार्टमेंटधारक आज सर्वेक्षण केल्यानंतर रिपोर्ट तसा केल्यानंतर तुम्ही चुकीचा निर्णय का दिला,

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि सर्व मान्य ही केल असत आपण हे कनेक्शन घेणेस एक्सेप्ट ही केले असते की, २४ तास पाणी येणार आहे. एक कनेक्शन आहे २४ तास चालु आहे. वॉटरलेव्हल पाणी मिळणार आहे. परंतु २४ x७ करायला आज आपल्याकडे वॉटर मिटरची व्यवस्था नाही. २४ x७ आज आपण देवु शकणार नाही. आणि २४ x७ देणार नाही. मग या एक कनेक्शनवर इतके अपार्टमेंट धारकांच काम भागणार नाही. हा अत्यंत गंभीर मुद्दा आहे. या गंभीर मुद्दयावरती आपण गांभिर्याने विचार करु काय याच्यातुन नागरीकांना दिलासा देता येईल. त्या पध्दतीने प्रशासनाने विचार करावा. सदस्यही आपल्या सुचना देतील आणि लवकरात लवकर याच्यातुन निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे. कारण रस्त्यांचे कामे सुध्दा याच्यामध्ये खोळंबलेली आहे आणि तसा दुसरा मुद्दा जो आहे पिंप्राळा हुडकोच्या संदर्भातला तेथे अजुन पर्यंत एकाही नागरीकाने नविन कनेक्शन अमृतच घेतलेले नाही. त्याची अडचण ही आहे की, स्लम पॅकेट मधला भाग आहे. पाणीपट्टीमध्ये आपण त्यांना सवलत देतोच आहे. परंतु कनेक्शनचे जे रु.२०००/- चार्जेस आपण वसुल करतो. त्या क्लासची परिस्थिती अशी आहे की, हॅण्ड टु माऊथ आहे. रोज आणायचे आणि रोज खायचे, तर अश्यांच्या बाबतीमध्ये सुध्दा सवलतीच्या दरामध्ये कनेक्शन देण्याच्या संदर्भामध्ये सुध्दा भुमिका प्रशासनाने विचार करावी. जेणे करुन आज संपुर्णत: पाणी बेकायदेशीर रित्या ते वापरत आहे. त्यांना आपल्याला रेग्युलराईज करायचे आहे त्यांना प्रवाहात आणायचे आहे. परंतु रु.२०००/- आज कनेक्शनचे चार्जेस भरण्यापर्यंतची परिस्थिती नसल्याकारणाने त्याच्यामध्ये सुध्दा कुठेतरी प्रशासनाने विचार करुन कमीत कमी एक रिझीमेंट अमाऊंट जर कधी डिसाईड केली. तर ते कनेक्शन घ्यायला उद्ययुक्त होतील आणि भविष्यात ते नियमीत ही होतील म्हणजे सातत्याने होणारे आपले नुकसान आहे पाणीपट्टीच तर काही अंशी ते कमी होईल. तर हा सुध्दा मुद्दा तेवढाच गांभिर्याचा आहे. याबाबतीत ही आपण विचार करावा.

**मा.आयुक्त :-** व्यवस्थीत ते मांडता येत नाही किंवा त्याची अंमलबजावणी करत असतांना काही अडचणी आहे किंवा काय ? याच्यासाठी जशी आपण सुचना केली होती. तशी मा.महापौरांकडे आपण सोमवारी प्रमुख पदाधिकाऱ्यांना बोलवुन त्या बैठकीमध्ये या सगळया विषयांवरती चर्चा करु व्यवहारीक अडचणी काय आहे प्रत्यक्षामध्ये आणि आपल धोरण हे धोरण ठरविण्यामध्ये काही तांत्रिक बाबी आहे. असा हा प्रशासकीय धोरण नव्हे तांत्रिक धोरण आहे. एखाद्या ठिकाणी एक अपार्टमेंट मध्ये २४ फ्लॅटस असतील. तर आपल्या समोर जाणाऱ्या पाईप लाईन होत्या त्याला पंक्चर करणे सहच शक्य होते. आता आपल्या एल.जी.पी. लाईनला एकाच ठिकाणी एवढया प्रकारचे पंक्चर करणे कितपर्यंत योग्य आहे. त्याच्यामुळे प्रेशरड्रॉप काही होणार आहे का ? पाईपलाईनला डॅमेज काही होणार आहे का ? हे तांत्रिक मुद्दे वास्तवीक पाहता, पाणी पुरवठा अभियंतांना हे तांत्रिक मुद्दे सांगणे गरजेचे होते. ते काही त्यांना सांगता आलेले नाही. परंतु या सगळयांच मुद्दयांचा विचार करुन एम.जी.पी.च्या अधिकाऱ्यांशी चर्चा करुन आपण हे धोरण ठरवितो. आपण जे म्हणत आहे सचिन पाटील साहेब ज्या ठिकाणी ग्राऊंडला जागाच नाही. कॉमन जागा असल्याने आपल्याला त्याच्यावर काही करता येत नाही. अश्या ठिकाणी इंडिव्हिजल कनेक्शन द्या अश्या प्रकारच्या सुचना एक वर्षापुर्वी दिलेले आहे. त्यामुळे या

सगळया मुद्दयांवरती आपण चर्चा करु आणि महापौरांकडे आपण यास्वरुपाची बैठक घेवु या. आपल्या ज्या ज्या प्रमुख समस्या असतील, जसे शिव कॉलनीच्या आपण सांगत आहेत. नितीनभाऊ आपण आहात, बरडे साहेब आपण आहात. सगळया पदाधिकाऱ्यांची आपण एक बैठक घेवु. आणि याच्यामध्ये धोरण काय आहे ते आपण समजुन घेवु आणि त्याची अंमलबजावणी करतांना येणाऱ्या काय अडचणी आहे. त्याला आपण मार्ग काढु. परंतु एक आहे. २४ x ७ आणि गृप कनेक्शन याचा परस्पर तसा काही संबंध नाही. एका फ्लॅटला १३५ लिटर प्रमाणे दर वेळी करायचे आहे. समजा ५ जणाचे जर आपण म्हटले तर साधारण ७००-८०० लिटर पाणी एका कुटुंबाला, समजा १० कुटुंब असतील. तर आपल्याला ७ ते ८ हजार लिटर पाणी समजा ४५ मिनीट ते १ तासात द्यायचे आहे. तर त्याच्यासाठी किती इंची कनेक्शन लागेल. १ इंचीच नाही, समजा २ इंची लागेल, तर २ इंची आपल्याला कनेक्शन द्याव लागेल. त्या नागरीकांची १३५ लिटर दरडोई दर दिवशी ही पाण्याची गरज भागविणेसाठी जे काही कनेक्शन आवश्यक आहे ते कनेक्शन द्याव लागेल. ज्या काही अडचणी याच्यात आहेत ते आपण बघु आणि सोमवारी आपण याच्यावरती अंतिम निर्णय घेवु. आपण म्हणत आहे त्याप्रमाणे प्रत्येक नागरीकाला पाणी पुरवठा कसा केला जाईल हेच आपले उद्दिष्ट असेल. सोमवारी निर्णय घेवु आपण. .

**श्री.नितीन बरडे :-** साहेब, काही अपार्टमेंटसला देवुन टाकलेले आहे यांनी. जेथे ८ फ्लॅट आहे तेथे ५-५, ६-६ कनेक्शन देवुन टाकले आहे यांनी आणि दोन जणांना देतच नाही.

**मा.आयुक्त :-** म्हणुन त्या सगळयांचे सामुहिक निर्णय आपण घेवु की, ज्याची अंमलबजावणी करतांना पाणी पुरवठा विभागाला अडचणी येणार नाही.

**श्री.नितीन बरडे :-** काही ठिकाणी पुर्ण देवुन टाकले आहे यांनी.

**मा.आयुक्त :-** जशी अडचणी येतील तसा निर्णय घेवु ना आपण.

**श्री.राजेंद्र पाटील :-** गुंठेवारीचे जे प्लॉट आहे ते नियमित करण्याच्या संदर्भात आपण मार्च अखेर पर्यंत नियमीत करण्यासाठी मुदत दिली होती. आता ती मुदत संपलेली आहे आणि त्यासंदर्भात आपण जो गुंठेवारी प्लॉट नियमित करण्याचा जो ठराव केलेला होता. तो ठराव केल्यानंतर आपण ५०० फुटाचे प्लॉट असतील. ५०० फुटाचे वरचे प्लॉट असतील. १००० फुटाचे वर असलेल्या बांधकामासाठी आपण नागरीकांना रिलिफ देण्याच काम केलेले होते आणि त्याचाही आपण ठराव केलेला होता. परंतु हा ठराव आधी व्हायला होता आणि नियमित करायचा ठराव नंतर व्हायला पाहिजे होता. तो नंतर झाला परंतु त्याची अंमलबजावणी सुध्दा वेळेवर झाली नाही. ती ही उशिरा झाली, तसेच प्रशासनाकडुन जनजागृती सुध्दा त्या संदर्भात झालेली नाही. तरी माझी विनंती आहे. त्या ठरावाला आपण मुदतवाढ देण्यात यावी.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ठरावाची मुदत जी आहे, आपण ठराव केलेला आहे, त्याला मुदतवाढचा विषय आपण करुन घ्यावा असे माझे मत आहे.

**मा.आयुक्त :-** आपण मागच्या वेळेला मला वाटत आपण चेअरमन असतांना हा विषय आलेला होता. हा कायदा २० वर्षापुर्वीचा आहे आणि त्या कायद्याला सुरुवातीला फक्त एक वर्षाची मुदतवाढ होती आणि नंतर स्थानिक परिस्थिती प्रमाणे वेळोवेळी वाढविण्याचे स्थानिक प्राधिकरणाला अधिकार दिलेले होते. हेतु असा होता की, त्या वेळेला या लोकांना नागरी सुविधा देण्यामध्ये अडचण येत होती. अनधिकृत ले-आऊट असल्यामुळे रस्ते करता येत नव्हते. पाणी पुरवठा करता येत नव्हता. जागेच बांधकाम करता येत नव्हत. लोन मिळत नव्हत. या सगळया अडचणीवर मार्ग काढण्यासाठी राज्य शासनाने हा कायदा काढला. इतर कायद्यामध्ये आणि या कायद्यामध्ये फरक असा आहे की, इतर कायदे कायमस्वरुपी काढलेले असतात. हा कायदा फक्त तात्पुर्त्या कालावधीचा आहे. कायमस्वरुपी कायदा नाही. आता उद्देश असा होता की, ज्याने गुंठेवारी पध्दतीने प्लॉटींग केलेले आहे किंवा घर बांधलेले आहे. त्यांनी ठराविक पध्दतीमध्ये त्याचा प्रशुल्क आणि इतर डॉक्युमेट चार्जेस भरुन आपली बांधकामे नियमित करुन घ्यावी आणि कायमस्वरुपी हा प्रश्न सोडवावा. गेल्या २० वर्षापासुन ज्यांनी केलेले नाही. त्यासाठी मागच्यावेळेला राजुभाऊ आपल्याला आठवत असेल. आपण याच मुद्दयावर चर्चा केलेली होती की, नागरीकांना एक संधी दिली पाहिजे. मग आपण महासभेमध्ये ठराव केला, स्थायी समिती मध्ये ठराव केला, त्याला वर्तमानपत्रामध्ये आपण प्रसिध्दी दिली. त्याच्यामध्ये आपण एक अशी सुचना दिली होती की, जर ३१ मार्च पुर्वी तुम्ही गुंठेवारी नियमित करुन घेतली नाही. तर या बाबतीमध्ये राज्य शासनाचे जे लिखित धोरण आहे. आदरणीय मुख्यमंत्र्यांच्या बैठकीमध्ये निश्चित झालेल धोरण आहे. याच्या सुविधा ठराविक कालावधीनंतर बंद करण्यात याव्या. आता हे नागरी सुविधा मिळायला लागत आहे. पाणी मिळत आहे, लाईट मिळत आहे. स्वच्छता मिळत आहे. सगळं मिळत आहे. त्यामुळे आपल्याला अश्या वेळेला त्यामुळे प्रशुल्क भरुन नियमित करुन घेण्याची आवश्यकता कदाचित लोकांना भासत नाही. जर गेल्या एक वर्षाचा अनुभव घेतला. तर नगररचना विभाग तुम्हाला आकडे सांगेल. बोटावर मोजण्या जितके प्रकरण दाखल झाले. अश्या वेळेला आपण फक्त तांत्रिक बाब म्हणुन मुदत वाढवुन दिली तर

कागदोपत्री गुंठेवारी कायदा लागु होईल. त्याची अंमलबजावणी होणार नाही. कुठेतरी आपल्याला कठोर निर्णय घेणे गरजेचे आहे. जो पर्यंत आपल्याला, कारण आता आपण काय केलेले आहे. याच्या बाबतीत जी दुप्पट घरपट्टी होती. ती राज्य शासनाचे धोरणाप्रमाणे ७०० स्क्वे. फुटाच्या आत असले तर माफ केले. त्याच्यानंतर राज्य शासनाने जे ठरविलेले होते. त्यापेक्षा ही कमी दराने आपण आकारणी केली. जोपर्यंत आपण कायद्याची अंमलबजावणी करायला आपण नागरीकांना भाग पाडणार नाही. तो पर्यंत याची अंमलबजावणी होणार नाही. प्रत्येक वेळेला मुदतवाढ देवुन हा प्रश्न सुटणार नाही. हा गेल्या २० वर्षाचा अनुभव आहे. आता परवा आपण मागणी केली होती. ३-४ महिन्याची मुदतवाढ दिली. मला नाही असे वाटत की, खुप मोठया प्रमाणावर प्रकरण पडुन आहे. ज्यांच्याकडुन आपल्याला मुदतीची अडचण आहे. ज्यांना खरोखर याची गरज आहे. त्यांना गेल्या २० वर्षामध्ये करुन घेणे शक्य होते. या ही वर्षामध्ये करुन घेणे शक्य होते. परंतु याच्यामध्ये उदासिनता आहे. आज हे नियमित करण्याची कोणतीही आवश्यकता भासत नाही. ही खरी त्याच्या मागची वस्तुस्थिती आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** त्याच्यामध्ये विषय असा आहे साहेब आजपर्यंत नागरीकांनी कोणी भरलेले आहे का मला सांगा, १ रुपया तरी भरलेले आहे का ? आणि तो २ पट दंड वाढत आहे.

**मा.आयुक्त :-** तो भरला नाही...

**श्री.राजेंद्र पाटील :-** ऐका तरी साहेब.

**श्री.सुनिल खडके :-** ५० हजार लोकांचा प्रश्न आहे हा मी सर्व्हे केलेला आहे. ५० हजार लोकांचे बाकी आहे.

**मा.आयुक्त :-** आपण २० वर्ष संधी दिली.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** २० वर्ष केल ना साहेब अजुन १ वर्ष करुन घ्या.

**श्री.सुनिल खडके :-** आपण प्रसिध्दी दिली पण जनजागृतीमध्ये कमी पडत आहे आपण.

**श्री.राजेंद्र पाटील :-** या परिसरामध्ये राहणारे लोक हे स्लम एरियातील आहे आणि त्याच्यातील अतिक्रमण धारक जे आहे त्यांनी स्वत:चे छोटे मोठे प्लॉट घेतलेले आहे आणि त्यांनी त्यांचे स्वत:ने उभे केलेले आहे आणि सर्वात महत्वाची गोष्ट आपण म्हणतो की, चार एजन्सी मार्फत काम करावे. परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. नागरीकांना योग्य ते मार्गदर्शन दिल जात नाही. नागरीक येतात, चकरा मारतात, चपला घासल्या जातात आणि नाराज होवुन ते परत घरी जातात.

**श्री.सुनिल खडके :-** येथे नियोजन केल पाहिजे, यांना भेटा. नियोजननुसार काम होईल. यांना विशेष दिलेल आहे चार्ज तुम्ही यांना जाऊन भेटा. इंजिनियर आम्हाला सांगतात हे सांगतो तुम्हाला, माझ्या वार्डात आहे बाकी ठिकाणची लोकं पण माझ्याकडे आलेली होती. ते कंत्राटदाराच नांव सांगतात की तुम्ही त्यांच्याकडे जावुन भेटा. ते करतील त्यांना आम्ही दिलेले आहे टेन्डर, कोणाला दिलेल असते टेन्डर अस,

**मा.आयुक्त :-** पुर्वी आपण हा निर्णय घेतला होता. कोणत्याही नगरपालिकेच्या आपल्या इंजिनियरकडुन गुंठेवारीचा प्रस्ताव करु शकतात. पुर्वी आपण एजन्सी पण आपण नेमलेली होती. त्याच्या बाबतीत ही तक्रारी होत्या. मागच्या वर्षी याच महासभेच्या बैठकीमध्ये आपण जे रद्द केलेले आहे. त्यामुळे आता अशी कोणाची अडचण येणार नाही.

**श्री.राजेंद्र पाटील :-** साहेब, याच्यामध्ये विषय असा आहे की, ही जी गुंठेवारीची जागा आहे. त्याच्यामध्ये प्लॅन तयार करणे जी आहे ती एकच व्यक्ती करते. जळगांव शहरामध्ये. नगररचनाकार साहेब बसलेले आहे त्यांना माहिती आहे. मग त्याचे ते प्लॅन तयार करणे त्याच्यासाठी वेळ जातो. परत आपला २ पटचा जो दंड होता. तो जो नियमित करणेचा जो ठराव आहे. त्याच्यानंतर हा ठराव केलेला आहे. सुट देण्याच्या बाबतीत आणि तो सुध्दा त्याची अंमलबजावणी करण्यात बराच वेळ गेलेला आहे. तर मला असे वाटते की, आपण एक संधी नागरीकांना द्यायला पाहिजे. जेणे करुन जास्तीत जास्त लोकं ते नियमित करुन घेतील आणि महापालिकेची जी थकबाकी आहे. ती सुध्दा वसुल होण्यात मदत होईल.

**मा.आयुक्त :-** सर्व सन्मा.सदस्यांच्या सुचना विचारात घेवुन आपण येणाऱ्या महासभेमध्ये त्याची मुदतवाढ देण्याचा प्रस्तावाची प्रशासन अंमलबजावणी करेल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी एक प्रस्ताव मांडत आहे साहेब, शेवटचा एक महत्वाचा प्रश्न आहे. मी मागच्या ऑफलाईन महासभेत तो प्रश्न मांडला होता. त्यानंतर मी महापौरताईंना २१ तारखेला पण पत्र दिल होत २१ फेब्रुवारीला पण तो विषय ना कळत टेक्नीकल अडचणीमुळे तो विषयपत्रिकेवर पण येवु शकला नाही. तर माझी या सभागृहास विनंती आहे आणि महापौरताईंना विनंती आहे की, संपुर्ण नगरसेवकांना मनपानिधीतुन देण्यात यावे.

**श्री.सुनिल महाजन :-** ५००-५०० कोटी देण्यात यावे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ५०-५० लाख रुपये

**श्री.सुनिल महाजन :-** ५००-५०० कोटी सांगा भाऊ.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** स्विकृतसहीत मंजुर करण्यात यावे विकास कामांसाठी. जेणे करुन छोटे छोटे कामे जी आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** ५० लाख घेवुन काय करणार तुम्ही, २७० कोटीचे कामे मंजुर केले आता.
**श्री.विशाल त्रिपाठी :-** ते तर आता केले तुम्ही. ते ठराव मंजुर करावे आणि त्याची तरतुद पुढच्या २०२२-२३ च्या बजेटमध्ये तरतुद करुन १ एप्रिल पासुन ते लागु करण्यात यावा अशी मी सभागृहात विनंती करत आहे.

**मा.महापौर :-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.
**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतसाठी उभे राहावे ही विनंती.

**राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.**

**सही /-**
**(महाजन जयश्री सुनिल)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**